सोमवार
२४
ऑगस्ट २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : १४२
स्वागत मूल्य ३ रुपये

Postal Regn. No.
AKL Dn./315/2026-2028

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग
www.ajinkyabharat.com




# कन्नड घाटात एसटी बस कठड्यावर अडकली!

## खिडक्यांतून उड्या मारल्याने ५९ प्रवासी बचावले

**जळगाव : दि.२३ वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील कन्नड घाटात छत्रपती संभाजीनगरहून सुरतकडे जाणाऱ्या एसटी बसचा रविवारी दुपारी भीषण अपघात झाला. स्टीअरिंग रॉड तुटल्याने अथवा स्टीअरिंग जॅम झाल्याने चालकाचे अचानक बसवरील नियंत्रण सुटले आणि काही क्षणांतच बस घाटातील संरक्षक कठड्याला धडकली. धडकेनंतर बस कठड्यावरच अडकून राहिल्याने ती दरीत कोसळण्याचा मोठा धोका टळला. बसमध्ये तब्बल ५९ प्रवासी असल्याने या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

रविवारी दुपारी छत्रपती संभाजीनगरहून सुरतच्या दिशेने एसटी बस प्रवाशांना घेऊन निघाली होती. बस कन्नड घाटातील धोकादायक वळणांच्या मार्गावरून जात असताना अचानक स्टीअरिंग यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या समोर आले आहे. स्टीअरिंग रॉड तुटला किंवा जॅम झाला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे चालकाला बसवर नियंत्रण ठेवणे अवघड झाले. बसचा वेग आणि



घाटातील उतार लक्षात घेता परिस्थिती काही क्षणांतच गंभीर बनली. नियंत्रण सुटलेली बस रस्त्याच्या कडेला गेली आणि घाटातील संरक्षक कठड्याला जोरदार धडकली. या धडकेमुळे बस कठड्यावर अडकून राहिली. बस दरीत कोसळली असती, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, कठड्यामुळे बसचा प्रवास तिथेच थांबला आणि ५९ प्रवाशांचे प्राण थोडक्यात वाचले. अपघाताच्या क्षणी बसमधील प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली. बस दरीच्या दिशेने झुकल्याचे (पान २ वर)

### तांत्रिक बिघाडामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज

अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून स्टीअरिंग रॉड तुटणे किंवा स्टीअरिंग जॅम होणे, या तांत्रिक बिघाडामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज आहे. बसच्या तांत्रिक स्थितीची तपासणी केल्यानंतरच अपघातामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे. घाट मार्गावरून धावणाऱ्या एसटी बसच्या तांत्रिक स्थितीबाबत या घटनेमुळे पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेषतः स्टीअरिंग, ब्रेक आणि इतर महत्त्वाच्या यंत्रणांची नियमित तपासणी कितपत काटेकोरपणे केली जाते, याकडे लक्ष वेधले गेले आहे. सुदैवाने यावेळी बस दरीत कोसळली नाही; अन्यथा ५९ प्रवाशांच्या जीवावर मोठे संकट ओढवले असते.

## थोडक्यात

### राहुल गांधींनी नाना पटोलेंना भेट नाकारली?



**नागपूर :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुणे दौऱ्यात माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भेटीसाठी वेळ मागितला; मात्र राहुल गांधी यांनी त्यांना वेळ दिला नाही. त्यामुळे काँग्रेसमध्ये पटोले यांना डावलण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. राहुल गांधी काल पुणे विमानतळावर दाखल झाल्यानंतर काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी नाना पटोले यांनीही राहुल गांधी यांचे पुष्प देऊन स्वागत केले. स्वागतावेळी पटोले यांनी राहुल गांधी यांच्याशी काही बोलण्यासाठी वेळ मागितला. त्यावर राहुल गांधी यांनी नंतर बोलू, असे उत्तर दिल्याचे सांगितले जाते. यानंतर पटोले यांनी राहुल गांधी ज्या हॉटेलमध्ये मुक्कामी होते, तेथे भेटण्यासाठी येऊ का, अशी विचारणा केली. त्यावरही राहुल गांधी यांनी सध्या शक्य नसल्याचे संकेत दिले. अखेर पटोले यांनी 'प्रोग्राम के बाद?' अशी विचारणा केली असता राहुल गांधी यांनी 'प्रोग्राम के बाद' असे उत्तर दिले. मात्र त्यानंतर प्रत्यक्ष भेट झाली की नाही, याबाबत काँग्रेसच्या वर्तुळात चर्चा सुरू आहे.

### दोन मुलांचा खून करून आईची आत्महत्या

**कोल्हापूर :** शिरोळ तालुक्यातील जयसिंगपूर शहरातील मच्छी मार्केट परिसरात एका २५ वर्षीय तरुण मातेने आपल्या दोन लहान मुलांचा गळफास देऊन खून केला आणि त्यानंतर स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच जयसिंगपूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून तिन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जयसिंगपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. या दुर्दैवी घटनेची माहिती समजताच रुग्णालयाबाहेर नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या दुर्दैवी घटनेमुळे जयसिंगपूर शहरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. संगीता राजू गाडीवडर (वय २५), असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी मातेचे नाव असून, प्रगती राजू गाडीवडर (वय ४) आणि प्रतीक राजू गाडीवडर (वय दीड वर्ष) अशी मृत चिमुरड्यांची नावे आहेत.

### वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी गुणरत्न सदावर्तेंवर गुन्हा

**बीड:** मराठा आंदोलक मनोज जरांगे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन उपोषण करणार आहेत. दुसरीकडे ओबीसी नेतेही आक्रमक झाले असून त्यांच्याकडूनही प्रतिआंदोलन उभारण्यात येत आहे. त्यातच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी बीडमध्ये विराट मोर्चा काढला होता. या मोर्चावेळी जरांगेंना भाषणातून धमकी देऊन वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी सदावर्ते यांच्यावर बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या विराट मोर्चाच्या सभेदरम्यान आणि शासकीय विश्रामगृह येथील पत्रकार परिषदेत सदावर्ते यांनी जरांगे यांच्याबद्दल विविध वक्तव्य करत जाहीर टीका केली होती. सदावर्ते यांच्या भाषणातील मुद्दे आणि आक्षेपार्ह टीकेसंदर्भाने जरांगे समर्थक गंगाधर काळकुटे यांच्या फिर्यादीवरून सदावर्ते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.जरांगे यांच्याबद्दल अपशब्द वापरून धमकीवजा इशारा दिल्याप्रकरणी हा अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

# 'भुलेश्वरचा राजा'ची मूर्ती कोसळली!

## दोघांचा मृत्यू, पाच जण जखमी; गणेशोत्सव सोहळ्याला गालबोट

**मुंबई: दि.२३ वृत्तसंस्था**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबईत गणपती बाप्पाच्या मूर्तींच्या आगमन सोहळे सुरू झाले आहेत. गेल्या दोन आठवड्यांपासून आगमन सोहळे सुरू असताना शनिवारी रात्री या सोहळ्याला गालबोट लागलं. मुंबईतील भुलेश्वरचा राजाचे आगमन सुरू असताना गणपतीची मूर्ती कोसळली. त्यामुळे दोघांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. यामुळे मुंबईत आज हळहळ व्यक्त केली जात असून अनेक मंडळांनी आज शांततेत आगमन सोहळा करण्याचा निश्चय केला आहे. दरम्यान, या घटनेवेळी नेमकं काय घडलं? याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

पीओपीच्या उंची मुर्तींच्या विसर्जनाचा पेच सुटलेला (पान २ वर)



### नेमके काय घडले?

गणपतीची २७ फूटी मूर्ती घेऊन अखिल भुलेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी भुलेश्वरमधील कबुतरखाना येथे वाजत गाजत आणत होते. रात्री ९ वाजून ५१ मिनिटांच्या सुमारास ही मूर्ती परिसरात आली असताना अचानक ती खाली कोसळून मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या अंगावर पडली. या अपघातात चौघे जखमी झाले. मंडळाचे अध्यक्ष व शिवसेना उपविभाग प्रमुख संकेत नेवशे (वय ३३) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच ब्रिजेश जोशी (वय ३०) यांच्या छातीला मार लागल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



### ट्रेनमध्ये आढळले महिलेच्या मृतदेहाचे तुकडे!

**लखनौ: दि.२३ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील आग्रा येथे ६ ऑगस्टला ट्रेनमध्ये लाल रंगाच्या सुटकेसमध्ये एका महिलेच्या शरीराचे तुकडे आढळल्याच्या धक्कादायक घटनेचा तपास आता चेन्नईपर्यंत पोहोचला आहे. पोलिस तपासात सीसीटीव्ही फुटेज, रेल्वेचे रेकॉर्ड आणि फॉरेन्सिक अहवाल महत्त्वाचे दुवे ठरत असून, पोलिस संशयित आरोपींच्या चेन्नईतील भाड्याच्या घरापर्यंत पोहोचले असून, येथे हा भयंकर गुन्हा झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. संपूर्ण घराची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे.

चेन्नई सेंट्रल रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक पुरुष आणि महिला ती लाल सुटकेस घेऊन जाताना स्पष्ट दिसत आहेत. त्यांनी ही सुटकेस आग्राकडे जाणाऱ्या तमिळनाडू एक्सप्रेसमध्ये सोडली आणि तेथून पळ काढला. या फ ुटेजच्या मदतीने पोलिसांनी गुदुवांचेरी भागातील त्यांच्या भाड्याच्या घराचा शोध घेतला. मात्र, या संशयित आरोपींची ओळख आणि त्यांचे परस्परांशी असलेले नाते अजून स्पष्ट झालेले नाही. (पान २ वर)

# बांगलादेशात हिंदू कुटुंबाची निर्घृण हत्या!

## ४ जणांचे मृतदेह बंद घरात आढळले



**रंगपूर : दि.२३ वृत्तसंस्था**

बांगलादेशातील रंगपूर शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. रंगपूर जिल्हा शाळेतील निवृत्त शिक्षक गणपती चक्रवर्ती आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. शनिवारी रात्री उशिरा पोलिसांनी त्यांच्या तीन मजली नव्याने बांधलेल्या घराचे कुलूप तोडून प्रवेश केला असता, घरात चार जणांचे मृतदेह विखुरलेल्या अवस्थेत आढळले. या भीषण हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, बांगलादेशात राहणाऱ्या अल्पसंख्याक हिंदू समाजात तीव्र संताप आणि दहशतीचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास दासपारा (मच्छुआपारा) परिसरातील एका बंद घरातून दुर्गंधी आणि संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घर बाहेरून बंद असल्याने पोलिसांनी कुलूप तोडून आत प्रवेश केला. आतमध्ये निवृत्त शिक्षक गणपती चक्रवर्ती (६५), त्यांची पत्नी प्रीतिलता चक्रवर्ती (५०), त्यांची मुलगी आगामी चक्रवर्ती (२३) आणि १२ वर्षांचा मुलगा प्रियम चक्रवर्ती यांचे मृतदेह आढळून आले. सर्व मृतदेह तातडीने ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी (पान २ वर)

# जगातील प्रतिभेला भारताकडे आकर्षित करा

## अंतराळ स्टार्टअप्सना मोदींचे आवाहन

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**



भारताला जागतिक अंतराळ क्षेत्रातील नवोन्मेषाचे केंद्र बनविण्यासाठी खासगी अंतराळ क्षेत्राभोवती असे वातावरण निर्माण करा की, जगभरातील तरुणांना करिअरसाठी भारताची निवड करावीशी वाटेल, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. शुक्रवारी २० अंतराळ स्टार्टअप्सच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना मोदी यांनी भारताच्या कमी खर्चातील अंतराळ प्रक्षेपण क्षमता आणि मोठ्या प्रतिभावान मनुष्यबळाचे महत्त्व अधोरेखित केले. भारतातील तरुणांमध्ये जोखीम घेण्याची क्षमता अधिक असल्याने देश जागतिक अंतराळ क्षेत्रात वेगाने आघाडी घेऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. अंतराळ क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले केल्यानंतर अमेरिका आणि युरोपमध्ये कार्यरत अनेक भारतीय नागरिक मायदेशी परतून काम करण्यास इच्छुक असल्याचे एका उद्योजकाने सांगितले. त्यावर मोदी यांनी भारतातील स्टार्टअप्स आणि अंतराळ संस्थांशी जोडण्यासाठी जगभरातील प्रतिभेला आकर्षित करण्याची गरज व्यक्त केली. ही प्रतिभा भारताकडे खेचणारा 'चुंबक' बनू शकते, असे ते म्हणाले. सरकारच्या धोरणातील सातत्यामुळे जोखीम घेणाऱ्या उद्योजकांमध्ये विश्वास (पान २ वर)

# राहुल यांचा महिला सक्षमीकरणाचा मुद्दा ढोंगी- फडणवीस

**मुंबई: दि.२३ वृत्तसंस्था**



संसदेत महिला आरक्षण विधेयकाला विरोध करूनही महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारणे, ही लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधींची राजकीय भूमिका ढोंगी आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली. राहूल यांनी पुण्यात विद्यार्थिनींशी साधलेल्या संवादाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे भाष्य केले.

नागपूरमधील एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस हा केवळ दिखावा करणारे आणि बढाया मारणारे लोक असलेला दिशाहीन पक्ष आहे, जे केवळ टीव्हीवर चर्चेत राहण्यासाठी भाषणे करतात, असे ते म्हणाले. राहुल गांधी यांनी शनिवारी पुण्यात छात्रों की गूंज या संवाद कार्यक्रमात विद्यार्थिनींशी चर्चा केली. यावेळी त्यांनी मनुस्मृतीवादी मानसिकतेवर टीका केली आणि महिलांना पितृसत्ताक पद्धती मोडून काढण्याचे आवाहन केले. तसेच, जंतरमंतर येथील आंदोलनादरम्यान मुलींनी अपशब्द वापरल्याचे ऐकून धक्का बसल्याचे विधान करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही त्यांनी निशाणा साधला. मुख्यमंत्री म्हणाले, राहूल यांनी भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या प्रश्नाचे आधी उत्तर द्यावे. हा प्रश्न महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देण्यास ते का नकार देतात, याबद्दलचा आहे. देशाच्या घटनात्मक प्रक्रियेत संसद ही सर्वोच्च संस्था आहे आणि तिथे ३३ टक्के खासदार महिला असाव्यात यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. पुण्यात येऊन महिलांबद्दल बोलायचे आणि ज्या विधेयकामुळे त्यांना खऱ्या अर्थाने अधिकार मिळतील, त्यालाच विरोध करायचा; ही राहुल गांधींची ढोंगी भूमिका आहे. मंचावरून गांधींनी महिला सक्षमीकरणाबद्दल भाषण केले असले, तरी महिलांना अधिकार देणाऱ्या सर्वात क्रांतिकारी पाऊल असलेल्या महिला आरक्षण विधेयकाला त्यांनी विरोध केला आहे आणि त्याच्या विरोधात मतदानही केले आहे. त्यांना महिलांना अधिकार द्यायचे नाहीत. त्यांच्या बोलण्यात आणि कृतीत तफावत आहे, असे मला वाटते. दररोज भाषणे ठोकणे आणि टीव्हीच्या माध्यमातून चर्चेत राहणे, (पान २ वर)

### स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव वाढला

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीत स्वाईन फ्लयूच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली सरकारने नागरिकांसाठी आरोग्य मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे आणि लक्षणे दिसताच तत्काळ वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन केले आहे.

आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीत या वर्षात आतापर्यंत ११ स्वाईन फ्लयूचे १,७७७ हून अधिक रुग्ण आढळले आहेत. त्यातच गुरुवारी एका दिवसात ११४ नव्या (पान २ वर)

# पाच हजार विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मोफत ऑनलाइन मार्गदर्शन

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय



**पुणे : दि.२३ वृत्तसंस्था**

राज्यातील सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मोफत ऑनलाइन मार्गदर्शन देण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. या मार्गदर्शन कार्यक्रमाची व्यवहार्यता, रूपरेषा, धोरण निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाने सहा सदस्यांची विशेष समिती नियुक्त केली असून, अहवाल सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

उच्च संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी याबाबतची माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात विविध स्पर्धा परीक्षार्थ्यांना मोफत ऑनलाइन शिकवणीची सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. त्या पार्श्वभूमीवर, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या राज्यातील पाच हजार विद्यार्थ्यांना (पान २ वर)

# कळकळीची विनवणी खवड्या डोंगरावरील घटनेचा नवा हृदयद्रावक व्हिडीओ समोर

## 'जीव देऊ नको, जीवन पुन्हा नाही'; मुलासमोर आई नतमस्तक पण...

**छत्रपती संभाजीनगर: दि.२३ वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगरमधील वाळूंज औद्योगिक वसाहत परिसरातील तिसगावजवळ असलेल्या खवड्या डोंगरावर शुक्रवारी एक धक्कादायक घटना घडली. एका तरुणाने खवड्या डोंगरावरून उडी मारून जीवन संपवल्याची घटना घडली. या तरुणाला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना वडिलांचाही तोल गेला आणि त्यानंतर आईनेही डोंगरावरून उडी घेतली. या घटनेत मुलगा, आई आणि वडील अशा तिघांचाही मृत्यू झाला.

शुक्रवारी (२१ ऑगस्ट) दुपारी १ च्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर राज्यभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. खवड्या डोंगरावरुन



उडी मारून जीवन संपवल्याच्या या घटनेबाबत आता वेगवेगळी कारणं समोर येत आहेत. कुणाल (वय १८) असं या तरुणाचं नाव होतं. त्याला आयफोन हवा होता म्हणून त्याने अशा प्रकारचं पाऊल उचलल्याची चर्चा सोशल मीडियावर आहे. मात्र, या घटनेला फक्त आयफोन हे एकच कारण नसल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. ही घटना कशामुळे घडली? यामागचं कारण काय? याचा तपास आता पोलीस करत आहेत. खवड्या डोंगरावर घडलेल्या या घटनेदरम्यानचे आणि मुलगा कुणाल व त्याची आई यांचे जुने काही व्हिडीओ आता व्हायरल होत आहेत. दरम्यान, खवड्या डोंगरावर घडलेल्या घटनेदरम्यानचा एक नवा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओत कुणालची आई त्याला हात जोडून विनवणी करताना दिसत आहे. 'जीव देऊ नको, जीवन पुन्हा नाही' अशी विनवणी आई कुणालला करत आहे. मात्र, तरीही तो ऐकत नसल्याने शेवटी आई त्याच्यासमोर गुडघे टेकून नतमस्तक होऊन मुलाला कळकळीची विनवणी करत असल्याचं व्हिडीओत दिसत आहे.

शेवटी मुलगा ऐकत नसल्याचं पाहून कुणालची आई डोंगराच्या उतारावर त्याच्या अगदी जवळ उभी जाऊन त्याच्याशी संवाद साधताना दिसत आहे. आई खाली बसते आणि जमिनीवर पडलेल्या हेल्मेटकडे बोट दाखवते. त्यावर कुणालही काहीतरी प्रतिसाद देताना दिसत आहे. यावेळी त्या ठिकाणी जमलेले इतर लोकही कुणालला मागे येण्याची विनंती करताना दिसत असल्याचं व्हिडीओत ऐकू येत आहे. शेवटी आई गुडघ्यावर बसते आणि कुणालसमोर नतमस्तक होते, कळकळीची विनवणी करते. पण तरीही तो डोंगराच्या टोकाजवळच उभा राहिलेला दिसत आहे आणि शेवटी या घटनेत मुलगा, आई आणि वडील अशा तिघांचाही मृत्यू झाला आहे.

## पान 1 वरून...

### कन्नड घाटात एसटी बस...

लक्षात येताच प्रवाशांनी आरडाओरड सुरू केली. मात्र, काही प्रवाशांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा जीव वाचविण्यासाठी खिडक्यांमधून बाहेर पडण्याचा मार्ग स्वीकारला. एकामागोमाग एक प्रवासी बसमधून बाहेर पडले. काही वेळातच अनेक प्रवासी सुरक्षितपणे बाहेर आले. या थरारक प्रसंगातून बाहेर पडल्यानंतर प्रवाशांनी अक्षरशः सुटकेचा निःश्वास सोडला. या अपघातात चार प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले. सुदैवाने कोणत्याही प्रवाशाला गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर आलेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त बसची पाहणी करण्यात आली असून प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली. अपघातामुळे घाट परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघाताची तीव्रता लक्षात घेता सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. बस दरीत कोसळली नसल्याने मोठी दुर्घटना टळली. प्रवाशांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळेही परिस्थिती अधिक गंभीर होण्यापासून रोखली गेली. जळगावचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी या घटनेची माहिती देताना बसमध्ये ५९ प्रवासी असल्याचे सांगितले. चार प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### बांगलादेशात हिंदू कुटुंबाची...

रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलीस आणि सीआयडीच्या तपास पथकाने घटनास्थळाचा ताबा घेऊन सखोल पंचनामा केला. तपासादरम्यान गणपती चक्रवर्ती यांचा मृतदेह छतावर, त्यांची पत्नी व मुलीचे मृतदेह जिन्यावर, तर १२ वर्षांच्या लहान मुलाचा मृतदेह पलंगाखाली आढळला. घरातील कपाटांची कुलुपे तोडलेली होती आणि सर्व सामान अस्ताव्यस्त विखुरलेले होते. यामुळे ही हत्या दरोड्याच्या उद्देशाने किंवा लूटमारीच्या प्रयत्नातून झाली असावी, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. फॉरेन्सिक टीम आणि गुप्तचर यंत्रणांच्या मते, सर्व पीडितांचा गळा दाबून अत्यंत क्रूरपणे खून करण्यात आला आहे. ही हत्या गुरुवारी मध्यरात्री ते शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान झाली असावी, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गुरुवारी दुपारनंतर कुटुंबातील सर्व सदस्यांचे मोबाईल फोन बंद असल्याने नातेवाईकांचा त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नव्हता, ज्यानंतर ही धक्कादायक बाब उघडकीस आली. मृत शिक्षक गणपती चक्रवर्ती हे अत्यंत नम्र, शांत आणि मनमिळाऊ स्वभावाचे होते, अशी माहिती त्यांच्या शेजाऱ्यांनी व नातेवाईकांनी दिली आहे. निवृत्तीनंतर ते होमिओपॅथीचे वैद्यकीय कामही करत होते.

### ट्रेनमध्ये आढळले महिलेच्या...

६ ऑगस्ट रोजी आग्रा कॅन्ट रेल्वे स्टेशनवर तमिळनाडू एक्सप्रेसच्या जनरल डब्यात एक संशयास्पद पिशवी असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाला मिळाली होती. सुटकेसमधून काही भाग बाहेर आल्याचे दिसल्यानंतर पोलिसांनी ती उघडली असता, त्यात कुजलेल्या अवस्थेतील मानवी अवशेष आढळून आले होते. सुटकेसच्या आत चेन्नई असे नाव छापलेली एक प्लास्टिक पिशवी सापडली होती. याच सुगाव्याच्या आधारे पोलिसांनी चेन्नई सेंट्रल स्टेशन आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच रेल्वे प्रवासाच्या नोंदी तपासण्यास सुरुवात केली. सध्या मृतदेहाचे अवशेष शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून, त्याद्वारे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### भुलेश्वरचा राजाची मूर्ती कोसळली...

असताना शनिवारी मूर्तीच्या आगमनाच्यावेळी घडलेल्या या घटनेमुळे मुंबईतील प्रसिद्ध गणेशोत्सवाला गालबोट लागले आहे. शनिवारी रात्री झालेल्या या दुर्घटनेत भुलेश्वरचा महाराजा मंडळाचे अध्यक्ष संकेत नेवशे यांच्यासह दोन जणांचा मृत्यू झाला. संकेत नेवशे हे शिवसेना (शिंदे) पक्षाचे उपविभागप्रमुखही होते. धक्कादायक म्हणजे मंडपाच्या काही अंतरावर असतानाच हा दुर्दैवी प्रकार घडला. गणपतीच्या मूर्तीला लॉक होता, तो तुटला की काय झालं हे माहिती नाही. पण उभी मूर्ती होती, ती पुढच्या बाजूला कोसळली. यामध्ये भुलेश्वरचा राजा मंडळाचे अध्यक्ष संकेत नेवशेचा मृत्यू झाला. तो माझा मित्रही होता. मी ज्या इमारतीत राहतो, त्यात सातव्या माळ्यावर राहणाऱ्या ब्रिजेश जोशी हा गणेशभक्त आहे. तरुण मुलगा होता, त्याला दोन वर्षांचा बाळ आहे. त्याच्या घरच्यांचं दुःख आपण समजू शकतो'', अशी माहिती प्रत्यक्षदर्शीने न्यूज १८ मराठीला दिली. यात कोणालाही दोष देता येत नाही, मूर्ती ट्रॉलीवर होती, लोक जल्लोषाने येत होते. ५० फुटांचा मंडप होता.

### स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव वाढला...

बाधितांची नोंद झाली. चालू वर्षात इन्फ्लूएंझा-ए च्या रुग्णांची संख्या २,३०० च्या पार गेल्याने प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे.इन्फ्लूएंझा किंवा फ्लू हा श्वसनसंस्थेचा एक संसर्गजन्य आजार आहे, ज्यात नाक, घसा, श्वासनलिका आणि वायुकोश यांवर परिणाम होतो. ११ या इन्फ्लूएंझा ए प्रकारच्या विषाणूमुळे होणारा फ्लू म्हणजे स्वाईन फ्लू. त्याची पहिली मोठी साथ २००९ मध्ये आली होती. हा विषाणू बाधित व्यक्तीकडून खोकताना, शिंकताना, बोलताना किंवा श्वास घेताना बाहेर पडणाऱ्या तुषारांतील सूक्ष्म कणांद्वारे पसरतो. ताप, खोकला, घसा खवखवणे, अंगदुखी, डोकेदुखी किंवा श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे आढळल्यास, स्वतःहून औषधोपचार करण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन लोकांना करण्यात आले आहे.

### राहुल यांचा महिला सक्षमीकरणाचा...

एवढेच त्यांचे काम आहे. ते यापलीकडे काहीच करत नाहीत. त्यांचा जमिनीवरील वास्तवाशी संपर्क तुटला आहे. हा पक्ष आता केवळ निवेदने जारी करण्यापुरताच मर्यादित राहिला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरमध्ये जेन झीसोबत संवाद साधला. यादरम्यान त्यांना राजकारणाचं क्षेत्र कसं निवडलं ते मुख्यमंत्री पदाचा प्रवास याबद्दचे काही अनुभव सांगितले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तसं तर हिंदी चित्रपटात अनिल कपूर एका दिवसाचेही मुख्यमंत्री बनतात, पण ते इतके सोपे नाही. बघा, या देशात आपल्या संविधानाने लोकशाही दिली आहे आणि या लोकशाहीची खासियत ही आहे की, जो देवेंद्र फडणवीस कधी हा विचारही करू शकत नव्हता की तो नगरसेवक बनेल, तो मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचला.

### जगातील प्रतिभेला भारताकडे...

निर्माण झाला असल्याचेही मोदी यांनी नमूद केले. भारतात खर्चाच्या दृष्टीने मोठी स्पर्धात्मकता असून प्रतिभेची कोणतीही कमतरता नाही, असे त्यांनी सांगितले. स्कायरूट एअरोस्पेसने भारताचे पहिले खासगी रॉकेट कक्षेत यशस्वीपणे प्रक्षेपित केले असून, २०२७च्या मध्यापर्यंत महिन्याला एक प्रक्षेपण करण्याचे लक्ष्य असल्याचे स्टार्टअप्सनी सांगितले. भविष्यात आठवड्याला एक आणि पुढे दररोज अनेक प्रक्षेपण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले. मोदी यांनी अंतराळ तंत्रज्ञानाचा वापर शेती, पशुधन, दुग्धव्यवसाय आणि पर्यावरणासह दैनंदिन जीवनातील विविध क्षेत्रांत वाढविण्याचे आवाहन केले.

### पाच हजार विद्यार्थ्यांना स्पर्धा...

मोफत मार्गदर्शनाचा निर्णय घेतला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित मुंबई, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर अशा सहा ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वप्रशिक्षण केंद्रे आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून मोफत ऑनलाइन मार्गदर्शन उपक्रम राबविण्यात येणार आहे. गरजू आणि प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. राज्यातील सहाही प्रशिक्षण केंद्रांच्या एकत्रित सहभागातून प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवहार्यता आणि रूपरेषा निश्चित करणे, ऑनलाइन प्रशिक्षणासाठी आवश्यक तंत्रज्ञान, तज्ज्ञ प्राध्यापकांचे राज्यव्यापी नेटवर्क विकसित करण्यासाठी उपाययोजना सुचवणे, प्रशासकीय सेवांच्या बदलत्या अभ्यासक्रमानुसार ऑनलाइन प्रशिक्षणाचे स्वरूप, समाईक वेळापत्रक, अभ्यास साहित्याची उपलब्धता याबाबत धोरण ठरवणे, ऑनलाइन प्रशिक्षणासाठी पात्र विद्यार्थ्यांची निवडप्रक्रिया, त्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# आयएसएफमधून राजीनामा देताच अराबुल इस्लाम यांच्या गाडीवर बॉम्बहल्ला

**कोलकाता :, दि. २३** वृत्तसंस्था



तृणमूल काँग्रेसचे माजी नेते आणि माजी आमदार अराबुल इस्लाम यांच्या गाडीवर शनिवारी रात्री भांगर येथे देशी बॉम्ब आणि विटांनी हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. विशेष म्हणजे, या घटनेच्या एक दिवस आधीच इस्लाम यांनी इंडियन सेक्युलर फ्रंट (आयएसएफ)च्या प्राथमिक सदस्यत्वासह पक्षातील पदांचा राजीनामा दिला होता. या हल्ल्यासाठी त्यांनी थेट आयएसएफला जबाबदार धरले आहे. मात्र, आयएसएफकडून याबाबत अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

इस्लाम यांच्या म्हणण्यानुसार, उरियापाडा परिसरातून जात असताना त्यांच्या वाहनावर आधी विटा फेकण्यात आल्या. त्यानंतर दोन देशी बॉम्ब फेकण्यात आले. त्यापैकी एक बॉम्ब वाहनावर न पडता रस्त्यावरच फुटला. दगडफेकीमुळे वाहनाची पुढील काच फुटली. मात्र, चालकाने प्रसंगावधान राखून गाडी वेगाने तेथून बाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टळली. वाहनात इस्लाम यांच्यासह अन्य काही जणही होते.

घटनेची माहिती मिळताच पोलहाट पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांची ओळख पटवण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासले जात आहे. हल्ल्यामागील नेमके कारण आणि आरोपी कोण आहेत, याचा तपास सुरू असून, अद्याप कोणालाही अटक किंवा ताब्यात घेण्यात आलेले नाही.

अराबुल इस्लाम यांच्या वाहनावर यापूर्वीही हल्ला झाल्याचे आरोप झाले आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी उमेदवारी अर्ज दाखल करून परतत असताना त्यांच्या वाहनावर आणि समर्थकांवर दगडफेक व हल्ला झाल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यावेळी वाहनांची तोडफोड आणि कार्यकर्त्यांवर हल्ल्याच्या घटना घडल्याचे सांगण्यात आले होते.

इस्लाम हे भांगरमधील तृणमूल काँग्रेसच्या राजकारणातील प्रमुख नेत्यांपैकी एक होते. पक्षांतर्गत मतभेदानंतर त्यांनी तृणमूल काँग्रेस सोडून नौशाद सिद्दिकी यांच्या नेतृत्वाखालील आयएसएफमध्ये प्रवेश केला होता. विधानसभा निवडणुकीत आयएसएफने त्यांना कॅनिंग पश्चिम मतदारसंघातून उमेदवारी दिली; मात्र त्यांचा पराभव झाला.

दरम्यान, शुक्रवारी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे इस्लाम यांनी आयएसएफच्या नेतृत्वावर हुकूमशाहीचा आरोप करत पक्षातील सर्व पदांसह प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा जाहीर केला होता. त्यानंतर अवघ्या एका दिवसात त्यांच्या वाहनावर झालेल्या हल्ल्यामुळे भांगरमधील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

## साखरेचा दर ७५ रुपयांवर; दरवाढीचा शेतकऱ्यांना फायदा होईल

**सोलापूर :, दि. २३** वृत्तसंस्था

सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या घरगुती अर्थसंकल्पावर परिणाम होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी सुमारे ५० रुपये किलो दराने मिळणारी साखर आता ७० ते ८० रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. इथेनॉल निर्मितीमुळे साखरेची उपलब्धता कमी झाल्याने दरवाढ झाल्याचे बाजारातील जाणकारांचे मत आहे. दरम्यान, या वाढत्या दराचा काही प्रमाणात फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होऊ शकतो, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे. सोलापुरात बोलताना भरणे यांनी साखरेचा दर सध्या सुमारे ७५ रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले. बँकांच्या कर्जामुळे अनेक साखर कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणात साखरेचा साठा उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. ज्या कारखान्यांकडे तुलनेने अधिक साठा आहे, त्यांना सध्याच्या दरवाढीचा फायदा होण्याची शक्यता आहे.

साखर साठवणुकीची क्षमता मर्यादित असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही या परिस्थितीचा काही प्रमाणात लाभ मिळू शकतो, असे भरणे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्यातील काही भागांत अद्याप पावसाची प्रतीक्षा कायम आहे. धरणांमध्ये पाणी उपलब्ध असले, तरी कालव्यांची क्षमता आणि पाणी वितरणाच्या मर्यादांमुळे गरजेनुसार सर्व भागांमध्ये पाणी पोहोचवणे शक्य होत नसल्याचे भरणे यांनी सांगितले. आगामी काळात चांगला पाऊस होणे आवश्यक असून, पावसामुळे साठवण तलाव आणि पाझर तलाव भरल्यास शेतकऱ्यांची चिंता काही प्रमाणात कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

निमगाव येथील वावडी महोत्सव आणि हिरकणी मेळाव्यात तरुणांशी संवाद साधताना भरणे यांनी आपल्या मोकळ्या स्वभावाबाबतही भाष्य केले.

## कापूरहोळमध्ये शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**पुणे :, दि. २३** वृत्तसंस्था

पुणे-सातारा महामार्गावरील कापूरहोळ येथे भोर तालुक्यातील भोंगवली गावातील प्रस्तावित पुणे ट्रान्समिशन-३ कंपनीच्या उच्चदाब वीज उपकेंद्र आणि टॉवर लाइन प्रकल्पाविरोधात शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. भोर आणि राजगड तालुक्यातील शेकडो शेतकरी व नागरिक महामार्गावर एकत्र आल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. आंदोलनाला खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट देत आंदोलकांशी संवाद साधला. प्रकल्प रद्द करण्यासाठी मुख्यमंत्री यांनी स्पष्ट शब्द द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलकांच्या वतीने आपण मुख्यमंत्र्यांची तातडीने भेट घेणार असल्याचेही सुळे यांनी सांगितले. सुळे म्हणाल्या की, भोर आणि राजगड तालुक्यातील विविध पक्षांतील नागरिक या प्रश्नासाठी एकत्र आले आहेत. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी तसेच अटकेत असलेल्या चार जणांची सुटका करण्यासाठी कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच संघर्ष समितीशी चर्चा करून पुढील लढा अधिक प्रभावीपणे उभारला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, प्रस्तावित उच्चदाब वीज उपकेंद्र आणि टॉवर लाइन प्रकल्पाविरोधात माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या अध्यक्षतेखाली 'सबस्टेशन व टॉवर लाइन हटाव संघर्ष समिती' स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून प्रकल्पाविरोधात व्यापक आंदोलन उभारण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

प्रस्तावित ७६५ केव्ही क्षमतेची मोठी टॉवर लाइन भोर तालुक्यातील ७१ आणि राजगड तालुक्यातील ४५ अशा एकूण ११६ गावांतून जाणार असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. या प्रकल्पामुळे सुपीक शेतजमिनी बाधित होण्याबरोबरच ग्रामीण भागातील विकासावरही विपरीत परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

प्रकल्पामुळे हजारो शेतकरी, भूमिहीन आणि अल्पभूधारक होण्याची शक्यता असल्याचा दावा करत बाधित गावांतील शेतकऱ्यांनी प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यामुळे प्रकल्प रद्द करण्याची मागणी करत आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संघर्ष समितीने दिला आहे.

# अंधश्रद्धामुक्त महिला हेच अंनिसचे मिशन!

## अंनिस महिला आघाडी प्रदेश संघटक छाया सावरकर यांचे मत

**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी




**अकोला, दि. २३ :** महिला अंधश्रद्धेच्या वाहक आहेत हे अर्धसत्य आहे,कारण वाहक कमी बळी जास्त आहेत म्हणून महिलांनी अंनिस चळवळीत सहभागी व्हायला हवे असे आवाहन अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती महिला आघाडीच्या प्रदेश संघटक छाया सावरकर यांनी आज येथे केले.

त्या महिला सहविचार बैठकीत बोलत होत्या. स्थानिक शासकीय विश्रामगृहात झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी प्रदेश सहसंघटक अशोक घाटे,तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.स्वप्ना लांडे, महिला जिल्हा संघटक ॲड.रुपाली राऊत,डॉ. उपज देशमुख,शरद वानखडे ,ॲड.अनिल लव्हाळे होते.

आजच्या प्रगत काळातही महिला ह्याच सावज आहेत,त्यात देव,धर्माच्या नावाखाली तिचे शोषण करायला टपलेले भोंदू सगळ्याच धर्मात वाढले आहेत,त्यामुळे आता प्रत्येक कुटुंबाने घरातील एका महिलेला अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत जाणीवपूर्वक पाठवले पाहिजे तरच प्रत्येक महिला स्वतासह कुटुंबाचे अंधश्रद्धा आणि बुवाबाजी पासून रक्षण करू शकेल असेही छाया सावरकर पुढे बोलताना म्हणाल्या. शिक्षित महिलांना धर्म,संस्कृती आणि आस्थेच्या गोंडस नावाखाली अंधश्रद्धेच्या घाईत ओढले जात आहे,तर अडाणी महिला अज्ञानातून तिकडे जात आहेत,ही मातृशक्ती त्यापासून वाचविणे हीच सर्वात मोठी देशभक्ती असल्याचेही सावरकर म्हणाल्या.

यावेळी अकोला जिल्हा अंनिसच्या महिला आघाडीची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. नवनियुक्त कार्यकारिणीचे छाया सावरकर आणि मान्यवरांनी स्वागत केले.जिल्ह्यात लवकरच महिला आघाडीचे प्रशिक्षण शिबिर घेतले जाणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.या सभेचे संचालन आणि आभार प्रदर्शन जिल्हा संघटक ॲड.रुपाली राऊत यांनी केले.

### नवी जिल्हा कार्यकारिणी

» जिल्हाध्यक्ष :डॉ. उपज देशमुख, उपाध्यक्ष: सपना गव्हाळे, जिल्हा संघटक: ॲड. रूपाली राऊत,सचिव: रूपाली अमोल ठाकरे, सहसचिव: अंजली नरेंद्र इंगळे, कोषाध्यक्ष : राजश्री आवारे, प्रसिद्धी प्रमुख:ॲड. वैष्णवी हागोने ,सोशल मीडिया प्रमुख: वैशाली टीकार, कार्यकारिणी सदस्य उमाताई महले, स्मिता मनोहर इंगळे, विश्रांती इंगळे सीमा वानखडे, भारती उपाध्ये.

## महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेत बदलासाठी 'मिशन मोड'; शाळांच्या आधुनिकीकरणावर भर

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था



महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेत व्यापक आणि दृश्यमान बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण विभागाने 'मिशन मोड'वर काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुंबईतील नंदनवन बंगल्यावर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत राज्यातील शिक्षण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शाळांचे आधुनिकीकरण, शिक्षकांचे सक्षमीकरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पष्ट व कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या गरजा आणि अपेक्षा बदलत असल्याने त्यानुसार शाळांमध्येही आवश्यक बदल करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचे घटक असल्याने त्यांच्या प्रशिक्षण, कौशल्यवृद्धी आणि प्रोत्साहनावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना सन्मान व प्रोत्साहन देण्यासाठीही विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. कृती आराखडा तयार करताना शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांचा सहभाग घेण्यावर भर देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांचा विकास केवळ अभ्यासक्रम आणि परीक्षांपुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकासाला प्राधान्य देण्याचे शिंदे यांनी सांगितले. आरोग्य तपासणी, पोषण, मध्यान्ह भोजन आणि मानसिक आरोग्याशी संबंधित उपक्रम अधिक प्रभावी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

शाळांच्या विकासात पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक समाजाचा सहभाग वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आमदार आणि खासदारांनी त्यांच्या मतदारसंघातील शाळा दत्तक घेऊन विकासकामांना हातभार लावावा, असे आवाहनही करण्यात येणार आहे.

शाळांच्या आधुनिकीकरणासाठी उद्योग आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ज्ञांची व्यावसायिक मदत घेण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. तंत्रज्ञान, कौशल्य, प्रशिक्षण आणि आवश्यक संसाधनांच्या माध्यमातून शाळांना सहकार्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कृती आराखड्याची अंमलबजावणी योग्य दिशेने सुरू आहे की नाही, यासाठी दर आठवड्याला प्रगतीचा आढावा घेतला जाणार आहे. राज्यातील शाळांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक सक्षम करणे, हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

## नागावमध्ये प्लास्टिक स्क्रॅपच्या गोदामाला भीषण आग



**हातकणंगले :, दि. २३** वृत्तसंस्था

तालुक्यातील नागाव येथील संभाजीनगर परिसरातील 'सहारा प्लास्टिक स्क्रॅप' गोदामाला आज भीषण आग लागली. गोदामात मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा साठा असल्याने काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. या दुर्घटनेत कोट्यवधी रुपयांचे प्लास्टिक आणि अन्य साहित्य जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

आगीचे मोठमोठे लोट आणि धुराचे ढग ८ ते १० किलोमीटर अंतरावरूनही स्पष्ट दिसत होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. आगीची माहिती मिळताच शेकडो नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कोल्हापूर महापालिका, स्थानिक नगरपालिका आणि आसपासच्या भागातील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. प्लास्टिकचे ज्वलनशील साहित्य आणि वाऱ्याचा वेग यामुळे आग अधिकच भडकत असल्याने अग्निशमन दलाच्या जवानांसमोर आग आटोक्यात आणण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, या दुर्घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, गोदामातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून अग्निशमन दल आणि संबंधित यंत्रणांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# विविध मागण्यांसाठी रयत क्रांती संघटनेतर्फे उपोषण सुरुच

## शेतकऱ्यांच्या हितासाठी मागे हटणार नाही- भानुदास शिंदे

**दौंड : दि. २३** प्रतिनिधी




आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सामान्य नागरिक आणि समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांसाठी सद्बुद्धी सरकारला यावी यासाठी रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी १६ ऑगस्ट २०२६ पासून कानगाव ( ता. दौंड ) येथील विठ्ठल मंदिरात आमरण उपोषण सुरू केले आहे. यावेळी शिंदे यांच्यासह कानगाव ग्रामस्थ आणि दौंड तालुक्यातील शेतकरी बांधव यांनी या आमरण उपोषणाला पाठिंबा दिला आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण सुरुच राहील असा इशारा शिंदे यांच्यासह ग्रामस्थ व उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

या उपोषणामध्ये समाजातील विविध घटकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित एकूण १० प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

- कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा. चालू बाकी असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपये अनुदान द्यावे.
- कानगाव येथील अदाणी सिमेंट कंपनी व श्री सिमेंट कंपनीमुळे वाढलेले प्रदूषण तातडीने नियंत्रणात आणावे. प्रदूषण नियंत्रणात येत नसेल तर कंपन्यांवर कठोर कारवाई करावी.
- प्रपंच आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसह सर्व घटकांची एक वर्षासाठी सक्तीची कर्जवसुली थांबवावी.
- सर्व कर्ज प्रकरणांमध्ये सिबिल स्कोअरची अट रद्द करावी.
- दौंड तालुक्यासह राज्यातील रखडलेल्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू कराव्यात.
- रुग्णाचा रुग्णालयात मृत्यू झाल्यास रुग्णालयाचे बिल माफ करावे अथवा शासनाने भरावे.
- उजनी धरणासाठी संपादित झालेल्या तसेच शिल्लक असलेल्या जमिनींबाबत संबंधित मूळ जमीन मालकांना न्याय देऊन त्यांच्या जमीनी परत मिळाव्यात.
- वीज बिलमाफीच्या योजनेत ७. ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे कृषी पंपधारक शेतकरी यांचाही समावेश करावा.
- शेतमालाच्या बाजारभावाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी संविधानाच्या नव्याने समाविष्ट केलेल्या परिशिष्ट ९ मधील आवश्यक वस्तू कायद्याच्या कक्षेतून शेतीमाल वगळावा.
- मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत आरक्षण मिळत नसेल तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्पभूधारक मराठा समाजातील बांधवांना शिक्षण, व्यवसाय, शेती व आरोग्यासाठी बिगर व्याजी, बिगर तारण व बिगर सिबिल स्कोअर कर्जपुरवठा करावा.

अशा प्रमुख मागण्या आमरण उपोषणातून प्रशासनापुढे मांडण्यात आल्या.

CHANGE IN NAME

I Have Changed My Old Name From SIDDIQUE ZAKERA BI MUHIBUR RAHEMAN (As per Old Passport Name/Wrong Name) TO ZAKERA TABASSUM MOHIBUR RAHMAN. (New Name As Per On Two Photo ID) Passport No. L 2578842
Address- (If As Per Old Passport Or If Change Then As Per Aadhaar). W/O Mohibur Rahman, Bihind Baldar Hafiz Masjid, Kagzipura, Balapur, Taluka: Balapur-POST: Balapur, DIST: Akola, Maharashtra.
Pin- 444302

महत्त्वाचे

## अमेरिकेत पंजाबच्या तरुणाची गोळ्या झाडून हत्या



**चंदीगड :** अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात पिझ्झा पोहोचवताना पंजाबच्या कपूरथला जिल्ह्यातील २८ वर्षीय गुरदीप सिंग प्यारा लाल याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. रिचमंड स्ट्रीट परिसरात अज्ञात सशस्त्र व्यक्तीने लुटमारीच्या उद्देशाने त्याच्यावर गोळीबार केल्याचा आरोप आहे.
गुरदीप सुमारे १३ वर्षांपूर्वी अमेरिकेत गेला होता. कुटुंबावरील कर्ज फेडून आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तो रात्रंदिवस काम करत होता. त्याच्या मृत्यूची बातमी जब्बोवाल गावात पोहोचताच शोककळा पसरली.
गुरदीपचा मृतदेह भारतात आणण्यासाठी केंद्र आणि पंजाब सरकारने मदत करावी, तसेच आरोपीला अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. गुरदीप अविवाहित होता. त्याचे वडील आणि भाऊ ध्वनिव्यवस्था व संगीत कार्यक्रमांमध्ये काम करतात. कुटुंबातील तरुण मुलाच्या मृत्यूने त्यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे.

## बुलेट ट्रेनसाठी १६ चालक जपानमध्ये प्रशिक्षित

**मुंबई :** देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या संचालनासाठी आवश्यक मनुष्यबळाची तयारी वेगाने सुरू झाली आहे. नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने () प्रकल्पासाठी १६ हायस्पीड रेल्वे चालकांची नियुक्ती केली असून, या सर्व चालकांना जपानमध्ये तब्बल एक वर्षाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. जपानी शिंकान्सेन तंत्रज्ञानावर आधारित या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी चालकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच सुरक्षा मानके, कार्यपद्धती आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची एकूण लांबी ५०८ किलोमीटर आहे. गुजरातमधील वापी ते साबरमती हा टप्पा डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तर मुंबई ते साबरमती हा संपूर्ण मार्ग डिसेंबर २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. रेल्वे मार्ग, विद्युतीकरण, सिग्नलिंग, दूरसंचार आणि अन्य पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाल्यानंतर प्रवासी सेवा सुरू करण्याची अचूक वेळ निश्चित केली जाणार आहे.नियुक्त केलेल्या बुलेट ट्रेन चालकांचा समावेश अ-कार्यकारी-४ श्रेणीत करण्यात आला आहे. त्यांना ४० हजार ते १.२५ लाख रुपयांची औद्योगिक महागाई भत्ता वेतनश्रेणी लागू आहे. याशिवाय च्या नियमांनुसार विविध भत्ते आणि अन्य सुविधा मिळणार आहेत.

# थिएटरायझेशनला विरोध नाही; मात्र टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी हवी-हवाई दलप्रमुख ए. पी. सिंह

**कानपूर :दि.२३** वृत्तसंस्था



देशाच्या लष्करी सज्जतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या थिएटरायझेशन योजनेला भारतीय हवाई दलाचा विरोध नसल्याचे हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी स्पष्ट केले. मात्र, या योजनेची अंमलबजावणी घाईघाईने न करता टप्प्याटप्प्याने करणे आवश्यक आहे, जेणेकरून सध्याच्या लष्करी रचनेत कमीत कमी व्यत्यय निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.
कानपूरमधील चकेरी येथील हवाई दलाच्या सारंग सभागृहात हरजिंदर सिंह यांच्या पहिल्या स्मृतिव्याख्यान आणि मासिक प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला हवाई दलप्रमुख ए. पी. सिंह उपस्थित होते. यावेळी त्यांनी देशाची लष्करी सज्जता, थिएटरायझेशन आणि संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेबाबत हवाई दलाची भूमिका स्पष्ट केली.
थिएटरायझेशनबाबत भूमिका मांडताना ए. पी. सिंह यांनी सांगितले की, देशाच्या हितासाठी असलेल्या प्रत्येक उपक्रमाचा स्वीकार करण्यास हवाई दल तयार आहे. मात्र, या प्रक्रियेमुळे सध्याच्या लष्करी यंत्रणेत मोठी उलथापालथ होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. थिएटरायझेशनची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवल्यास विद्यमान संरचनेवर होणारा परिणाम कमी करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.
हवाई दल ज्या प्रकारच्या थिएटरायझेशनच्या स्वरूपाला विरोध करत असल्याचे अनेकदा माध्यमांमध्ये चित्रित केले जाते, त्या स्वरूपाला आपला आक्षेप असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या 'ऑपरेशन सिंदूर' सुरू असल्याचा उल्लेख करत ते म्हणाले की, कोणत्याही संभाव्य आव्हानाला सामोरे जाण्यासाठी हवाई दलाने पूर्णपणे सज्ज राहणे आवश्यक आहे.

> संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या क्षमतेच्या पार्श्वभूमीवर हवाई दलप्रमुखांचे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. लष्करी संरचनेत बदल करताना सज्जता कायम ठेवण्यासोबतच देशांतर्गत संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञान क्षमता वाढवण्यावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

परदेशी मॉडेलचे अंधानुकरण नको संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेवरही ए. पी. सिंह यांनी भर दिला. भारताने परदेशातील कार्यपद्धतींचे अंधानुकरण करण्याऐवजी देशाच्या विशिष्ट धोरणात्मक गरजा लक्षात घेऊन स्वतःची मजबूत संरक्षण व्यवस्था विकसित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.
देशाच्या संरक्षण उत्पादन क्षमतेत वेगाने वाढ करण्यासाठी भारतीय खासगी क्षेत्राने परदेशी उत्पादकांसोबत सहकार्य करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन क्षमता आणि जागतिक अनुभवाचा लाभ घेत भारताने संरक्षण क्षेत्रात स्वतःची क्षमता अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैज्ञानिक आणि देशवासीयांना शुभेच्छा दिल्या. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील वाढत्या जागतिक नेतृत्वाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी मोदी यांनी देशातील २० अंतराळ नवउद्योगांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापकांशी संवाद साधला. भविष्यातील संधींसाठी भारत हे जगाचे प्रमुख केंद्र बनावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## विमान हवेत असताना लॅपटॉपला आग; पाच प्रवासी भाजले

**डॅलस : दि.२३** वृत्तसंस्था



अटलांटा ते डॅलस असा प्रवास करणाऱ्या अमेरिकन एअरलाइन्सच्या विमानात हवेत असतानाच प्रवाशाच्या लॅपटॉपला अचानक आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. विमानाच्या मागील भागात धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसून आल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत चार ते पाच प्रवासी किरकोळ भाजल्याची माहिती आहे. ही घटना २३९८ मध्ये घडली.
या विमानात १३३ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते. विमान डॅलस फोर्ट वर्थ आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ पोहोचत असताना एका प्रवाशाच्या लॅपटॉपला अचानक आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच फ्लाइट अटेंडंट्सनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. वैमानिकानेही एअर ट्रॅफिक कंट्रोलला विमानाच्या मागील भागात आग लागल्याची माहिती दिली.
आगीचा धोका वाढू नये यासाठी कर्मचाऱ्यांनी जळणारा लॅपटॉप विमानाच्या मध्यवर्ती भागात हलवला आणि आग विझविण्याचे प्रयत्न केले. या गोंधळात काही प्रवाशांच्या हातांना किरकोळ भाजल्याचे सांगण्यात येत आहे. एकूण चार ते पाच प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेनंतरही वैमानिकांनी प्रसंगावधान राखत विमानाचे डॅलस फोर्ट वर्थ आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे लँडिंग केले. विमान थेट गेटवर नेण्यात आले. विमानतळावरील वैद्यकीय पथक आणि आपत्कालीन सेवा तातडीने विमानाजवळ पोहोचल्या. जखमी प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

## जपानमध्ये मध्यरात्री ५.९ रिश्टरचा भूकंप; ३७ जण जखमी

**टोकियो : दि.२३** वृत्तसंस्था



जपानच्या कांटो प्रदेशाला रविवारी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास ५.९ रिश्टर स्केलच्या भूकंपाचा जोरदार धक्का बसला. या भूकंपामुळे टोकियोसह इबाराकी, सैतामा, चिबा आणि कानागावा प्रांतांमध्ये हादरे जाणवले. मध्यरात्री नागरिक गाढ झोपेत असताना भूकंप झाल्याने घाबरून उठताना अनेक जण पडले किंवा फर्निचरला धडकले. या घटनांमध्ये किमान ३७ नागरिक जखमी झाल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने दिली.
भूकंपाचा केंद्रबिंदू दक्षिण इबाराकी प्रांतात जमिनीखाली सुमारे ७० किलोमीटर खोलीवर होता. टोकियोच्या अदाची वॉर्डसह इबाराकी, सैतामा आणि चिबा प्रांतांतील काही नगरपालिकांमध्ये भूकंपाची तीव्रता ५ पेक्षा कमी नोंदवण्यात आली. भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आलेला नाही.
प्रशासनाच्या माहितीनुसार, टोकियोमध्ये १५, सैतामा येथे नऊ, कानागावा येथे आठ, चिबामध्ये चार आणि इबाराकीमध्ये एक नागरिक जखमी झाला. कानागावा प्रांतातील योकोहामा येथे ८० वर्षीय महिला पलंगावरून खाली पडल्याने तिच्या कमरेला गंभीर दुखापत झाली. भूकंपाच्या धक्क्याने अचानक जाग आल्याने काही नागरिक बेडवरून पडले, तर काही जण उठताना भिंत किंवा घरातील फर्निचरला धडकले.
भूकंपाचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवरही झाला. टोकियो आणि नारिता विमानतळाकडे जाणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांसह ईशान्येकडील भागात धावणाऱ्या काही लोकल गाड्यांना विलंब झाला. मात्र, शिंकान्सेन बुलेट ट्रेनची सेवा नेहमीप्रमाणे सुरू असल्याचे ईस्ट जपान रेल्वे कंपनीने स्पष्ट केले. दरम्यान, भूकंपामुळे टोकियोच्या पूर्वे कडील कोटो वॉर्डमध्ये भूमिगत जलवाहिनी फुटल्याने रस्त्यावर पाणी साचले होते. तंत्रज्ञांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेत जलवाहिनीची गळती थांबवली. भूकंपग्रस्त भागातील तसेच आसपासच्या परिसरातील ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही.

> भूकंपामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी जपान सरकारने विशेष समिती स्थापन केली आहे. विविध भागांतून माहिती संकलित करून नुकसानीचे मूल्यांकन केले जात आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत याच परिसरात आणखी भूकंपाचे धक्के बसण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## इस्रोचा अंतराळ उद्योगातील नवा अध्याय; रॉकेट निर्मितीची जबाबदारी खासगी क्षेत्राकडे

**नवी दिल्ली : दि.२३** वृत्तसंस्था



इस्रोच्या भूमिकेतील हा बदल भारताच्या अंतराळ क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा ठरण्याची शक्यता आहे. नियमित रॉकेट आणि उपग्रह निर्मितीची जबाबदारी हळूहळू उद्योगांकडे सोपवून इस्रोला संशोधन, नव्या तंत्रज्ञानाचा विकास आणि महत्त्वाकांक्षी वैज्ञानिक मोहिमांवर अधिक लक्ष केंद्रित करता येणार आहे. त्यामुळे आगामी काळात भारताच्या अंतराळ उद्योगात खासगी क्षेत्राचा सहभाग आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

भारताच्या अंतराळ क्षेत्रात मोठा धोरणात्मक बदल होण्याची शक्यता आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो हळूहळू प्रक्षेपण वाहने आणि नियमित उपग्रहांच्या निर्मितीच्या जबाबदारीतून माघार घेत ही कामे खासगी कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे सोपवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्यामुळे इस्रोला संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मोहिमा आणि देशात खासगी क्षेत्राला स्वतंत्रपणे विकसित करणे कठीण असलेल्या प्रगत अंतराळ पायाभूत सुविधांवर अधिक लक्ष केंद्रित करता येणार आहे.
भारतीय राष्ट्रीय अंतराळ प्रोत्साहन व प्राधिकरण केंद्र अर्थात इन-स्पेसचे अध्यक्ष डॉ. पवन गोयनका यांनी 'बिझनेस टुडे'च्या 'इंडिया १०० इकॉनॉमी समिट'मध्ये याबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रक्षेपण वाहनांच्या निर्मितीची जबाबदारी इस्रोकडून खासगी क्षेत्राकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.
या बदलाची सुरुवात 'स्मॉल सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल' अर्थात एसएसएलव्हीपासून झाली आहे. निविदा प्रक्रियेनंतर एसएसएलव्हीचे तंत्रज्ञान आणि उत्पादनाचे अधिकार हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड अर्थात एचएएलकडे सोपवण्यात आले आहेत. त्यामुळे एसएसएलव्हीचे उत्पादन व्यावसायिक पद्धतीने खासगी क्षेत्राच्या सहभागातून केले जाणार आहे.एसएसएलव्हीनंतर भारताचे महत्त्वाचे प्रक्षेपण वाहन पीएसएलव्ही आणि देशातील सर्वात शक्तिशाली कार्यरत रॉकेट एलव्हीएम-३ यांच्या निर्मितीची जबाबदारीही खासगी क्षेत्राकडे सोपवण्याची तयारी सुरू आहे. या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा समावेश केला जाणार नसून, संबंधित प्रक्षेपण वाहनांच्या निर्मितीची जबाबदारी खासगी कंपन्यांकडे देण्यात येणार असल्याचे डॉ. गोयनका यांनी स्पष्ट केले.

## सीमा बंद, तरी पाकिस्तानातून १५० नववधू भारतात; तिसऱ्या देशातून विवाहासाठी आगमन

**नवी दिल्ली : दि.२३** वृत्तसंस्था

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये तणाव वाढला असून वाघा-अटारी मार्गावरील थेट प्रवासही बंद आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर पाकिस्तानातील सुमारे १५० नववधू भारतीय वरांशी विवाह करण्यासाठी तिसऱ्या देशामार्गे भारतात दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे.
एप्रिल ते जूनदरम्यान या नववधूंसोबत सुमारे ४५० नातेवाईकही भारतात आल्याचे सांगण्यात येत आहे. मस्कत, कोलंबो, ढाका, दुबई आणि कतारमार्गे विमान प्रवास करून त्यांनी भारतात प्रवेश केला. नागपूर, जोधपूर, अहमदाबाद, रायपूर, पुणे आणि भोपाळ यांसारख्या शहरांमध्ये या विवाहसोहळ्यांचे आयोजन करण्यात आले.
भारत-पाकिस्तान सीमेवरील तणावामुळे वाघा-अटारी सीमा बंद झाल्यानंतर अनेक पाकिस्तानी तरुणींचे नियोजित विवाह रखडले होते. अखेर केंद्रीय गृह मंत्रालयाने विशेष परवानगी दिल्यानंतर तिसऱ्या देशातून भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला. सामान्य परिस्थितीत पाकिस्तानी नागरिकांना वाघा-अटारीमार्गे भारतात येता येते.

## बंगालच्या उपसागरात मालवाहू जहाज बुडाले; २४ जणांचा शोध सुरू

**भुवनेश्वर : दि.२३** वृत्तसंस्था



बंगालच्या उपसागरात पनामा ध्वज असलेले मालवाहू जहाज शनिवारी बुडाल्याची धक्कादायक घटना घडली. ओडिशातील पारादीप किनाऱ्यापासून सुमारे २४० सागरी मैल अंतरावर ही दुर्घटना घडली. जहाजावर २४ जणांचे कर्मचारी दल असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. दुर्घटनेनंतर भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाने तातडीने शोध आणि बचाव मोहीम सुरू केली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, हे मालवाहू जहाज ओडिशातून लोहखनिज घेऊन सिंगापूरच्या दिशेने रवाना झाले होते. २० ऑगस्ट रोजी जहाज पारादीप बंदरात दाखल झाले होते. त्यानंतर शुक्रवारी ते पुढील प्रवासासाठी बंदरातून निघाले. मात्र, बंगालच्या उपसागरात पोहोचल्यानंतर अचानक दुर्घटना घडली आणि जहाज समुद्रात बुडाले. पारादीप किनाऱ्यापासून सुमारे ४४४ किलोमीटर अंतरावर जहाज बुडाल्याचे सांगण्यात येत आहे.
जहाज बुडाल्याची माहिती मिळताच भारतीय तटरक्षक दल आणि नौदलाने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले. दुर्घटनाग्रस्त जहाजाच्या परिसरातून जाणाऱ्या इतर मालवाहू व व्यापारी जहाजांनाही सतर्क करण्यात आले असून, बचावकार्यात मदत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समुद्रात विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून जहाजावरील कर्मचाऱ्यांचा शोध घेतला जात आहे.
दरम्यान, जहाजावरील २४ कर्मचाऱ्यांपैकी आतापर्यंत किती जणांची सुटका झाली किंवा किती जण बेपत्ता आहेत, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, जहाजावरील बहुतांश कर्मचारी चिनी नागरिक असल्याचे समोर आले आहे. मात्र, त्यांच्या सद्यस्थितीबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.
जहाज नेमके कोणत्या कारणामुळे बुडाले, याचेही गूढ कायम आहे. हवामानातील बदल, तांत्रिक बिघाड किंवा अन्य कोणत्या कारणामुळे दुर्घटना घडली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. तटरक्षक दल आणि नौदलाचे बचावकार्य सुरू असून, शोधमोहीम पुढे गेल्यानंतर जहाज बुडण्याचे कारण तसेच २४ कर्मचाऱ्यांच्या स्थितीबाबत अधिक माहिती मिळण्याची शक्यता आहे.

## इराणविरुद्धच्या युद्धात अमेरिकेचे १८ सैनिक ठार

**वॉशिंग्टन डीसी :** इराणविरुद्ध सुरू असलेल्या युद्धात गेल्या सहा महिन्यांत अमेरिकेचे १८ सैनिक ठार, तर ७५६ जवान जखमी झाल्याची अधिकृत आकडेवारी अमेरिकेकडून जाहीर करण्यात आली आहे. अमेरिकेच्या लष्करी डेटाबेसमध्ये युद्धातील हानीची नोंद करण्यासाठी असलेल्या प्रक्रियेला लागलेल्या विलंबामुळे ही आकडेवारी उशिराने समोर आली आहे. दरम्यान, अमेरिकेच्या हितांचे रक्षण करण्यासाठी सैन्य पूर्णपणे सक्षम असल्याचा दावा ट्रम्प प्रशासनाने केला आहे.
अमेरिकेने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरू केली. 'ओव्हरसीज ऑपरेशन्स'साठीच्या डिफ`न्स कॅज्युअल्टी ॲनालिसिस सिस्टीम आणि 'ऑपरेशन एपिक फ्युरी'मधील आकडेवारी एकत्र केल्यानंतर १८ अमेरिकन सैनिकांच्या मृत्यूची माहिती अधिकृत करण्यात आली आहे. युद्धातील जखमींची संख्या ७५६ असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.
अमेरिकेने कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ७ जुलैपासून युद्धातील हानीची आकडेवारी जाहीर करण्यास सुरुवात केली. त्यामुळे उपलब्ध डेटामध्ये ७ जुलै २०२६ पासून आतापर्यंतची नोंद समाविष्ट आहे. मात्र, जाहीर करण्यात आलेला मृत्यू आणि जखमींचा आकडा २८ फेब्रुवारीपासूनच्या संपूर्ण युद्धकालावधीशी संबंधित असल्याचे अमेरिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.
दरम्यान, युद्धामुळे अमेरिकेच्या अत्याधुनिक शस्त्रसाठ्यावरही मोठा ताण निर्माण झाला आहे.

# होर्मुझवर ट्रम्प यांचा दावा; इराणचा पलटवार, 'अमेरिका भूमिका बदलेपर्यंत सामुद्रधुनी बंद'

**वॉशिंग्टन : दि.२३** वृत्तसंस्था



अमेरिका आणि इराणमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून दोन्ही देशांमध्ये संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी 'ट्रुथ सोशल'वर होर्मुझची सामुद्रधुनी 'नवा अमेरिकी भूभाग' असल्याचे दर्शविणारा नकाशा पुन्हा शेअर केला. त्यावर इराणने तीव्र प्रतिक्रिया देत अमेरिका आपली भूमिका बदलेपर्यंत हा जलमार्ग खुला केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.
ट्रम्प यांनी यापूर्वी १८ ऑगस्टलाही हाच नकाशा प्रसिद्ध केला होता. त्याआधी १४ ऑगस्ट रोजी लाँग आयलंड येथे बोलताना त्यांनी होर्मुझला अमेरिकी भूभाग म्हणून घोषित करण्याची शक्यता व्यक्त केली होती. दरम्यान, ट्रम्प यांनी होर्मुझ खुला असल्याचा दावा केला असला, तरी इराणने जलमार्ग बंद असल्याची भूमिका कायम ठेवली आहे.
इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव मोहसेन रझाई यांनी अमेरिका आपली आश्वासने पूर्ण करून धोरणात बदल करेपर्यंत होर्मुझ खुला केला जाणार नसल्याचे म्हटले आहे. केवळ चर्चा किंवा वाटाघाटींमधून प्रश्न सुटणार नसून अमेरिकेला प्रत्यक्ष कृती करावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.
होर्मुझमधून व्यापारी जहाजांची वाहतूक सुरू असल्याचे काही आकडेवारीवरून दिसत असले, तरी युद्धापूर्वीच्या तुलनेत वाहतुकीत मोठी घट झाली आहे. या जलमार्गातून सामान्यतः जागतिक तेल वाहतुकीतील सुमारे पाचवा हिस्सा जातो. त्यामुळे होर्मुझवरील तणावाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होण्याची शक्यता आहे.
दरम्यान, काही अहवालांनुसार गेल्या आठवड्यात होर्मुझमधून सुमारे २०० जहाजांनी प्रवास केला, तर त्याआधीच्या आठवड्यात ही संख्या सुमारे १५० होती. मात्र, इतर उपलब्ध आकडेवारीनुसार युद्धापूर्वी दररोज सुमारे १३० ते १४० जहाजे या मार्गाने जात होती आणि संघर्षानंतर वाहतूक मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्यामुळे या आकडेवारीकडे सध्याच्या परिस्थितीच्या व्यापक संदर्भात पाहणे आवश्यक आहे.

> ❑ इराणकडून होर्मुझमधील वाहतुकीसंदर्भात ओमानसोबत काही व्यवस्था झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, त्याबाबत अद्याप कोणतेही अंतिम संयुक्त निवेदन समोर आलेले नाही. त्यामुळे होर्मुझच्या नियंत्रणावरून अमेरिका, इराण आणि ओमान यांच्यातील राजनैतिक समीकरणेही आगामी काळात महत्त्वाची ठरणार आहेत.
>
> ❑ होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील दावे, अमेरिकी नौदलाची नाकेबंदी आणि इराणची जलमार्ग बंद ठेवण्याची भूमिका यामुळे आखाती क्षेत्रातील तणाव पुन्हा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संघर्ष आणखी तीव्र झाल्यास त्याचा परिणाम केवळ अमेरिका–इराण संबंधांपुरता मर्यादित न राहता जागतिक तेलपुरवठा, जहाज वाहतूक आणि इंधनाच्या किमतींवरही होऊ शकतो.

## भारत-बांगलादेश संबंध परस्पर हितांवर आधारित असावेत; जयशंकरांचा स्पष्ट संदेश

**नवी दिल्ली : दि.२३** वृत्तसंस्था



भारत आणि बांगलादेशमधील संबंधांबाबत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत आणि यशस्वी होण्यासाठी परस्पर हितसंबंधांचा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बांगलादेशने आपल्या हिताचा विचार करताना भारताच्या हितसंबंधांचाही विचार करावा, असा संदेश त्यांच्या वक्तव्यातून देण्यात आला आहे.
बांगलादेशमध्ये शेख हसीना यांचे सरकार सत्तेतून गेल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये बदल झाल्याचे चित्र आहे. अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्यानंतर सत्तेवर आलेले पंतप्रधान तारिक रहमान यांनी पदभार स्वीकारल्यानंतर भारताऐवजी चीनला प्रथम भेट दिल्यानेही या बदलाची चर्चा झाली.
दरम्यान, नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्याबाबत बांगलादेशकडून काही अटी मांडल्या जात असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणीही करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी भारत-बांगलादेश संबंधांबाबत भारताची भूमिका स्पष्ट केली.

हे पत्र मालक,प्रकाशक, **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे यांनी तिक्ष्णगत मीडिया प्रा.लि.**करिता डी.बी.कॉर्प.लि.,एन.एच.६, बोरगाव मंजू, अकोला (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून दै. अजिंक्य भारत, मुख्य कार्यालय सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)** आरएनआय-MAHMAR/2009/35271 (ई-मेल- ajinkyabharat23@gmail.com)

आपले साहित्य या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## महागाईचा कडवटपणा!

गोड पदार्थांची रेलचेल असणारा सणासुदीचा काळ सुरू झाला की, महागाईचा कडवटपणा लगोलग येतो, हा जणू भारतीय अर्थव्यवस्थेचा अलिखित नियमच बनला आहे. यंदा सणासुदीचा गोडवा वाढवणारी साखर याची मानकरी ठरली आहे. गणेशोत्सव, दसरा आणि दिवाळी या काळात मिठाई, बेकरी पदार्थ आणि शीतपेयांची मागणी शिगेला पोहोचते; पण नेमक्या याच काळात साखरेचे दर विक्रमी पातळी गाठत आहेत. अवघ्या काही दिवसांतच साखरेच्या प्रतिक्विंटल दरात १३०० ते १४०० रुपयांनी वाढून थेट आठ हजारांच्या घरात जाणे, हे बाजारातील मागणी-पुरवठ्याच्या सर्वसाधारण गणिताला छेद देणारे आहे. याची दखल घेत तत्काळ केंद्र सरकारने साठेबाजीवर बंधने घालण्याचा निर्णय घेतला. दैनिक पुढारी'ने यासंदर्भातील मागणी केली होती. तिची दखल घेतानाच शासनाने तब्बल दशकभरानंतर साखर आयातीचे दारही किलकिले केले आहे. यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. तथापि, गेल्याच आर्थिक वर्षात भारताने २० लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला होता आणि आता अवघ्या काही महिन्यांत त्याच देशाला १० लाख मेट्रिक टन कच्ची साखर शून्य शुल्क आकारून आयात करण्याची वेळ यावी, हा उलटफेर अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक आणि सर्वांत मोठा ग्राहक असलेल्या देशाने अशा तऱ्हेने आयातीकडे वळावे, यातून धोरणात्मक नियोजनातील त्रुटी स्पष्टपणे समोर येतात. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीकडे पाहिल्यास परिस्थिती इतकी विदारक वाटत नाही. चालू हंगामात इथेनॉलसाठी वापरलेली साखर वजा जाता निव्वळ उत्पादन जवळपास २७.७५ दशलक्ष टन राहण्याचा अंदाज आहे, तर देशांतर्गत खप सुमारे २८ दशलक्ष टन आहे. शिवाय शिल्लक साठा गृहीत धरला, तर एकूण उपलब्धता ३२.५ दशलक्ष टनांच्या घरात जाते. म्हणजे कागदावर तरी उत्पादन आणि मागणीचा ताळमेळ फारसा बिघडलेला दिसत नाही. मग, तरीही दर का भडकले, याचे उत्तर उत्पादनाच्या आकडेवारीत नसून, साठवणूक आणि सट्टेबाजारातील उलाढालींमध्ये दडलेले आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत काही मोठ्या साखर कारखान्यांनी वायदे बाजारात मोठ्या प्रमाणावर सट्टा खेळल्याचा आणि त्यामुळे बाजारपेठेत कृत्रिम तेजी निर्माण झाल्याचा आरोप होत आहे. वायदे बाजारपेठेतील दर प्रतिक्विंटल ७००० वरून दोन दिवसांतच ८००० रुपयांवर पोहोचले आणि याच काळात प्रत्यक्ष बाजारातही दर ६२-६३ रुपयांवरून ७२-७३ रुपये किलोपर्यंत झेपावले. हा एक प्रकारचा उच्चांकच आहे. मागील १० वर्षांचा आढावा घेतला असता केंद्राने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे आणि साखरेचे पर्याप्त उत्पादन राहिल्यामुळे देशात साखरेचे किरकोळ दर साधारणपणे ४० ते ४५ रुपये प्रतिकिलोच्या दरम्यान स्थिर राहिले होते. त्या तुलनेत आताचे दर जवळपास दुप्पट झाले आहेत. हे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने १० लाख टन साखर आयातीचा निर्णय घेत घाऊक साठ्यावर मर्यादा (स्टॉक लिमिट) घातल्या आहेत. साठा असूनही तो बाजारात न आणता कृत्रिम तुटवडा निर्माण करणे आणि त्याचा फायदा उचलणे, हा प्रकार खरोखर घडत असेल, तर तो केवळ ग्राहकांच्या खिशाला कात्री लावणारा नसून बाजारातील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. आयातीचा निर्णयही या पार्श्वभूमीवर समजून घ्यायला हवा. मिठाई व शीतपेय उत्पादक, अन्न प्रक्रिया उद्योग, मिठाई विक्रेते आणि इतर संस्थात्मक खरेदीदार यांना या आयातीचा लाभ मिळणार आहे. मोठ्या ग्राहकांना १५ दिवसांपेक्षा अधिक काळ साठा करून ठेवता येणार नाही, अशी अटही यात घालण्यात आली आहे. एकाच वर्षात निर्यातीचा निर्णय घेणे आणि काही महिन्यांतच आयातीकडे वळणे, हा गोंधळ मूळ उत्पादन अंदाजातील त्रुटींमधून निर्माण झाला असल्यास ती अधिक चिंताजनक बाब आहे. दुसरा मुद्दा उसाच्या उत्पादनाशी आणि इथेनॉल धोरणाशी संबंधित आहे. यंदा कमी पावसामुळे प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा स्थितीत उसापासून इथेनॉलनिर्मितीवर निर्बंध आणण्याची सरकारची भूमिका समजण्याजोगी आहे. दरवाढ रोखण्यासाठीचे तात्कालिक उपाय म्हणून आताचे निर्णय योग्य असले, तरी त्यांना कायमस्वरूपी उत्तर मानता येणार नाही. वायदे बाजारातील सट्टेबाजीवर नियंत्रण ठेवणारी सक्षम यंत्रणा उभी करणे, उत्पादनाच्या आकडेवारीचे विश्वासार्ह सर्वेक्षण करणे, कारखानदार व व्यापारी यांच्यातील साखळीत पारदर्शकता आणणे, या दिशेने ठोस पावले वेळीच उचलली गेली नाहीत, तर दरवर्षी सणासुदीच्या तोंडावर हाच खेळ पुन्हा पुन्हा घडत राहील. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे साखरेचा बाजारभाव वाढला म्हणून ऊस उत्पादकाला आपोआप अधिक ऊस दर मिळत नाही. कारखानदारांनी एफआरपी अदा केली की, उसाच्या दराबाबतची त्यांची प्राथमिक जबाबदारी पूर्ण होते. ही विसंगती दूर केल्याशिवाय ऊस उत्पादकाला साखरेच्या तेजीचा न्याय्य वाटा मिळणार नाही. सी. रंगराजन समितीने साखर आणि उपपदार्थांच्या उत्पन्नात ऊस उत्पादकाला मोठा वाटा मिळावा, अशी दिशा सुचवली होती; परंतु त्या शिफारशीची अंमलबजावणी टाळली गेली. बाजारातील दर आटोक्यात आणताना ऊस उत्पादकाच्या हक्काचा प्रश्न दुर्लक्षित राहता कामा नये. साखर कारखानदारांची बाजूही विचारात घ्यायला हवी. उसाच्या एफआरपीमध्ये अनेक वेळा वाढ झाली; मात्र साखरेच्या किमान विक्री किमतीत तितकीशी वाढ झाली नाही. त्यामुळे कारखानदारांच्या आर्थिक गणितावरही ताण आला आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा कणा असणाऱ्या या उद्योगाचे अर्थकारण कोलमडणे परवडणारे नाही.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### जेन झी



हो सर्व पक्ष भिडले
ह्या जेन झी साठी
ते कोणाला नडले
सुटणार का गाठी

पुण्याच्या कार्यक्रमात
मुली साधला संवाद
नागपूरच्या मैदानात
खरच झाला सुसंवाद

ते कोणाचे ऐकणार
हा प्रश्न पडला आहे
मात्र यामुळेच उत्तर
सर्व पक्ष शोधत आहे

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

वचन ते द्यावे
जे पूर्ण होणार ।
द्यावा नाहीतर
नकार हो ॥

वचन दाखवी
माझे तुझे मूल्य ।
नको मातीमोल
त्यासी करू ॥

मोठे पणामध्ये
नका देवू तुम्ही ।
वचन हो तुम्ही
देवू नये ॥

मोठे पणामध्ये
होकार देतात ।
पुढे फसतात
चक्रामध्ये ॥

ऐपतीनुसार
वचन द्यायचे ।
पूर्ण करायचे
वचनास ॥

प्रवीण वचन
शक्य तेची देतो ।
पेलणारी घेतो
खांद्यावरी ॥

# आत्महत्या हा शेवटचा पर्याय मुळीच नाही!



प्रासंगिक

नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

छत्रपती संभाजीनगरमध्ये शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी एका मुलासह त्याच्या आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. छत्रपती संभाजीनगरच्या तिसगाव भागातील खवड्या डोंगरावर एक १८ वर्षाचा मुलगा आत्महत्या करायला गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि स्थानिक लोक त्याला वाचवण्यासाठी डोंगरावर गेले. आई-वडील आणि इतर लोक त्या मुलाला उडी मारु नकोस, असे समजावत होते. मात्र, मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. वडील आपल्या मुलाची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. अखेर वडिलांनी पुढे जात मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मुलाने डोंगरावरुन उडी टाकली होती, त्याला पकडण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही खाली तोल जाऊन ते देखील खाली पडले. हे दोघेही डोंगराच्या दरीत खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार पाहून शोक अनावर झालेल्या मुलाच्या आईनेही डोंगरावरुन खाली उडी मारली. त्यामुळे तिचाही मृत्यू झाला. या घटनेने घटनास्थळी उपस्थित असलेल्या सर्वांनाच धक्का बसला. मुलाने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. कुणाल मुरलीधर चांदवडे,मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. हे सर्वजण देवळाई सातारा परिसर येथील असल्याची माहिती समोर आली आहे. या तिघांचाही जागेवरच मृत्यू झाला. मन विषण्ण करणाऱ्या या घटनेने सगळेच जण हादरले आहेत.

आज आपल्या परिसरात आत्महत्या तसेच सामुहिक आत्महत्येचे प्रकार वाढत चालले आहे. वाहनाखाली स्वत:ला झोकून देणे, जाणिवपूर्वक अतिरिक्त झोपेच्या गोळ्या घेणे, स्वत:ला पेटवून घेणे, स्वत:ला गोळी मारून घेणे. आत्महत्या कशामुळे घडतात; १)आत्महत्या ह्या नैराशेतून घडतात. २) आत्महत्या ह्या रागाच्या भरात घडतात.

३) आत्महत्या ह्या तणावातून घडतात. ४) आत्महत्या ह्या वेदना आणि अतितीव्र आजारात घडतात. ५) आत्महत्या ह्या कौटुंबिक कलह मधून घडतात.

१) आत्महत्या ह्या नैराशेतून घडतात:-खर तर जीवन जगात असतांना प्रत्येक माणसाच्या जीवनात यश-अपशय, जय-पराजय या गोष्टी येतातच. जीवन जगतांना यश-अपयश, जय-पराजय ह्या एकाच नाण्याच्या गोष्टी आहेत. जीवन जगतांना माणसाच्या जीवनात यश आल किंवा एखाद्या कामात विजय मिळाला तर माणूस खुश होतो परंतु जर माणसाच्या जीवनात अपयश आल किंवा एखाद्या कामात पराजयाचा सामना कराव लागला तर त्या माणसाला सहन होत नाही आणि भावनेच्या आहारी जाऊन तो दु:खी होतो. या नैराशेमुळे माणसाला जीवन हे व्यर्थ वाटू लागते अशा परिस्थितीत माणूस अपयश पचवू शकत नाही. २) आत्महत्या ह्या रागाच्या भरात घडतात:आत्म्हया करण्याचे मुख्य कारण हे क्रोध म्हणजे राग हे आहे. जीवन जगतांना माणूस रागाच्या भारत आत्महत्या करतात. जीवन जगतांना माणसाला राग येणे स्वाभाविक आहे. माणसाचे जे सहा शत्रू आहेत त्यात रागाचा क्रमांक वरचा आहे तसेच आत्महत्या करण्याच्या घटणा ह्या रागाच्या भारत जास्त प्रमाणात आहेत.

३) आत्महत्या ह्या तणावातून घडतात:जीवन जगात असलेल्या प्रत्येक माणसावर ताण असतोच. काहींना ताण जाणवतो व काहींना ताण जाणवत नाही. ताण जाणवला नाही तरीही त्याने शरीरावर परिणाम होत असतात. ताण हा खर तर वीणेच्या तारेसारखा आहे.

४) आत्महत्या ह्या वेदना आणि अतितीव्र आजारात घडतात:काही आत्महत्या ह्या आजाराच्या वेदनांना कंटाळून तसेच वेदना सहन न झाल्यामुळे घडतात.

५) आत्महत्या ह्या कौटुंबिक कलह मधून घडतात:जीवन जगतांना संसारात भांड्याला भांड लागणारच यातूनच कौटुंबिक कलह निर्माण होतात.

१) आत्महत्या टाळण्यासाठी माणसाने सर्वप्रथम आपल्यावर असलेला ताणाव कमी करावा. यासाठी माणसाने मन एकाग्र करण्यासाठी ध्यानाचा मार्ग अवलंबवाव तसेच मन प्रस्सन ठेवावेव मनाचे पवित्र जपावे. इसप यांच्या म्हणण्यानुसार, ''शेताप्रमाणेच मनाचीही मशागत माणसाने केली पाहिजे कारण मनाची शुद्धता जसजशी वाढत जाते, तसतसे माणसाचे महत्व जागृत होते आणि ती जसजशी कमी होते, तसतसे त्याच्या अंगी पशुत्व वाढत जाते.'' खर तर जीवन जगतांना मनाची मशागत माणसाने करणे गरजेचे आहे. २) बहुतांशी आत्महत्येचे कृत्य अचानक एका दिवसात घडून येत नाही तर प्रत्यक्ष आत्म्हत्येपुर्वी अनेक दिवस व्यक्तींच्या मानत आत्महत्येचे विचार घोळत असतात. ३) आत्महत्या टाळण्यासाठी रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. ४) आत्महत्या टाळण्यासाठी अपयश पचवणे माणसाने शिकावे. ५) आत्महत्या टाळण्यासाठी जीवनाचे महत्व माणसाने समजून घेणे गरजेचे आहे. खर तर जीवनाचे मोल माणसाने जाने गरजेचे आहे.

६) आत्महत्या टाळण्यासाठी मनाची शुद्धता जपणे गरजेचे आहे.माणूस हा विचारशील प्राणी आहे अशी माणसाची व्याख्या केली जाते. प्रसिद्ध मानसिक रोग तज्ञ कृणाल शेवाळे यांनी आवाहन करत म्हटले आहे की ''आत्महत्या ही एक गंभीर समस्या असून योग्य उपचार तसेच समुपदेशनाने आपल्याला ते टाळता येणे शक्य आहे. परिवारातील सु संवाद, मैत्री जपणे व मित्रांसोबत वेळ घालवणे, छंद जोपासणे, आयुष्याला अध्यात्माची किनार देणे सारख्या छोट्या गोष्टी सुद्धा खुप फायद्याच्या ठरतात. आत्महत्या करणे हा शेवटचा पर्याय मुळीच नाही.'' मोबाईलच्या अतिवापरामुळे देखील आज नात्यासंबंधात दुरावा निर्माण होत चालला आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे आज समाजातील लोकांच्या संवेदना देखील हरपत चालल्या आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे आजची मुले हट्टी देखील झालेली आपल्याला दिसून येतील. शक्य झाल्यास पालकांनी आपल्या मुलांना जेवढे मोबाईलपासून दूर ठेवता येईल यावर लक्ष द्यावे ही नम्र विनंती. आज वाढत असलेल्या आत्महत्या सर्वांच्या मनाला चटका लावून जात आहेत. शेवटी एव्हडेच सांगाव वाटते कि, ''कोशिश करनेवालोकी कभी हार नाही होती, और हार माननेवालोकी कभी जीत नाही होती.''

# निंदणोत्सव

अरविंद रा. शिंगाडे
खामगाव, मो. ९४२३४४५६६८

**भाग-१**

''कावं शकुंतला.... आज कोनाच्या चाल्ली वं ? रिकामपन अशीन तं देनं बयना मालं यका दिवसाचं काळून.... ''

''नाई वं आत्या... मी रामेशोरच्या पाथीत जात असतो ..... निंदन सुरु झालं ताहापासून मऱ्याले फुरसत नाई.''

अगदी सकाळी-सकाळी खेडेगावातील असे संवाद एकेकाळी ठरलेले असायचे. आषाढात सुरु होणारी ही निंदणाची लगबग श्रावणात शिखरावर पोहोचलेली असते . निंदण म्हणजे गावागावातल्या बाया -माणसांनी मुला- मुलींनी काळ्या शेतांना हिरव्या-पिवळ्या वस्त्रांनी नटविण्यासाठी चालविलेला उत्सवच जणू !

भल्या पहाटे गावाचं जागं होणं, त्यात गोठणावर जाणाऱ्या गाई वासरांची शिस्तबद्ध



पावली, शेण-माती अन पावसाच्या पडून गेलेल्या पाण्याला कष्टकऱ्यांच्या घामाचा सुगंध म्हणजे गावखेड्यातील टवटवीत पहाटेला लागलेलं अत्तर. काळाच्या ओघात अन यांत्रिकीकरणाच्या आक्रमणात ज्या गोष्टी अंग चोरून भितभित आपलं अस्तित्व टिकविण्याचा केवीलवाणा प्रयत्न करीत आहेत, त्यांची खूप मोठी यादी होईल. शेतीचं यांत्रिकीकरण होऊ लागलं. त्यामध्ये राहणीमानासह पिके, पिक-पध्दती, मशागत इत्यादी सर्व काही बदलले . निंदण ही अशीच एक आंतरमशागतीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया. पावसामुळे पिकाच्या आजूबाजूला वाढलेले गवत आणि इतर निरुपयोगी - उपद्रवी वनस्पती (तण) विळा -खुरप्यांच्या मदतीने मुळासकट काढणे. पेरणीप्रमाणेच अतिशय महत्त्वाचं असं आंतरमशागतीचं काम. या कामामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करून ज्या घरधन्याचं वेळेवर निंदण जमलं ,तो निश्चिंत अन ज्याचं हुकलं तो कमनशिबी - बेजबाबदार .असं हे निंदण म्हणजे एकप्रकारचा सोहळाच. आता तणनाशक नामक शत्रूने ही प्रक्रिया कालबाह्य करून टाकली. पूर्ण गावात एकाचवेळी सुरू होणारा हा सोहळा आता एखाद-दुसऱ्या शेतात अपवादासारखा पहायला मिळतो एखादी परंपरा जेंव्हा कालबाह्य होत जाते तेंव्हा ती आपल्यासोबत कौशल्ये, आंतरक्रिया, संकेत, व्यवहार, भाषा अन सामाजिकीकरणाचे अनेक पैलूही घेऊन जाते.

धरणीमाय इवल्या इवल्या बियांना आपल्या कुशीत सावरून घेते . काही दिवसांमध्ये त्यांना प्रेमाच्या ओलाव्यानं हिरवाईचा साजश्रृंगार करून देते अन मातीच्या घराचे दरवाजे त्यांच्यासाठी मोकळे करून देते. मग या शिस्तबद्ध ,हसऱ्या अन हिरव्यागार रोपांमधूनच आपलं जगणं समृद्ध होते ,याची जाण असलेला बळीराजा त्यांना तणाच्या कचाट्यातून मोकळं करण्याची आषाढी-श्रावणी धडपड करतो. बैलांच्या मदतीने पिकांच्या दोन तासांमधील निरुपयोगी तण-गवत डवरणी (कोळपणी) करून कमी केले जाते अन त्यानंतर पिकाच्या अगदी जवळचं तण -गवत काढण्यासाठी निंदण करतो.

कृषी क्षेत्रातील संशोधने निंदणासारख्या अनेक उत्सवांना मारक ठरली. तणनाशक आलं अन गवतासोबत त्याने गावपणही कोमेजून टाकलं. ''चाला वं बायायहो.. मंग कई निंगता पासल्यापायरी.... ?'' सकाळीसकाळी असा गावागावातून येणारा शेतमालकिणींचा आवाजही फारसा कानावर पडत नाही.

ट्रॅक्टर, मळणीयंत्र,रोटावेटर, जेसीबी, पॉवरट्रिलर, स्प्रिंकलर, ठिबक, फवारणी यंत्र, हडंबा, पोकलॅन इत्यादी अनेक महाकाय यंत्रांनी बैलगाडी, तिफन, वखर, नांगर, कोपळी,फावडे, डवरे, रुमणं,पास, ताशा,तुत्या, जू अशा औजारांवर अन डवरणी, वखरणी, खळं, निंदण अशांसारख्या अनेक क्रियांवर आक्रमण करून ते गिळंकृत केलं आहे . अगदी राष्ट्रीय स्तरावरील मोठमोठ्या राजकीय पक्षांनी राज्याराज्यातील प्रादेशिक पक्षांना हळूहळू संपविल्यासारखे ! गावागावातला हा निंदणोत्सव म्हणजे शेतमाऊलीला सजविण्याचा सोहळा. निंदण झाल्यावर तेवढं शेत एखाद्या टापटीप माणसासारखं भासू लागते. सुतक फिटल्यावर दाढी -कटींग करून, नवीन कपडे घालून नीटनेटकं झाल्यासारखं. निंदणाच्या सिझनमध्ये शेतकऱ्यांची लगबग वरबापाच्या धावपळीपेक्षा कमी नसते.

आता वेगवेगळ्या प्रकारची तणनाशके, एखादा फवारणी यंत्रावाला माणूस अन एका दिवसात काम पूर्ण .या इन्स्टंट प्रक्रीयेमुळे खूप वेळ, श्रम, पैसा यांची बचत होते पण बऱ्याच गोष्टी मात्र इतिहासजमा झाल्या.

''उधळ्यातलं अशीन तं येतो म्हना.... दिवसभऱ्यात तीन पायरा काम होते. रोजानं अटकून बशाले पुरते काय ?''

''अरे, पुरं वावर डम भरेल हाये लह्याळी अन हरायनं .कुठी- मुठी पराटी दिसते गयाटल्यासारखी...''

अशा संवादांनाही आता गावं -खेडी पारखी झाली आहेत. लह्याळी, हराय (हराळ) यांच्यासह ईचु, केना, कळ्ळू, बिलायती, अगाडा (सराटे) अशा अनेक तणवर्गीय वनस्पती. यांच्यासह गवतांचे विविध प्रकार पिकांना फार बहरू देत नसत, स्वपक्षातल्या अंतर्गत विरोधक अन टिकाकारांसारखे !

अशा अनेक गोष्टींना तोंड देत पिकं मोठी करण्यासाठी बळीराजाची धडपड .

निंदणाची लगबग अन त्यात येणारे अनेक अडथळे हे ही शेतकऱ्याला संकटांना तोंड देण्यासाठी समृद्ध करत . ''आज पुरा तुंगाच सांगतला रामेशोरचा अन हे अभाय मिरुन रायलं. यखांदा शिरवा आला ना की, गेलं समजा भटं आपलं... '' आभाळाकडे पाहात अज्याबराव बाप्पू चिंतेत बोलून जात. यामध्ये तुंगा हा निंदणोत्सुक सकुशल कामगारांचा नियंत्रीत संघ दर्शविणारा शब्द आहे, आणि रामेशोर या तुंग्याचा नियंत्रक म्हणजेच लेबर कॉन्ट्रॅक्टर. ''आताच सांगा पाटील..... नाईतं सकाय तासावर बसल्यावर

# कुंभमेळ्याला विरोध नाही; जनतेच्या पैशाचा हिशेब हवा

सुनीलराव जवंजाळ पाटील

कुंभमेळा ही भारतीय समाजजीवनातील प्रदीर्घ सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा आहे. लाखो भाविक श्रद्धेने या सोहळ्यात सहभागी होतात. त्यामुळे कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि वाहतूक व्यवस्था सक्षम करणे, तसेच शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे याला आक्षेप असण्याचे कारण नाही. प्रश्न कुंभमेळ्याचा नाही; प्रश्न सार्वजनिक पैशाच्या वापराचा आणि त्यातील पारदर्शकतेचा आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा आराखडा मांडला आहे. एप्रिलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या कामांचा रोडमॅप जाहीर केला होता. त्यानंतर प्रशासकीय माहितीत विकास आराखड्याचा आकडा ३४,७३२ कोटी रुपये असल्याचे समोर आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील सार्वजनिक निधीचा वापर होणार असेल, तर त्याच्या नियोजनाची, खर्चाची आणि परिणामांची माहिती नागरिकांना मिळणे स्वाभाविकपणे अपेक्षित आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही या संदर्भात सविस्तर डीपीआर म्हणजेच प्रकल्प अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. कोणती कामे केली जाणार, त्यांचा खर्च किती आहे, कोणत्या यंत्रणेमार्फत ती केली जाणार, निविदा प्रक्रिया कशी असेल आणि कंत्राटदारांची निवड कोणत्या पद्धतीने केली जाणार, याची माहिती सार्वजनिक व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे. ही मागणी कुंभमेळ्याला विरोध करणारी नसून सार्वजनिक खर्चाच्या पारदर्शकतेशी संबंधित आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये दीर्घकालीन सुधारणा घडवून आणण्याची संधी ठरू शकतो. या संधीचा उपयोग केवळ काही दिवसांच्या धार्मिक आयोजनासाठी न होता पुढील अनेक दशकांसाठी नाशिकच्या विकासाला चालना देण्यासाठी झाला, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. परंतु त्यासाठी नियोजन, निविदा प्रक्रिया, खर्च, कामांची गुणवत्ता, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचा उपयोग या सर्व बाबींमध्ये पारदर्शकता आवश्यक आहे. मोठा निधी खर्च होतो आहे म्हणून मोठा विकास आपोआप घडतो असे नाही. विकासाची खरी कसोटी म्हणजे खर्च झालेल्या पैशातून नागरिकांच्या जीवनात किती आणि किती काळ टिकणारा बदल झाला. कुंभमेळा संपल्यानंतर नाशिककडे उत्तम रस्ते, सक्षम पाणीपुरवठा, प्रभावी सांडपाणी व्यवस्था, सुधारलेली वाहतूक, चांगल्या आरोग्य सुविधा आणि स्वच्छ पर्यावरण उरले, तर एवढ्या मोठ्या सार्वजनिक गुंतवणुकीचे सार्थक झाले असे म्हणता येईल. परंतु मोठ्या खर्चानंतरही कामे अपूर्ण राहिली, निधीचा अपेक्षित परिणाम दिसला नाही किंवा नंतर चौकशी आणि गैरव्यवहाराचे प्रश्न निर्माण झाले, तर त्या खर्चाच्या औचित्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच कुंभमेळ्याला विरोध करण्याचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो सार्वजनिक निधीच्या जबाबदार वापराचा. श्रद्धेचा सन्मान राखतानाच सार्वजनिक पैशाबाबत उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवता येते. धर्म आणि पारदर्शकता हे परस्परविरोधी विषय नाहीत. उलट, एवढ्या मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक आयोजनाला जर पारदर्शक प्रशासनाची जोड मिळाली, तर तो देशासमोर सुशासनाचा आदर्शही निर्माण करू शकतो.

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी होणाऱ्या हजारो कोटी रुपयांच्या खर्चाबाबत सरकारने सविस्तर आराखडा, कामनिहाय खर्च, निधीचे स्रोत, निविदा प्रक्रिया आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसमोर ठेवावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणारी प्रत्येक मोठी गुंतवणूक भविष्यातील नाशिकच्या विकासाशी जोडली जावी, हीच अपेक्षा.

कुंभमेळा श्रद्धेचा उत्सव आहे; परंतु त्यासाठी खर्च होणारा पैसा सार्वजनिक आहे. त्यामुळे श्रद्धेला विरोध न करता हिशेब मागणे ही लोकशाहीचीच भूमिका आहे.

कारण श्रद्धा वैयक्तिक असू शकते; पण सार्वजनिक पैसा हा जनतेचा असतो.

# रस्ते रुंदावून प्रश्न सुटणार नाही; आता वाहतुकीची नवी रचना हवी!



वास्तव

सतीश दामोदर
बाळापूर. मो. ९३७२९६६९३६

लोकसंख्या वाढते आहे, शहरांचा विस्तार होतो आहे, वाहनांची संख्या झपाट्याने वाढते आहे आणि त्याच तुलनेत रस्त्यांची क्षमता मात्र अनेक ठिकाणी जुन्याच चौकटीत अडकून पडली आहे. परिणामी वाहतूककोंडी, अपघात, प्रदूषण आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. महाराष्ट्रात २०२४ मध्ये ३६,११८ रस्ते अपघातांची नोंद झाली आणि त्यात १५,७१५ जणांचा मृत्यू झाला. २०२५ ची आकडेवारी अद्याप तात्पुरती असली तरी अपघातांची संख्या ३६,४५० आणि मृतांची संख्या १५,५४९ इतकी आहे. म्हणजे रस्ते बांधण्याचा वेग वाढत असतानाही रस्ते सुरक्षित होण्याचे प्रमाण त्याच वेगाने वाढलेले दिसत नाही. या समस्येचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे वाहनसंख्येची प्रचंड वाढ. महाराष्ट्रात ३१ मार्च २०२५ रोजी तब्बल ४ कोटी ९५ लाख ३७ हजार ३०२ वाहने नोंदणीकृत होती आणि केवळ २०२४-२५ या एका वर्षात २८ लाख ९० हजार ४९७ नवीन वाहनांची नोंदणी झाली. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली या भागातही वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे पूर्वीच्या वाहतूक आराखड्यावर आजची वाहतूक चालवण्याचा प्रयत्न म्हणजे जुन्या आकाराच्या भांड्यात वाढत्या पाण्याला सामावून घेण्यासारखे आहे. विदर्भातील अपघातांचे चित्रही अस्वस्थ करणारे आहे. 
२०२४ मध्ये नागपूर शहरात ३४५, नागपूर ग्रामीणमध्ये ४६३, अमरावती शहरात १००, अमरावती ग्रामीणमध्ये ३४९, यवतमाळमध्ये ४३० आणि अकोल्यात १९७ जणांचा रस्ते अपघातांत मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही आकडेवारी केवळ वाहतूक शिस्तीचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. रस्त्याची रुंदी, वाहतुकीची रचना, जड व हलक्या वाहनांचे मिश्रण, पादचारी सुविधा, चौकांचे नियोजन, प्रकाशयोजना आणि आपत्कालीन प्रतिसाद या सर्व बाबी एकत्रितपणे अपघाताच्या जोखमीवर परिणाम करतात. आज परिस्थिती अशी आहे की शहरातील मुख्य रस्त्यावर दुचाकी, कार, बस, ट्रक, ऑटो, सायकल आणि पादचारी एकाच जागेसाठी स्पर्धा करताना दिसतात. पादचाऱ्यांसाठी सुरक्षित पदपथ नसतील, तर वृद्ध, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना रस्ता ओलांडणे हीच धोक्याची बाब बनते. त्यामुळे भविष्यातील वाहतूक नियोजनात केवळ 'रस्ता किती रुंद आहे?' हा प्रश्न पुरेसा नाही; 'या रस्त्यावर कोणत्या प्रकारची वाहतूक कोणत्या मार्गाने आणि कोणत्या वेगाने चालेल?' हा मूलभूत प्रश्न विचारावा लागेल. जड वाहनांसाठी शहराबाहेरील बायपास व स्वतंत्र मालवाहतूक मार्ग, हलक्या वाहनांसाठी मुख्य शहरी मार्ग, स्थानिक वाहतुकीसाठी सर्व्हिस रोड आणि पादचाऱ्यांसाठी सलग व सुरक्षित पदपथ अशी बहुस्तरीय रचना आता आवश्यक ठरत आहे. मुंबई-पुण्यासारख्या महानगरांकडे पाहिले तरी लोकसंख्या आणि प्रवासी वाहतुकीचा दबाव किती वाढला आहे, याची कल्पना येते. मुंबई परिसरात दररोज सुमारे ३,२०० उपनगरीय रेल्वे सेवा चालतात. तरीही क्षमता वाढविण्यासाठी नवीन डबे, अतिरिक्त सेवा, प्लॅटफॉर्म, स्टेबलिंग लाईन्स आणि पाचवी-सहावी मार्गिका अशा अनेक कामांची आवश्यकता भासत आहे. रेल्वेच्या एका अहवालानुसार मुंबईच्या उपनगरीय रेल्वेवर गर्दी इतकी वाढली आहे की काही १२ डब्यांच्या लोकलमध्ये क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक प्रवासी प्रवास करतात. म्हणूनच शहराच्या वाढत्या लोकसंख्येला केवळ रस्त्यांवर अधिक वाहने देण्याऐवजी सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे हा दीर्घकालीन उपाय आहे. विदर्भासाठीही हाच धडा महत्त्वाचा आहे. नागपूर मेट्रोने २०२४-२५ मध्ये २.६९ कोटी प्रवासी प्रवास नोंदवला असून मागील वर्षाच्या तुलनेत प्रवासीसंख्येत पाच टक्क्यांची वाढ झाली. याचा अर्थ लोकांना सार्वजनिक वाहतूक हवी आहे; मात्र ती वेळेवर, सुरक्षित, स्वस्त आणि विश्वासार्ह असली पाहिजे. नागपूरसारख्या शहरांबरोबरच अमरावती, अकोला, चंद्रपूर, वर्धा यांसारख्या वेगाने विस्तारत असलेल्या शहरांमध्ये भविष्यातील वाहतुकीचा आराखडा आजच तयार करण्याची गरज आहे. दुसरीकडे मोठमोठ्या प्रकल्पांवर कोट्यवधी रुपये खर्च करूनही काही ठिकाणी रस्ते, संरक्षक भिंती आणि वाहतूक प्रकल्प पावसाळ्यातच क्षतिग्रस्त होताना दिसतात. महाराष्ट्राच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २०२५-२६ मध्ये रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी ₹१,२९६ कोटींचा कार्यक्रम जाहीर केला आणि खड्ड्यांचे निरीक्षण करण्यासाठी एआय-आधारित प्रणालीचा पायलटही सुरू केला. पण प्रश्न केवळ खड्डे बुजविण्याचा नाही; रस्ता का खराब झाला, त्याचे डिझाइन योग्य होते का, पाण्याचा निचरा व्यवस्थित होता का, बांधकामाचा दर्जा काय होता आणि देखभालीची जबाबदारी कोणाची होती, याची उत्तरदायित्वपूर्ण तपासणी आवश्यक आहे. समृद्धी महामार्गाचाही अनुभव याच संदर्भात महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राच्या महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार २०२५ मध्ये समृद्धी महामार्गावर १८५ अपघातांची नोंद झाली असून १५२ जणांचा मृत्यू झाला; त्यापैकी १२८ अपघात प्राणघातक स्वरूपाचे होते. महामार्ग वेगवान झाला म्हणून वाहतूक आपोआप सुरक्षित होत नाही, हे या आकडेवारीतून स्पष्ट होते. रस्त्याची अभियांत्रिकी रचना, चालकांचे वर्तन, वेगनियंत्रण, विश्रांतीची व्यवस्था, आपत्कालीन वैद्यकीय मदत आणि जड वाहनांचे नियोजन या सर्वांचा एकत्र विचार करावा लागतो. म्हणून आता 'रस्ता रुंद करा' या पारंपरिक घोषणेपलीकडे जाण्याची वेळ आली आहे. शहरांसाठी वाहतूक व्यवस्थेचे दीर्घकालीन मास्टर प्लॅन, शहराभोवती रिंग रोड व बायपास, जड वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग, सुरक्षित पदपथ, सायकल व स्थानिक वाहतुकीसाठी स्वतंत्र जागा, आधुनिक बस व्यवस्था, मेट्रो व रेल्वेचा विस्तार आणि महत्त्वाच्या चौकांवर वैज्ञानिक वाहतूक व्यवस्थापन यांचा एकात्मिक विचार झाला पाहिजे. रस्ते बांधताना पुढील वीस-पंचवीस वर्षांची लोकसंख्या आणि वाहनसंख्या गृहीत धरली पाहिजे. अन्यथा आजचा रुंद रस्ता उद्या पुन्हा अरुंदच ठरणार आहे. विकासाची खरी कसोटी किती किलोमीटर रस्ता बांधला किंवा किती कोटी रुपये खर्च झाले यात नाही; त्या रस्त्यावरून सामान्य नागरिक किती सुरक्षितपणे चालतो, वृद्ध व्यक्ती रस्ता किती सहज ओलांडू शकते, मुलांना शाळेत जाताना किती सुरक्षित वाटते आणि अपघातात मृत्यूचे प्रमाण किती कमी झाले, यात आहे. रस्ते हे केवळ वाहनांसाठी नसतात; ते माणसांसाठी असतात. म्हणूनच विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने आता 'वाहनकेंद्री विकासा'कडून 'मानवकेंद्री वाहतूक नियोजना'कडे वळणे अपरिहार्य आहे. वाढत्या गर्दीला आणखी रस्ता देणे हा एकमेव उपाय नाही; वाढत्या गर्दीला शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापित करणे हाच खरा उपाय आहे. अन्यथा आज रस्त्यावर मुंग्यांच्या रांगेसारखी वाहने दिसतात, उद्या त्या गर्दीत माणसासाठी चालण्याची जागाही उरणार नाही.

प्रासंगिक

विशाल नंदागवळी
अकोला, मो. 9822480764

# आयुष्याला 'वन्स मोअर' नाही; म्हणून संवादाची कडी घट्ट करा!

**मुलांना डॉक्टर, अभियंता, वकील किंवा अधिकारी बनविण्यापूर्वी त्याला माणूस म्हणून घडवणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याला अपयश स्वीकारायला शिकवणे, नकार पचवण्याची ताकद देणे, अडचणी आल्यावर पुन्हा उभे राहण्याची हिंमत निर्माण करणे आणि मनातील भावना व्यक्त करण्याची मोकळीक देणे, हीच खरी पालकत्वाची कसोटी आहे. मुलाला सर्व सुखसोयी देणे म्हणजे संगोपन पूर्ण झाले, असे नाही. 'तू पडलास तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत' हा विश्वास त्याच्या मनात निर्माण करणे अधिक गरजेचे आहे. गुणपत्रिकेतील कमी गुण, नोकरीतील अपयश किंवा एखादी हौस पूर्ण न होणे यापेक्षा जीवन अधिक मौल्यवान आहे, हे मुलांच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे.**

एका घरातील तीन जीव गेले, पण प्रश्न केवळ त्या घरापुरता मर्यादित नाही. त्या घराच्या भिंतीबाहेर उभ्या असलेल्या आपल्या समाजाच्या मानसिकतेकडे पाहण्याची ही वेळ आहे. औरंगाबादमधील आई-वडिलांसह मुलाच्या आत्महत्येच्या घटनेने समाजमन सुन्न झाले आहे. आयफोनच्या हप्त्यांवरून वाद झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असली, तरी आत्महत्येमागचे नेमके कारण दुसरेही असू शकते, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे या घटनेकडे केवळ एका कारणाच्या चौकटीतून पाहणे योग्य ठरणार नाही. ही केवळ एका कुटुंबाच्या शोकांतिकेची कथा नाही. बदलती कुटुंबव्यवस्था, वाढत्या अपेक्षा, संवादाचा अभाव, भावनिक अस्थिरता आणि अपयश स्वीकारण्याची कमी होत चाललेली क्षमता यांसारखे अनेक गंभीर प्रश्न या घटनेच्या मागे दडलेले आहेत.

आत्महत्या कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही. मात्र, आत्महत्येचा विचार मनात येण्याच्या टप्प्यापर्यंत एखादी व्यक्ती पोहोचते, तेव्हा तिच्या मनात किती मोठा संघर्ष सुरू असतो, हे समजून घेणे आवश्यक आहे. बाहेरून सुखी, आधुनिक आणि व्यवस्थित दिसणाऱ्या मनाच्या बंद दरवाज्याआड एखादा जीव कदाचित असहायपणे मदतीची वाट पाहत असतो. त्या हाकेला आपण ऐकतो का, हा खरा प्रश्न आहे.

कवी अनंत राऊत यांच्या 'मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा...' या कवितेतील ओळी आज विशेष अर्थपूर्ण वाटतात

**''आत्महत्याच करणार नाही कुणी,
एक तू मित्र कर मनासारखा...''**

या ओळी आता केवळ कविता राहिलेल्या नाहीत; त्या समाजाची गरज बनल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीला मन मोकळे करण्यासाठी कुणीतरी हवे असते. असा मित्र, पालक, शिक्षक किंवा कुटुंबातील सदस्य हवा, ज्याच्यासमोर यशाचे प्रमाणपत्र दाखविण्याची गरज नसते आणि अपयश लपविण्याची भीतीही नसते.

आज मुलांवर अपेक्षांचे ओझे वाढत आहे. चांगले गुण, उत्तम करिअर, स्पर्धेत पुढे जाण्याची धडपड आणि समाजाच्या अपेक्षांना तोंड देण्याची सततची धावपळ... या सगळ्यात मुलांचे खरे भावविश्व कुठेतरी हरवत आहे. पालकांच्या अपेक्षा चुकीच्या असतीलच असे नाही. त्यामागे आपल्या मुलाचे भविष्य सुरक्षित व्हावे, हीच भावना असते. मात्र, प्रश्न अपेक्षा ठेवण्याचा नाही; त्या अपेक्षांचे ओझे मुलांच्या मनावर किती ठेवायचे, याचा आहे.

आज कुटुंबात संवाद कमी होत चालला आहे. एकाच घरात राहणारी माणसे अनेकदा भावनिकदृष्ट्या एकमेकांपासून दूर असतात. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे; पण मनापासून ऐकणारे कान कमी झाले आहेत. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण जोडले गेलो आहोत; मात्र प्रत्यक्ष आयुष्यातील नात्यांपासून तुटत चाललो आहोत. 'ऑनलाइन' असण्याची सवय वाढली, पण मनाने कोणासोबत 'जोडलेले' आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

'ही जनरेशन झेड आहे, त्यांना सगळे कळते,' म्हणून पालकांनी आपली जबाबदारी झटकणे योग्य नाही. आधुनिक तंत्रज्ञान हाताळणारी ही पिढी असली, तरी भावनिक प्रश्नांमध्ये ती तितकीच संवेदनशील असू शकते. तंत्रज्ञान माहिती देऊ शकते; पण जीवन जगण्याचे शहाणपण देऊ शकत नाही. त्यासाठी अनुभव, संस्कार, मानवी मूल्ये आणि नात्यांची ऊब आवश्यक असते.

मुलांना केवळ स्पर्धेत जिंकण्याचे प्रशिक्षण नको; तर पराभव स्वीकारण्याची मानसिकता हवी. प्रत्येक वेळी 'तूच सर्वोत्तम असला पाहिजेस' असे सांगण्याऐवजी 'तू अपयशी झालास तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत' हा विश्वास द्यायला हवा. कारण आयुष्यातील एखादे अपयश अंतिम नसते; पण जीवन गमावले तर परतण्याची संधी नसते.

म्हणूनच प्रत्येक घराने संवादाची कडी पुन्हा घट्ट करण्याची गरज आहे. मुलांशी बोला, त्यांचे ऐका, त्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घ्या. घरात अशी जागा निर्माण करा, जिथे अपयशाची भीती नसेल आणि मनातील वेदना व्यक्त करण्यासाठी परवानगी मागावी लागणार नाही. शाळा, महाविद्यालये, पालक आणि समाज यांनीही मानसिक व भावनिक सक्षमीकरणाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

औरंगाबादची घटना आपल्याला हादरवून सोडणारी आहे. मात्र काही दिवस चर्चा करून पुन्हा विसरून जाणे हा या घटनेचा खरा धडा ठरणार नाही. या घटनेने आपल्या कुटुंबव्यवस्थेला आरसा दाखवला आहे. त्या आरशात दिसणारे वास्तव स्वीकारण्याची हिंमत समाजाने दाखवली पाहिजे. प्रत्येक मुलाला संपत्तीपेक्षा सुरक्षित नाते द्या. यशापेक्षा आत्मविश्वास द्या. स्पर्धेपेक्षा संवेदना द्या. महागड्या वस्तूंपेक्षा मनासारखा मित्र द्या. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजेअडचणी कितीही मोठ्या असल्या तरी जीवन संपवणे हा पर्याय नाही, हा विश्वास द्या.

कारण आयुष्याला 'वन्स मोअर' नसतो. गेलेला क्षण परत येत नाही आणि गेलेला जीवही परत येत नाही. म्हणून आत्महत्येच्या विचारापर्यंत पोहोचलेल्या प्रत्येक मनाला समाजाने एकच सांगितले पाहिजे

**''थांब... बोल... मदत माग... पण आयुष्य सोडू नकोस!''**

# विवेक बुद्धीचा वापर करून निर्णय घ्या !

भारत चंदेल
नागपूर

ज्यांचं लग्न झालं आहे, मुलं बाळ आहे अशा व्यक्तींना मी सांगू इच्छितो की कोणत्याही नेत्यांच्या किंवा वक्त्यांच्या भाषणाने खूप जास्त इमोशनल किंवा प्रभावित होऊ नका .स्वतःच्या विवेक बुद्धीचा वापर करूनच कोणताही निर्णय घ्या .तुमचं प्राथमिक कर्तव्य हेच आहे की तुम्ही तुमच्या संसाराचा, परिवाराचा सांभाळ करायला पाहिजे. तुमच्या मुलांच शिक्षण, त्यांचा आरोग्य ,आणि त्यांचे भविष्य याकडे लक्ष देणे हे तुमचं कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे तुमची धर्मपत्नी, आणि तुमच्या परिवारातील सर्व सदस्य कसे सुखी होतील किंवा तुमच्या उदरनिर्वाह करण्यासाठी तुम्हाला काय करावे लागेल याच्याकडे तुमचे प्रथम लक्ष असले पाहिजे. समाजसेवा प्रत्येकानेच करायला पाहिजे परंतु तुम्ही जर सांसारिक असाल तर कमीत कमी दिवसातील आठ ते दहा तास तुम्ही पैसा कमावण्यासाठी किंवा तुमच्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी नक्कीच द्यायला पाहिजे. तुम्ही जर आपल्या जीवनाचा किंवा दिवसाचा पूर्ण वेळ समाजसेवेत देत असाल आणि त्याच्यामुळे जर तुमचे मुलं बाळ किंवा बायको किंवा तुमच्या परिवारातील कोणतेही तुमच्यावर अवलंबून असलेले सदस्य जर रस्त्यावर येत असतील किंवा त्यांना आर्थिक त्रास होत असेल किंवा त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होत नसतील, ते लोक दुःखदायक जीवन जर जगत असतील तर मग तुमच्या समाजसेवेचा काय उपयोग. तुमच्या परिवारातील लोकांना होणारा आत्मिक, आर्थिक, भावनिक आणि मानसिक त्रास आणि त्यांच्यामुळे त्यांच्या मनातून निघलेला तडतडात व हाय श्राप हा तुम्हालाच लागेल आणि तुम्हालाच ते भोगाव लागेल.समाजसेवा करा देशासाठी वेळ द्या ,देशभक्त व्हा परंतु याचबरोबर आपल्या परिवाराकडे सुद्धा लक्ष द्या. जे लोक घरचे सक्षम आहेत किंवा खानदानी रईस आहेत त्यांना काहीच फरक पडत नाही. त्यांनी संपूर्ण वेळ समाजसेवेत दिला तरी काहीच हरकत नाही किंवा ज्यांचं लग्न झालं नाही किंवा ज्यांच्यावर कोणीच अवलंबून नाही त्यांनी सुद्धा समाजसेवेत पूर्ण वेळ द्यायला पाहिजे .परंतु संसारिक लोकांनी चोवीस तासांपैकी कमीत कमी आठ तास हे आपल्या परिवाराकडे व त्यांच्या उदरनिर्वाह कसा चालेल या गोष्टीकडे लक्ष द्यायला पाहिजे. मित्रांनो राजकारण हा एक व्यापार आहे ,परंतु राजकारण ही एक समाजसेवा सुद्धा आहे .आणि ती त्या व्यक्तीवर अवलंबून असते जो राजकारणात आहे आणि तो राजकारणाला काय समजतो. जो माणूस राजकारणाला व्यापार समजतो तो जिंकण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो .आणि यात महत्त्वाचा थर म्हणजे भाषणबाजी. हे राजकीय लोक आपल्या भाषणात असे काही बोलून जातात की त्यांचा प्रभाव हा सर्व सर्वसामान्य लोकांच्या मनावर नक्कीच होत असतो. आणि लोक सुद्धा त्याचप्रमाणे वागू लागतात. काही नेते मंडळी सत्य सांगत असतात परंतु काही नेते मंडळी जिंकण्यासाठी खोटं बी सांगू शकतात .आणि म्हणून प्रत्येकाने स्वतःच्या विवेक बुद्धीचा वापर करूनच नेत्यांच्या भाषणाला योग्य की अयोग्य ते समजायचं आहे. मित्रांनो नेता कोणत्याही पार्टीचा असो त्यांच्या भाषणाला किंवा त्यांच्या वक्तव्यावाला ऐकून स्वतःचा ब्रेनवॉश करून घेऊ नका. तुम्ही तुमच्या पोराबारांकडे, बायकोकडे आणि आपल्या परिवाराकडे सर्वात जास्त लक्ष द्या. आणि जीवन हे जगण्यासाठी आहे ते चांगल्या प्रकारे कसे जगता येईल ,आपल्या घरची आर्थिक परिस्थिती अधिक सुदृढ कशी होणार ,आपला जगण्याचा स्तर कसा वाढेल, आपण सुद्धा एक चांगल्या प्रकारचे जीवन कसं जगू यासाठी मेहनत करा. उद्योग करा, नोकरी करा, काम करा .पुन्हा एकदा सांगतो दिवसातील आठ ते दहा तास मेहनत करा आणि मग करा समाजसेवा आणि ऐका नेत्यांचे भाषण. पण बुद्धीचा वापर करून.

परिवाराकडे लक्ष देऊन सुद्धा समाजसेवा आणि देशसेवा करता येते. आणि म्हणून समाजसेवा आणि देशसेवा नक्कीच करा त्याच्यासाठी मी विरोध करत नाही.फक्त आपल्या प्राथमिक कर्तव्यांना विसरू नका त्याच्यासाठी हा संदेश लिहिला आहे. धन्यवाद.

# ओळख पक्ष्यांची : श्वेतकंठी वटवट्या



चित्रात दाखवलेला पक्षी लेसर व्हाइटथ्रोट (Curruca curruca) असावा, जो त्याच्या राखाडी-तपकिरी रंगाच्या वरच्या भागासाठी आणि पांढरट घशासाठी ओळखला जाणारा एक लहान स्थलांतरित वॉर्बलर आहे.ओळख आणि अधिवास: जुन्या जगातील वॉर्बलर कुळातील एक लहान पॅसेरिन पक्षी, जो भारतीय उपखंडात स्थलांतर आणि हिवाळ्याच्या काळात सामान्यतः मोकळ्या जंगलात, झुडपी प्रदेशात आणि बागांमध्ये आढळतो.प्रमुख वैशिष्ट्ये: यात एक साधे राखाडी डोके, डोळ्याभोवती किंचित गडद मुखवटा, त्याउलट फिकट घसा आणि राखाडी-तपकिरी पंख व शेपटी यांचा समावेश आहे. **(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)**

# श्रावण

मागोवा

सौ. चैताली वरघट
मो. 9834583685

**अनेक गुणधर्म असलेली दिसें
माळरानात बांधावर रानभाजी
भरपूर औषधी गुणधर्म त्यात
ते घेई... आरोग्याची काळजी**

श्रावण महिना हा सहसा पावसाळी भाज्या खाण्यासाठी प्रसिद्ध आहे. श्रावण महिन्यात चांगले आणि पौष्टिक अशा हिरव्या पालेभाज्या मिळतात. हिरव्या पालेभाज्यामुळे आरोग्याला फायदा मिळतो. त्यामुळे अशा भाज्यांचा आस्वाद अधिक घ्यावा. सहसा या काळात मासाहार करण्यात येत नाही. श्रावण महिन्याचे महत्व हे धार्मिक पौराणिक आणि आरोग्यदृष्ट्या ही अधिक मानण्यात येते. प्रत्येक अश्या धर्मा नुसार श्रावण महिन्याचे खास वैशिष्ट्य आहे. श्रावण हा पावसाळा ऋतूमध्ये येणारा महिना आहे. निसर्गातही यावेळी अत्यंत उत्साह असतो. सणाचा राजा म्हणून श्रावण महिना ओळखण्यात येतो. श्रावण महिना हा आल्हाददायक सगळ्यांना हवाहवासा वाटणारा ऋतू. श्रावणातील पावसाची विविध रूपे असतात आणि हेच श्रावणातील पावसाचे वैशिष्ट्य समजण्यात येते. श्रावण सुरू झाल्यावर पावसाची रिमझिम सुरू होते. त्या आधी आषाळात धो धो कोसळणारा पाऊस जरा सौम्य होतो. लहान मुलांना हा पाऊस अधिक आवडतो. तर कधी अचानक पाऊस वाऱ्यासह अधून मधून येत असतो. जो प्रेमळ,मनमोहक हवाहवासा वाटतो. याशिवाय कधीतरी मुसळधार पाऊसही पडतो. तर क्षणात ऊन आणि क्षणात पाऊस हे देखील श्रावणातील पावसाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा या पावसामुळे निसर्गातही अनेक बदल होतात आणि संपूर्ण सृष्टी हिरवीगार दिसू लागते. मात्र श्रावणातील पाऊस हा सहसा निसर्गाला हानी पोहोचवेल असा कधीही बरसत नाही. पावसाळा सुरू झाला की अनेक जण विशेषतः महिला या श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मराठी श्रावण महिना म्हटलं की सर्व सणांचा राजा मानला जातो. श्रावण महिन्याचे महत्त्व आपल्याकडे अधिक आहे. श्रावण महिना हा कोणत्या ऋतूत येतो हे वेगळे सांगायची गरज नाही. पावसाळा ऋतूमध्ये येणारे श्रावण सण



प्रत्येकाला हवेसे वाटतात. श्रावण महिन्यात अनेक सण असतात. श्रावणातील पावसाचे वैशिष्ट्य म्हणजे क्षणात पाऊस आणि क्षणात ऊन दिसून येते. अशा या मनाला उभारी आणणारा श्रावण महिन्याचे महत्त्व आहे. श्रावण महिन्यातील सण मात्र या संपूर्ण महिन्यात अगदी हौशीने साजरे केले जातात. निसर्ग तसेच परंपरा या दोन्ही सृष्टीने श्रावण महिन्याचे महत्त्व आहे. चतुर्मासातील सर्वात श्रेष्ठ महिना म्हणून श्रावण महिन्याची ओळख आहे. आषाढी अमावस्येला दिव्याची आरास केल्यानंतर सर्व व्रतवैकल्यांना सुरुवात करण्यात येते. यानंतर निसर्गातील वातावरण ही बदलते आणि ऊन पावसाचा खेळ श्रावणामध्ये सुरू होतो. रसरशीत हिरव्या भाज्यांचा हा महिना सुरू होतो. श्रावण महिना हा उत्सवाचा महिना म्हणून ओळखला जातो. आणि म्हणूनच याला सणांचा राजा श्रावण असे म्हणतात. कारण बरेच मराठी सण या महिन्यात असतात. विशेषता महिलांसाठी हा महिना खास असून विवाहितांसाठी तर माहेरी जाण्याची पूर्ण पर्वणीच असते. श्रावण महिना म्हटलं की डोळ्यासमोर येतात ते अत्यंत निर्मळ असं वातावरण आणि नजरेस पडते ती सर्व हिरवीगार सृष्टी. श्रावण महिन्यात बरेचं सण उत्सव साजरे केले जातात. जसे की नागपंचमी, मंगळागौरी, श्रावण सोमवार, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, कृष्ण जन्माष्टमी, दही काला, पिठोरी अमावस्या, शेतकरांचा सण पोळा इत्यादी सण उत्सव साजरे केले जातात. तसेच बौद्ध धम्मीयांच्यासाठी श्रावण महिना वर्षावास उपासना या दृष्टीने अधिक महत्वाचा मानला जातो.

आता येणार श्रावण
चाहूल झाली श्रावणाची
व्रत उपासनेचा महिना
सांगे सृष्टीची कहाणी

# 'आवारापन २'चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

**मुंबई :** इमरान हाश्मी आणि दिशा पाटनी यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'आवारापन २' सध्या बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत आहे. ॲक्शन, रोमॅन्स आणि थ्रिलरचा मेळ असलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांना थिएटरकडे आकर्षित करण्यात यश मिळवले असून, कमाईच्या आकडेवारीतही त्याचा प्रभाव दिसून येत आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाने सनी देओलच्या 'बटवारा १९४७'ला मागे टाकत देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर आपली पकड मजबूत केली आहे. प्रदर्शनानंतर अवघ्या पाच दिवसांत 'आवारापन २'ने १०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला. आठव्या दिवसापर्यंत भारतातील चित्रपटाची कमाई सुमारे ११९ कोटी रुपयांवर पोहोचली होती. शुक्रवारी सुमारे ५.५० कोटी रुपयांची कमाई केल्यानंतर शनिवारी प्रेक्षकसंख्येत वाढ झाल्याने व्यवसायात पुन्हा सुधारणा झाली. त्यामुळे दुसऱ्या वीकेंडमध्ये चित्रपटाच्या कमाईत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 489



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
आका, कला, काल, काका, ग्रास, चय, जोडा, तर, थर, थाट, दाब, दास्य, भाग, भाता, मग, मध, मादी, मार, यज्ञ, रीत, वसा, सण, सर, साख, सात, साद, सार, सुर, हवा

**तीन अक्षरी**
कणव, कणेर, काजवा, काळीज, केसर, खारीक, गणेश, चकवा, चाहूल, ठाकूर, नटवा, प्रासाद, बगळा, भजन, मणेर, मरण, मशाल, रबर, रीवाज, लगदा, वाफारा, शंकर, सतत, सरडा, सरण, सहल, संस्कार

**चार अक्षरी**
आकलन, आगमन, आकर्षण, गजगति, घसरणे, जोपासना, टरफल, डरकाळी, दणकट, प्राथमिक, भस्मसात, भस्मासुर, मनोरथ, मिळकत, मोहरम, रक्तगट, रखरख, रगदार, रसदार, रातांधळा, रामदास, लागवड, समरस, सहोदर, हटवादी

**पाच अक्षरी**
कलमवार, गरगरणे, टरकावणे, तरणाताठा, नागरमोथा, नामस्मरण

रगडमल्ली, लाखात एक, शरीरयष्टी, सासुरवास

**सहा अक्षरी**
ग्राम पंचायत, लक्ष्मी नारायण, वाजत गाजत, सादर प्रणाम, सुगम संगीत

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 874



**—: आडवी विधाने :—**

१) आन्ध्र प्रदेशची राजधानी
५) सुर्योदयापूर्वी व सुर्यास्तानंतर दिसणारा प्रकाश
७) शोध, मागोवा
९) एक वृक्षविशेष
१०) टरफलासहित असलेले तांदूळ, धान,
११) डोंगर, जंगल, खिंड इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या व शिकार करून निर्वाह करणाऱ्या लोकांची एक जात
१२) गव्हाचे दाणेदार पीठ
१४) अयोध्या नगरी
१६) युध्द, लढाई,
१७) मनाई, निषेध,
१९) पाटाचे पाणी आंत घेऊन शेतीसाठी केलेला खळगा
२०) आंब्याचा राजा म्हणून प्रसिद्ध उत्तम आंब्याचा एक प्रकार
२१) अंतर्बाह्य, सर्वत्र, चोहोबाजूंनी, काठोकाठ
२२) देवांचे पेय
२३) जुन्याकाळी लुटालूट करणाऱ्या लुटारू लोकांची टोळी
२४) खोडकर मुलगा, ब्रात्य
२५) तांडेल, दर्यावर्दी
२७) देवाला वाहण्यात येणारे आठ सुगंधी द्रव्ये एकत्र करून केलेले द्रव्य
२९) फायदा, प्राप्ती
३०) यज्ञ, हवन, होम
३१) चकित, आश्चर्ययुक्त
३२) मैत्रीण, स्त्रीमित्र, सोबतीण
३५) नाहीसे होणे, दिवा विझविणे
३६) बाजू, पक्ष, एखाद्याची बाजू घेणे
३७) वेंध, झेप, उडी, विळखा
३८) मेहूणा, बायकोचा भाऊ
३९) हत्तीवरील अंबारीत मागे बसण्याची जागा
४०) लाड, प्रेम, जिव्हाळा
४१) भय, भीती (हिं)
४३) उष्णता, गरमपणा
४४) सूक्ष्म व अति सूक्ष्म पदार्थ पाहण्याचे यंत्र
४७) जीवनशक्ती, जीव, प्राणशक्ती
५०) ज्ञाता, जाणणारा, साक्षात्कार झालेला
५१) जन्म देणारा, पिता
५३) संबंध (नात्याचा, स्नेहाचा), पत्ता, ठावठिकाणा
५६) लुटून आणलेले द्रव्य, सढळ हाताने केलेला खर्च
५७) विशाल, फार मोठे,
५९) अस्वल, आळशी व घाणेरडी व्यक्ती
६०) स्तुती करणे, प्रशंसा
६१) हिरा, रत्न
६३) डोकं खाजवायला प्रवृत्त करणारा एक क्षुद्र जीव
६४) रोजचे नियमित खाणे
६६) स्त्रियांनी गळयात घालावयाचा एक अलंकार
६७) मोक्ष, सद्गती
६८) सूर्यकिरणांपासून शरीराला मिळणारे व्हिटॅमिन
६९) गीतांना वाद्यवृंदाचा दिलेला साज

**—: उभी विधानेः—**

१) हिंमत, धैर्य, धाडस
२) अंत्यसंस्काराच्या वेळी लागणारे मातीचे भांडे
३) अंगिकारलेले व्रत, सुताचा धागा
४) जानेवारी महिन्यात येणारा एक सण
५) अरसपाण, एका जातीचा उत्तम प्रतीचा पांढरा दगड, मार्बल
६) निर्माण करण्याची कार्यपद्धती
७) तरतरीत, हुशार
८) मोत्यांची माळ
१३) वारसा हक्क असलेला
१५) जोम, उत्साह, प्रफुल्लित
१८) मेहनतीचे कार्य, अतिशय श्रम
१९अ) ध्वनि, शब्द
२०) हस्तचापल्य, नजरबंदी
२१) जोराची खेचाखेच, मानसिक ताणतणाव
२२) बेकायदेशीर
२४) वाराणसी, बनारस
२५) संगीतातील चीजेचा एक प्रकार, यांत श्रृंगाररस प्रधान असतो
२६) पडीत जमीन शेतीच्या उपयोगाची करणे
२७) बायकोची मोठे बहीण
२८) गंगेचे उगमस्थान
३१) अतिश्रमाने इंद्रियांना येणारी ग्लानी
३२) संपूर्ण, सगळे
३३) निमगोरा
३४) बढाई मारणे, शेखी, प्रौढी, आत्मस्तुती
३५) द्वाड चाळे, वानर थेर
३७) पत्नी, भार्या (सं.)
३९) काळजी, दक्षता, सावधगिरी
४२) रममाण झालेला निमग्न
४५) पोलीस कचेरीतील मुख्य अधिकारी
४६) यंत्र चालविणारा, यंत्राद्वारे तयार झालेले
४८) उर्दूत अभिमान
४९) उंचीने कमी असलेला
५०) पैसे नसलेला, कंगाल, गरीब
५२) साठ मिनीटांचा अवधी
५३) रणांगण, समरभूमि
५४) मित्र, सखा (हिं.)
५५) रामायणात सीतेचे हरण करणारा राक्षस, रामायणाचा खलनायक
५८) फुंकून विस्तव फुलविण्याकरिता असलेली बांबू, पितळ इत्यादीची नळी
६२) एक विदेशी मद्य प्रकार
६४) विष्णुपत्नी
६५) व्याधी ग्रस्त, आजारी व्यक्ती

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# नागपुरातील कार्यक्रम उत्स्फूर्त सहभागाचा, आणलेल्या लोकांचा नव्हता

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा राहुल गांधी यांना टोला!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि.२३ :**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी राज्यभरातून आलेल्या जेन झीसोबत संवाद साधला. कार्यक्रमानंतर त्यांनी नागपुरातील कार्यक्रम उत्स्फूर्त सहभागाचा, आणलेल्या लोकांचा नव्हता असे नमुद केले. त्यांचा रोख काल, शनिवारी झालेल्या राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाकडे होता.

नागपुरात कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. मंथन फॉर युवा या कार्यक्रमातून महाराष्ट्राचे खरे जेन झी आज अनुभवले. ४१०० मुलांमुलींनी ढोल ताशा वादनाचा विक्रम केला. जेन झी यांना दिशा दाखवणारा हा कार्यक्रम होता. गेले काही दिवस मंथन फॉर युवाच्या माध्यमातून दीड लाख तरुणांनी भाग घेतला. आजही रेशीमबाग मैदानावर २० ते २५ हजार तरुण तरुणी उपस्थित होत्या. वेगवेगळ्या क्षेत्रात मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा कार्यक्रम होता, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



यावेळी फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या कार्यक्रमात आलेले आदिवासी विद्यार्थी नेते कुठल्या पक्षाचे होते, तेही बघावे, असा टोला मारला. आदिवासी विदयार्थ्यांना महाराष्ट्र सरकार जेवढ्या योजनाचा लाभ देते, तेवढे कोणतेही राज्य देत नाही. वसतिगृहात जागा न मिळालेल्या २० हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६० हजार रुपये देण्यात येत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. तरुणाईला दिशा देण्यासाठी अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

रेशीमबाग येथील कार्यक्रमातून भाजपाकडून फडणवीस यांची प्रतिमा युथ आयकॉन अशी करण्यात येत असल्याची चर्चा रंगली आहे. देशात सध्या जेन-झीवर भुरळ पाडण्याची राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. केंद्र सरकारने तर प्रत्येक मंत्र्यांना एक दिवस एक विद्यापीठ हा कार्यक्रम दिला आहे, तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमातून तरुणांशी संवाद साधत आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांना भाजपकडून युवकांचे नेते म्हणून 'प्रोजेक्ट' केले जात असल्याची चर्चा रंगली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधत देवेंद्र फडणवीस हे नेहमीच युवकांचे 'युथ आयकॉन' राहिले आहेत. महाराष्ट्रातील युवकांचा त्यांच्यावर विश्वास असून त्यांच्या भूमिकेशी युवक सहमत आहेत. नागपुरात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या धर्तीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातील. हा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पसंतीचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमाला महिला, विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी या कार्यक्रमातून महिला व विद्यार्थिनींच्या अधिकारावर भाष्य केले. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे असल्याचा आरोप केला. पुण्यातील कार्यक्रमात राहुल गांधी महिला अधिकारावर बोलले, परंतु याच राहुल गांधी यांनी महिला आरक्षणाला विरोध केला. त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहे. काँग्रेस दिशाहीन पक्ष असून केवळ बोल बच्चन करणारे नेते आहे. या पक्षाची जमिनीपासून नाळ तुटली आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

## महत्त्वाचे

### १४ वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**चंद्रपूर :** शाळेत शिक्षकांनी केलेल्या तक्रारीनंतर घरी आलेल्या एका १४ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना चंद्रपुरात उघडकीस आली. तनिष्का सुनील गाडगे (वय १४, रा. आनंदनगर प्लाझा अपार्टमेंट, चंद्रपूर) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

तनिष्का ही चंद्रपुरातील कार्मेल अकॅडमीमध्ये नववीच्या वर्गात शिक्षण घेत होती. शनिवारी तिने वर्गातील फळ्यावर काही मजकूर लिहिल्याचे समोर आले. या प्रकाराची दखल घेत शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी तिच्या वडिलांना तातडीने शाळेत बोलावून घेतले. शाळेत पोहोचल्यानंतर शिक्षकांनी तनिष्काबाबत तिच्या वडिलांकडे तक्रार केली. त्यानंतर वडिलांनी तिला समजावून सांगत घरी आणले. तनिष्काला घरी सोडल्यानंतर ते न्यायालयीन कामासाठी निघून गेले.

काही वेळाने तनिष्काची आई घरी परतली असता ती गंभीर अवस्थेत आढळून आली. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली.

### यवतमाळात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**यवतमाळ :** जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेच्या वतीने २३ ऑगस्ट २०२६ रोजी दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम पार पडला. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन वाहनतळ येथे हा सोहळा पार पडला.वृत्तपत्र विक्रेते आणि त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आकाश परतेकी, युसुफ, श्रीराम खत्री, संतोष शिरभाते, अशोक शिंदे आणि जयंत राठोड उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विधि मनोज आगलावे, किमया धनंजय विखार आणि सक्षम संतोष पाठक यांचा सत्कार झाला. तसेच विधि सुधाकर बाविस्कर, खुशी देवानंद वाघमारे आणि सुधासु लक्ष्मण भुजाडे यांचाही गौरव करण्यात आला.

### बाभुळगाव येथे शेतकरी प्रशिक्षण शिबिर

**बाभुळगाव, :** शेतकऱ्यांना शेतीविषयक आधुनिक व तांत्रिक माहिती मिळावी, तसेच कापूस, सोयाबीन व तूर पिकांवरील किडी, रोग आणि बदलत्या हवामानामुळे होणारे परिणाम याबाबत योग्य उपाययोजना करता याव्यात, यासाठी दि. १८ ऑगस्ट रोजी सम्राट दाल मिल येथे कापूस उत्पादकता अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी शेतकरी सुनील खोडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ येथील कीटकशास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मगर उपस्थित होते. तसेच प्रभारी तालुका कृषी अधिकारी अनिल राठी, निवांत ॲग्रो कंपनीचे अध्यक्ष आशिष दिघाडे आणि शेतकरी मधुकर निवल यांची प्रमुख उपस्थिती होती. सध्या खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन आणि तूर ही प्रमुख पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. कापूस पिकावर मावा, तुडतुडे, पांढरी माशी व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींचा तसेच पुढील अवस्थेत बोंडअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. सोयाबीन पिकावर चक्री भुंगा, खोडमाशी, पाने खाणाऱ्या अळ्या यांसह विविध किडींचा प्रादुर्भाव होऊ शकतो. पिकांची पाने कुरतडलेली दिसणे, पाने पिवळी पडणे, झाडांची वाढ खुंटणे, तसेच अतिपाऊस किंवा पावसातील खंड यामुळे पिकांवर होणारे परिणाम याबाबत डॉ. प्रमोद मगर यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

# कुही तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या खतांची विक्री

## गुणवत्ता नियंत्रण अधिकारी कारवाई का करत नाहीत? शेतकऱ्यांचा सवाल



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुही , दि.२३ :**तालुक्यातील मांढळ, वेलतूर आणि पचरखेडी या परिसरातील काही कृषी सेवा केंद्रांवर निकृष्ट दर्जाची रासायनिक खते विक्री केली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. यामुळे गरीब शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ''कुठेतरी पाणी मुरत आहे का?'' असा सवाल आता शेतकऱ्यांमध्ये उपस्थित होत आहे.

तालुका कृषी अधिकारी गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक श्री. हरीष बालपांडे यांच्या अखत्यारीत हा परिसर येतो. शेतकऱ्यांनी अनेकदा तोंडी आणि लेखी तक्रारी करूनही अद्यापपर्यंत कोणत्याही दुकानावर तपासणी किंवा कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप आहे.

खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण खते उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी विभागाने मांढळ, वेलतूर, पचखेडी येथील कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची तपासणी सुरू केली आहे. खतांचा साठा, दर आणि बिल तपासून निकृष्ट खतांची विक्री रोखण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत केंद्रातूनच बिलासह खते खरेदी करावीत असे आवाहन करण्यात आले आहे.

**विजय पाटील,**
उपविभागीय कृषी विभाग उमरेड

पिकाच्या महत्वाच्या काळात शेतकऱ्यांना महागड्या दराने निकृष्ट दर्जाचे खत दिले जात आहे. त्यामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. ''आम्ही कर्ज काढून खत घेतो आणि शेवटी हाती काहीच लागत नाही. अधिकाऱ्यांना सांगूनही उपयोग होत नाही'' अशी खंत एका शेतकऱ्याने व्यक्त केली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाईची प्रतीक्षा प्रशासनाकडून कारवाई न झाल्याने आता शेतकरी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडे तक्रार करून तातडीने कारवाईची मागणी करत आहेत. कृषी विभागाने तातडीने सर्व कृषी सेवा केंद्रांची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# मृद व जलसंधारण दिनानिमित्त लोणाबेळ येथे वृक्षारोपण

**आर्णी :**मृद व जलसंधारण दिनानिमित्त तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी राज्यपाल दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोणबेळ येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. शांतीदूत बहुउद्देशीय संस्था, लोणबेळ यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात हा वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

मृद व जलसंधारण, पर्यावरण संवर्धन तसेच वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. याच उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून शाळेच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणानंतर लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारीही संबंधितांकडून घेण्यात आली. दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पर्यावरणप्रेमी विचारांना अभिवादन करत हा उपक्रम राबविण्यात आला. निसर्गाचे संवर्धन, मातीची धूप रोखणे, पाण्याचे संवर्धन आणि भावी पिढीसाठी हिरवेगार पर्यावरण निर्माण करणे, हा वृक्षारोपणामागील प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका उधडे यांच्यासह शिक्षिका संगीता गारे , भारधाय मॅडम, महल्ले , काटोळे तसेच नागभिडे, इंगोले, अलावद, चव्हाण आणि सारिका गिरी आदी शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

# तुकाराम मुंडेंपाठोपाठ आता नागपूर पोलीस ॲक्शन मोडवर, सव्वा लाखांचा प्रतिबंधित तंबाखू जप्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नागपूर , दि.२३ :**अन्न व औषध प्रशासनाचे धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभर अन्न, खाद्य पदार्थ भेसळ आणि बेकायदेशीर औषध विक्रेत्यांवर कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्यामुळे राज्यातील भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. शासनाकडून प्रतिबंधित तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थाची बेकायदेशीर मार्गाने होणाऱ्या विक्रीस प्रतिबंध हा देखील त्यांच्याच अधिकार क्षेत्रातील विषय आहे. त्या अनुषंगाने मुंडे यांच्याच पावलावर पाऊल ठेवत आता नागपूर पोलीस देखील ॲक्शन मोडवर आले आहे.

प्रतिबंधित तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी धडक मोहीम सुरु केली आहे. याचाच एक भाग म्हणून पोलीस आयुक्तालयाच्या एस्कॉर्ट पथकाने शनिवारी रात्री मोठी कारवाई करत एक लाख १७ हजारांचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. पोलीस आयुक्तांच्या एस्कॉर्ट पथकाने वाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा छापा टाकला १ लाख १७ हजार ५०० रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ आणि पान मसाला जप्त केला आहे.

वाडी येथील अमरावती रोडवर गस्तीवर असलेल्या एस्कॉर्ट पथकाला २२ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास पथक गस्त घालत असताना'गुप्ता पान शॉप'वर अवैध गुटखा विक्री सुरू असल्याची गुप्त सूचना मिळाली. पथकाने रात्री ११.१० वाजता पान टपरी आणि गोदामावर अचानक छापा टाकून झडती घेतली.

या ठिकाणी आरोपी नितेश नत्थूलाल गुप्ता (३८ वर्ष, रा. गुप्ता बिल्डींग, वाडी, नागपूर) हा गोदामात उपस्थित होता.त्याच्याविरुद्ध वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छापा टाकल्यानंतर पोलिसांनी गुप्ता च्या ताब्यातून विमल बिग, रजनीगंधा, पान पराग प्रीमियम, व्ही.आय.विंग पानमसाला, बाबा ब्लॅक, राजश्री पान, सिग्नेचर, मिराज प्रतिबंधित तंबाखू, असा एकूण १ लाख १७ हजार ५०० रुपयांचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त केला.एस्कॉर्ट पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक भगवान कोळी, पोलीस उपनिरीक्षक उत्तम जायभाये, विजय गिरी, आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर, चंद्रकांत मेहत्रे आणि महिला अंमलदार गायत्री लांजेवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# नितीन गडकरींच्या हस्ते 'लोकरंगभूमी आणि लोकवाङ्मय' गौरवग्रंथाचे प्रकाशन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि.२३ :**लोककलेच्या समृद्ध परंपरेला आपल्या सर्जनशील प्रतिभेने नवे आयाम देणारे प्रख्यात लोककलावंत व दिग्दर्शक प्रा. डॉ. दिलीप अलोणे यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा गौरव करणाऱ्या 'लोकरंगभूमी आणि लोकवाङ्मय' या गौरवग्रंथाचे प्रकाशन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शनिवारी (२२ ऑगस्ट) नागपुरात उत्साहपूर्ण आणि भावपूर्ण वातावरणात झाले. लोकपरंपरा, लोककला, लोकनाट्य आणि लोकवाङ्मय यांच्या संवर्धनासाठी आयुष्यभर केलेल्या डॉ. अलोणे यांच्या योगदानाचा वेध घेणारा हा गौरवग्रंथ त्यांच्या कलाप्रवासाची नोंद घेणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार आहे. लोककलेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय कार्याचा गौरव या निमित्ताने करण्यात आला.



समारंभाच्या प्रारंभी डॉ. दिलीप अलोणे यांनी गणेशमूर्ती प्रदान करून नितीन गडकरी यांचा सत्कार केला. यावेळी डॉ. अलोणे यांच्या कलाक्षेत्रातील कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना गडकरी यांनी त्यांच्या लोककलेवरील निष्ठेचे कौतुक केले.

लोककलावंतांच्या कार्याचा दस्तऐवज पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, 'लोकरंगभूमी आणि लोकवाङ्मय' हा गौरवग्रंथ त्यादृष्टीने अत्यंत मोलाचा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोककला आणि लोकवाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून संशोधकांपर्यंत अनेकांसाठी हा ग्रंथ उपयुक्त संदर्भसाहित्य ठरेल. डॉ. दिलीप अलोणे यांच्या कलासाधनेबरोबरच लोकपरंपरेच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी हा गौरवग्रंथ निश्चितच महत्त्वाचा ठेवा ठरेल, असेही गडकरी यांनी नमूद केले. डॉ. मनोहर सुरवाडे आणि डॉ. उन्नती चौधरी यांनी या गौरवग्रंथाचे संपादन केले असून विजय प्रकाशन, नागपूर यांनी त्याचे प्रकाशन केले आहे. डॉ. अलोणे यांच्या कलाप्रवासाचे विविध पैलू, लोककलेशी असलेले त्यांचे नाते आणि त्यांच्या कार्याचा सांस्कृतिक ठसा या ग्रंथातून अधोरेखित करण्यात आला आहे.

# श्रावणात रान भाज्यांना पसंती! 'काटवल' च्या चवीला महागाईची किनार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गोंदिया , दि.२३ :** पावसाळा सुरू झाला की जंगलाच्या कुशीतून बाजारपेठेत दाखल होणाऱ्या रानभाज्यांना खवय्यांची विशेष पसंती मिळते. त्यातही वैशिष्ट्यपूर्ण चव आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीशी नाते सांगणाऱ्या 'काटवल'ला यंदा चक्क महागाईची किनार लाभली आहे. रविवारी गोंदिया भाजी बाजारात काटवलने तब्बल ४०० रुपये किलोचा भाव गाठत 'भाव' खाल्ला. आवक मर्यादित असतानाही ग्राहकांची मागणी कायम असल्याने या रानभाजीची विक्री वेगाने होताना दिसली.

श्रावण महिना सुरू झाल्याने अनेक कुटुंबांत मांसाहाराला विराम दिला जातो. त्यामुळे रविवारीच्या जेवणात नेहमीच्या भाज्यांपेक्षा काहीतरी वेगळे आणि रुचकर असावे, यासाठी नागरिकांचा कल हिरव्या व रानभाज्यांकडे वाढतो. काटवल महाग असला तरी त्याची वैशिष्ट्यपूर्ण चव आणि हंगामी उपलब्धता यामुळे खवय्ये दराकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत.



यंदा कमी पावसाचा परिणाम जंगलात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या काटवलच्या उत्पादनावर झाला आहे. परिणामी बाजारातील आवक घटली असून, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडत आहे. 'हंगामाची चव' जपण्यासाठी ग्राहकांना मात्र अधिक पैसे मोजावे लागत आहेत. दरम्यान, पावसाची परिस्थिती सुधारली नाही आणि जंगलातील आवक अशीच मर्यादित राहिली, तर हंगामाच्या अखेरीस काटवलचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे श्रावणातील रविवारी काटवलची चव घेण्यासाठी खवय्यांच्या खिशाला यंदा चांगलीच झळ बसत आहे.

यंदा कमी पावसाचा परिणाम जंगलात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या काटवलच्या उत्पादनावर झाला आहे. परिणामी बाजारातील आवक घटली असून, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडत आहे. 'हंगामाची चव' जपण्यासाठी ग्राहकांना मात्र अधिक पैसे मोजावे लागत आहेत. पावसाळा सुरू झाला की जंगलाच्या कुशीतून बाजारपेठेत दाखल होणाऱ्या रानभाज्यांना खवय्यांची विशेष पसंती मिळते. त्यातही वैशिष्ट्यपूर्ण चव आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीशी नाते सांगणाऱ्या 'काटवल'ला यंदा चक्क महागाईची किनार लाभली आहे. रविवारी गोंदिया भाजी बाजारात काटवलने तब्बल ४०० रुपये किलोचा भाव गाठत 'भाव' खाल्ला. आवक मर्यादित असतानाही ग्राहकांची मागणी कायम असल्याने या रानभाजीची विक्री वेगाने होताना दिसली.

श्रावण महिना सुरू झाल्याने अनेक कुटुंबांत मांसाहाराला विराम दिला जातो. त्यामुळे रविवारीच्या जेवणात नेहमीच्या भाज्यांपेक्षा काहीतरी वेगळे आणि रुचकर असावे, यासाठी नागरिकांचा कल हिरव्या व रानभाज्यांकडे वाढतो. काटवल महाग असला तरी त्याची वैशिष्ट्यपूर्ण चव आणि हंगामी उपलब्धता यामुळे खवय्ये दराकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत.

# भंडाऱ्यात खराब हवामानामुळे शेतात उतरले हेलिकॉप्टर

## मोहगाव करडी परिसरातील नागरिकांची काही काळ धावपळ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा , दि.२३ :**आकाशातून येणारा हेलिकॉप्टरचा प्रचंड आवाज आणि त्यानंतर शेतशिवारात झालेले अचानक लँडिंग यामुळे मोहगाव करडी परिसरातील नागरिकांची काही काळ धावपळ उडाली. नागपूरहून रायपूरच्या दिशेने प्रवास करणाऱ्या एका खासगी कंपनीच्या हेलिकॉप्टरला खराब हवामानामुळे पुढील मार्गावरील सिग्नल मिळत नव्हता. त्यामुळे चालकाने प्रसंगावधान राखत सुरक्षित जागेचा शोध घेत मोहगाव येथील शेतशिवारात हे हेलिकॉप्टर उतरविले.

अचानक झालेल्या या प्रकारामुळे हेलिकॉप्टर अपघातग्रस्त झाल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आणि घटनास्थळी गर्दी केली. मात्र, पोलिसांच्या चौकशीत हेलिकॉप्टर सुरक्षितपणे उतरविण्यात आल्याचे स्पष्ट झाल्याने सर्व ९ जणांनी सुटकेचा श्वास सोडला.



मोहगाव करडी येथील धनराज बांडेबुचे यांच्या शेताजवळ तसेच करडी-तुमसर मार्गालगत तलावाच्या परिसरात मोकळी जागा आहे. याच भागात सकाळी ११ वाजून ५ मिनिटांच्या सुमारास हे हेलिकॉप्टर उतरले. नागपूरहून रायपूरच्या दिशेने जाणारे त्रिवेणी कंपनीचे ४०७ जीएक्स हेलिकॉप्टर प्रतिकूल हवामानातून मार्गक्रमण करीत होते. वातावरणातील बिघाडामुळे पुढील दिशेचे सिग्नल मिळत नसल्याने चालक अनुराग यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत सुरक्षित जागेचा शोध घेतला. त्यानंतर हे हेलिकॉप्टर करडी आणि परिसरातील गावांच्या अगदी जवळून कमी उंचीवरून जाताना नागरिकांच्या नजरेस पडले. हेलिकॉप्टर नेहमीपेक्षा अत्यंत कमी उंचीवरून जात असल्याचे पाहून नागरिकांमध्ये कुतूहल आणि भीती निर्माण झाली. काही क्षणांतच ते मोहगाव परिसरातील शेतशिवारात उतरल्याने नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. हेलिकॉप्टर नेमके का उतरले, त्यात काही बिघाड झाला आहे का किंवा काही दुर्घटना घडली आहे का, अशा विविध शंकांमुळे परिसरातील नागरिकांची चिंता वाढली. पाहता-पाहता तिथे नागरिकांची मोठी गर्दी जमली. या घटनेची माहिती मिळताच करडी पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक फरताडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी हेलिकॉप्टरजवळ जाऊन चालक अनुराग यांच्याशी सविस्तर चर्चा केली. खराब हवामान आणि सिग्नल न मिळाल्यामुळे सुरक्षिततेसाठी हेलिकॉप्टर खाली उतरवल्याचे चालकाने स्पष्ट केले.

### सिग्नल मिळताच पुन्हा केले उड्डाण

काही काळ मोहगाव परिसरात सुरक्षितपणे थांबल्यानंतर हवामान आणि मार्गावरील परिस्थिती अनुकूल झाली. त्यानंतर दुपारी सव्वा बारा वाजताच्या सुमारास हेलिकॉप्टरने मोहगाव येथून पुन्हा यशस्वी उड्डाण केले आणि रायपूरच्या दिशेने आपला प्रवास सुरू केला. अलीकडच्या काळात हेलिकॉप्टर दुर्घटनांच्या घटना चर्चेत असताना मोहगाव परिसरातील या घटनेने काही वेळ चिंता वाढवली होती. मात्र, चालकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे संभाव्य धोका टळला असून, या घटनेमुळे वैमानिकाच्या समयसूचकतेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# भरधाव स्विफ्ट डिझायरची माजी सैनिकाला धडक; विजय चौधरी यांचा दुर्दैवी मृत्यू

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बेनोडा , दि.२३ :** घोराड येथे शेतीच्या कामासाठी जात असलेल्या माजी सैनिकाचा भरधाव वेगाने आलेल्या स्विफ्ट डिझायर कारच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे वरूड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृत व्यक्तीचे नाव विजय चौधरी असून ते मूळचे हातुर्णा येथील रहिवासी होते. सध्या ते वरूड शहरातील विजय नगर येथे वास्तव्यास होते. घोराड येथे त्यांची शेती असल्याने ते नेहमीप्रमाणे शेताकडे जात असताना हा भीषण अपघात घडला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विजय चौधरी हे शेताकडे जात असताना भरधाव वेगाने आलेल्या स्विफ्ट डिझायर कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, त्यात चौधरी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी नेण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वरूड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातास कारणीभूत ठरलेल्या चारचाकी वाहनाच्या चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, वाहनाचा वेग किती होता तसेच चालकाची जबाबदारी याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. माजी सैनिक विजय चौधरी यांच्या निधनामुळे हातुर्णा तसेच वरूड परिसरात शोककळा पसरली असून, त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघाताची पुढील कायदेशीर कारवाई वरूड पोलिसांकडून सुरू आहे.

# पडिक्कलचे शानदार शतक

## सलग दुसऱ्या टेस्टमध्ये १९३ चेंडूमध्ये ११७ धावा




**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसरा आणि अंतिम सामना सध्या सिंहलीज स्पोर्ट्स क्लब मैदानावर सुरु आहे. या महत्वाच्या सामन्यात कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडियाने सुरुवातीला के एल राहुलच्या रुपात पहिली विकेट गमावली. त्यानंतर, यशस्वी जैस्वाल तंबूत परतला. परंतु, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आलेल्या देवदत्त पडिक्कल शानदार फलंदाजी करत शतक झळकावले आहे.भारताचा युवा स्टार फलंदाज देवदत्त पडिक्कलने श्रीलंकेविरुद्ध सलग दुसरे कसोटी शतक ठोकले आहे. त्याने १६८ चेंडूंमध्ये आपले शतक झळकावले. हे त्याच्या कारकिर्दीतील दुसरे शतकही आहे. पडिक्कलने १९३ चेंडूमध्ये ११७ धावा केल्या. यामध्ये १२ चौकारांचा समावेश होता. केशरा नुवांथाने त्याना बोल्ड करत पव्हेलियनचा रस्ता दाखवला.

तिसऱ्या क्रमाकांवर फलंदाजीसाठी आलेल्या पडिक्कलने संयमी खेळी करत संघाला मजबूत स्थितीत आणले. त्याने शुभमन गिलसोबत १०० धावांची भागिदारी केली. पडिक्कलने रवींद्र जडेजासोबत ५० पेक्षा जास्त धावांची भागीदारीही केली आहे.पडिक्कलने गॉल कसोटीच्या पहिल्या डावात १६७ धावा केल्या. तो उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने गॉल कसोटीच्या दुसऱ्या डावात देखील म्हत्वपूर्ण ४४ धावा केल्या होत्या. आता त्याने कोलंबो कसोटीच्या पहिल्या डावात आणखी एक शतक झळकावले आहे. पडिक्कलने तिसऱ्या क्रमांकाच्या जागेसाठी आपला दावा मजबूत केल आहे. त्याने साई सुदर्शनचे कमबॅक कठीण केले आहे.

## ऑस्ट्रेलियाकडून बांगलादेशचा धुव्वा!




**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर दुसरी कसोटी खेळत आहे. भारताने पहिला सामना १६५ धावांनी जिंकला होता. भारताने ही मालिका २-० अशी जिंकली तर टीम इंडियाची विजयाची टक्केवारी ५७.५८ होईल.मॅके येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने बांगलादेशचा एक डाव आणि ५१ धावांनी पराभव करत कसोटी मालिकेत दमदार पुनरागमन केले. अवघ्या दोन दिवसांत आटोपलेल्या या सामन्यातील विजयामुळे दोन कसोटी सामन्यांची ही मालिका १-१ अशी बरोबरीत सुटली आहे. बांगलादेशच्या या पराभवाचा थेट फायदा भारतीय संघाला गुणतालिकेत मिळण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे.ऑस्ट्रेलियान आणि बांगलादेश कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात बांगलादेशचा पहिला डाव अवघ्या ६४ धावांवर गुंडाळला गेला. यानंतर ऑस्ट्रेलियाच्या संघाने पहिला डाव २१० धावांपर्यंत मजल मारत १४६ धावांची आघाडी घेतली होती. ऑस्ट्रेलियास पहिल्या कसोटीत पराभूत करणारा बांगलादेशचा संघ दुसऱ्या डावात पुनरागम करेल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र ऑस्ट्रेलियाच्या भेदक गोलंदाजीसमोर कोणतेही उत्तर नव्हते. बांगलादेशचा दुसरा डावात ३८.३ षटकांत अवघ्या ९५ धावांत धुव्वा उडाला. या सामन्यात ऑस्ट्रेलिाच्या मिचेल स्टार्कने १० विकेट घेतल्या.भारतीय संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर दुसरी आणि शेवटची कसोटी खेळत आहे. भारताने पहिला सामना १६५ धावांनी जिंकला होता. भारताने ही मालिका २-० अशी जिंकली तर भारताची विजयाची टक्केवारी ५७.५८ होईल. यामुळे भारतीय संघ बांगलादेशला मागे टाकत गुणतालिकेत थेट चौथ्या स्थानावर झेप घेईल. पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा ९ गडी राखून पराभव करणाऱ्या बांगलादेशची टक्केवारी ६६.६७ वरून थेट ५५.५६ पर्यंत खाली घसरली आहे.मॅके येथील विजयानंतर अव्वल स्थानी असलेल्या ऑस्ट्रेलियाची टक्केवारी ७७.७८ वरून ८०.०० वर पोहोचली असून त्यांचे पहिले स्थान अधिक मजबूत झाले आहे.

## महत्त्वाचे

### दुलीप ट्रॉफीमध्ये वैभव सूर्यवंशीची निराशाजनक सुरुवात

**नवी दिल्ली:** दुलीप ट्रॉफी २०२६-२७ च्या पहिल्या उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) सामन्यात ईस्ट झोन आणि नॉर्थ-ईस्ट झोन आमनेसामने आले आहेत. बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात सर्वांच्या नजरा युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशीवर खिळल्या होत्या. पहिल्यांदाच दुलीप ट्रॉफी खेळणाऱ्या वैभव सूर्यवंशीची सुरुवात मात्र अत्यंत निराशाजनक झाली. नॉर्थ-ईस्ट झोनविरुद्ध खेळताना तो ६ चेंडूंत ८ धावा करून बाद झाला. या आठ धावा त्याने दोन चौकारांच्या मदतीने केल्या. बिश्वोरजीत सिंह कोंथौजामने त्याला जोसेफ लाल थानखुमाकरवी झेलबाद केले.ईस्ट झोनने वैभवकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे. अतिरिक्त जबाबदारीचा दबाव तो कसा हाताळतो, हे पाहण्यासाठी निवड समितीने हा निर्णय घेतला. वैभवने आतापर्यंत ९ प्रथम श्रेणी सामन्यांच्या १३ डावांमध्ये १७ च्या सरासरीने २१५ धावा केल्या आहेत.

### जयस्वालची विकेट अन् मैदानात वादाची ठिणगी

**कोलंबो :** भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच सत्रात मैदानावरील वातावरण चांगलेच तापले. भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालला बाद केल्यानंतर श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज असिथा फर्नांडोने आक्रमक पद्धतीने आनंद साजरा केला. त्यानंतर पॅव्हेलियनकडे परतणाऱ्या जयस्वाल आणि फर्नांडो यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. दोन्ही खेळाडू एकमेकांच्या अगदी जवळ आल्यानंतर श्रीलंकेच्या खेळाडूंनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.कोलंबोच्या एसएससी स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. गॉल येथे झालेल्या पहिल्या कसोटीत भारताने श्रीलंकेवर विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

## शुभमन गिलचा ऐतिहासिक पराक्रम




कर्णधार म्हणून खेळलेल्या ११ कसोटी सामन्यांतील १८ डावांत त्याने ७४.०६ च्या सरासरीने १,१११ धावा केल्या असून यात ६ शतके आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. कर्णधारपदाच्या अतिरिक्त जबाबदारीचा कोणताही दबाव न घेता गिलने मैदानात आपली उत्कृष्ट कामगिरी सातत्याने कायम ठेवली आहे.

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा युवा कर्णधार शुभमन गिलने श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी आपल्या नावावर दोन ऐतिहासिक विक्रमांची नोंद केली. सिंहलीज स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात गिलने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या एकाच चक्रात १००० किंवा त्याहून अधिक धावा फटकावणारा पहिला भारतीय कर्णधार ठरण्याचा बहुमान मिळवला.

यापूर्वी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता, ज्याने २०१९-२१ च्या चक्रात ९३२ धावा केल्या होत्या. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारख्या दिग्गज कर्णधारांनाही न जमलेला हा पराक्रम २६ वर्षीय गिलने करून दाखवला.

या विक्रमासोबतच गिलने कसोटी क्रिकेटमध्ये आपल्या ३,००० धावांचा टप्पाही पार केला. वयाच्या २६ वर्षे आणि ३४९ व्या दिवशी हा टप्पा गाठत तो कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद ३ हजार धावा करणारा चौथा सर्वात तरुण भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने भारताचे माजी कर्णधार कपिल देव (२६ वर्षे ३५६ दिवस) यांना मागे टाकले.या यादीत महान फलंदाज सचिन तेंडुलकर अव्वल स्थानी असून त्यांनी वयाच्या अवघ्या २३ वर्षे २२८ व्या दिवशी ही कामगिरी केली होती. त्यानंतर वीरेंद्र सेहवाग आणि दिलीप वेंगसरकर यांचा क्रमांक लागतो.सामन्याच्या पहिल्या सत्रात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात संमिश्र झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वालने ५३ चेंडूंत ९ चौकारांसह आक्रमक ४५ धावांचे योगदान दिले, तर केएल राहुल १८ धावा काढून माघारी परतला. दोन्ही सलामीवीर तंबूत परतल्यानंतर कर्णधार शुभमन गिल आणि देवदत्त पडिक्कल यांनी डाव सावरला. पहिल्या सत्राच्या समाप्तीपर्यंत भारताने २ बाद ८८ अशी सावध धावसंख्या उभारली. या सामन्यात फिरकीपटू कुलदीप यादव आजारपणामुळे खेळू शकला नाही, तर मध्य प्रदेशचा अष्टपैलू खेळाडू सारांश जैन याला कसोटी पदार्पणाची संधी मिळाली.नेतृत्वाची धुरा हाती आल्यानंतर गिलच्या फलंदाजीत आणखी चमक पाहायला मिळत आहे.

## भालाफेकीत रोहित यादवचा सुवर्णवेध; मुरली श्रीशंकरची 'लांब उडी'

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**



भारताच्या अॅथलेटिक्सपटूंनी वर्ल्ड अॅथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर सिल्व्हर लेव्हल स्पर्धेत दमदार कामगिरी करत अनेक पदकांवर नाव कोरले. भालाफेकपटू रोहित यादवने अखेरच्या प्रयत्नात ८७.६८ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदवत पुरुष भालाफेकीचे सुवर्णपदक पटकावले. तर स्टार लांब उडीपटू मुरली श्रीशंकरने ८.०७ मीटरची उडी घेत पुरुष लांब उडीचे विजेतेपद मिळवले.रोहित यादवने आपल्या अखेरच्या प्रयत्नात ८७.६८ मीटर भाला फेकत सुवर्णपदकावर नाव कोरले. या कामगिरीसोबतच त्याने स्वतःचाच वैयक्तिक सर्वोत्तम विक्रम नोंदवला. या विजयासाठी रोहितला १,६०० अमेरिकन डॉलरची पुरस्कार रक्कम मिळाली. यशवीरने ८२.९४ मीटरच्या फेकीसह रौप्यपदक, तर श्रीलंकेच्या सुमेधा रणसिंघेने ८०.२९ मीटरच्या कामगिरीसह कांस्यपदक पटकावले.रोहितसाठी हा पहिलाच मोठा आंतरराष्ट्रीय किताब ठरला. ग्लास्गो राष्ट्रकुल स्पर्धेतील निराशाजनक कामगिरीनंतर त्याने शानदार पुनरागमन केले. ग्लास्गो येथे ८१.५६ मीटरच्या कामगिरीसह तो सातव्या स्थानावर राहिला होता.राष्ट्रकुल स्पर्धेतील रौप्यपदक विजेता मुरली श्रीशंकरने ८.०७ मीटरची उडी घेत पुरुष लांब उडीचे सुवर्णपदक जिंकले. दक्षिण आफ्रिकेच्या दिवान मॅन्युएलने अखेरच्या प्रयत्नात ८.०३ मीटरची उडी घेत श्रीशंकरला कडवी टक्कर दिली. भारताच्या पी. डेव्हिडने ७.७८ मीटरच्या उडीसह कांस्यपदक मिळवले. श्रीशंकरची यंदाच्या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ८.३८ मीटर, तर वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८.४१ मीटर आहेमहिला लांब उडीमध्ये एन्सी सोजनने ६.७१ मीटरची उडी घेत सुवर्णपदक पटकावले. विशेष म्हणजे दोन महिन्यांपूर्वी याच मैदानावर तिने महान अॅथलीट अंजू बॉबी जॉर्जचा राष्ट्रीय विक्रम मोडला होता.

भारताच्या शैली सिंहने ६.५६ मीटरसह रौप्य, तर मुबसीना मोहम्मदने ६.३१ मीटरसह कांस्यपदक मिळवले. त्यामुळे महिला लांब उडीमध्ये भारताने क्लीन स्वीप केला.

# कांदे, टोमॅटो आणि तेलाच्या किमती वाढल्या

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

देशभरात सध्या महागाईचा भडका उडाला आहे. यासगळ्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या बजेटवर होणार आहे. जागतिक स्तरावरील राजकीय परिस्थिती आणि त्याचा झालेला इंधनावरील परिणाम पाहता मागील काही महिने सिलेंडरपासून पेट्रोल डिझेलच्या किमती कडाडल्या होत्या. त्यानंतर आता ही लाट सामान्यांच्या घरापर्यंत पोहोचली आहे. स्वयंपाक घरातील प्रत्येक गोष्ट महाग झाली आहे. गेल्या आठवड्यात अन्नधान्याच्या किमती वाढल्या आहेत. साखर, कांदे, टोमॅटो आणि तेल यांच्या किमतीही वाढल्या आहेत. त्यानंतर आता डाळींच्या दरातही मोठी वाढ



झाली असून, त्यात आणखी वाढ होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. महागाईचा विळखा कमी करण्यासाठी सरकार सतर्क झालं आहे. गेल्या आठवड्यात साखरेच्या दरात ७ रुपयांनी आणि गेल्या महिन्यात १७ रुपये प्रति किलोने वाढ झाली आहे, परिणामी साखर आता ७० रुपये प्रति किलो दराने विकली जात आहे. साखरेच्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. साखरेचा पुरवठा बाजारात वाढवा यासाठी सरकार विविध पद्धतींचा वापर करत आहे. यासाठी सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला मंजुरी दिली आहे. त्याचबरोबर बाजारातील साठेबाजी हा प्रकार रोखण्यासाठी मर्यादादेखील घालून दिली आहे. तिसरे आणि महत्त्वाची बाब म्हणजे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी साखर कारखान्यांना निर्देश दिले आहेत. १५ ऑक्टोबरपासून लवकर गाळप सुरू करण्यास देखील सांगितलं आहे.यासगळ्यात वाढते साखरेचे दर या सगळ्यास कारणीभूत इथेनॉल असल्याचं टिकाकारांचं मत आहे. पण सरकारने यासगळ्या परिस्थितीला स्पष्टपणे नकार दिला आहे. सरकारच्या मते, साखरेच्या दरातील वाढ ही साठेबाजी आणि साठेबाजीच्या भीतीमुळे झाली असल्याचं सांगण्यात आलं आहे.२१ ऑगस्ट रोजी कांद्यांचा भाव सरासरी ४०.७९ रुपये किलो इतका होता. एका आठवड्यापूर्वी हाच भाव ३६.५६ रुपयांवर आणि एका




महिन्यापूर्वी ३४.८७ रुपयांवर होता. याचा अर्थ कांद्याच्या दरात ₹४ ते ५ प्रति किलोने वाढ झाली आहे. काही ठिकाणी तर भावात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली असल्याचं आकडेवारीत दिसून येत आहे. या भाववाढीचे मुख्य कारण म्हणजे नवीन खरीप कांद्याच्या पिकामध्ये आलेला व्यत्यय असल्याचं सांगण्यात येत आहे. महाराष्ट्रातील नाशिकमध्ये मान्सूनला झालेला विलंब आणि खरीप कांद्याच्या पेरणीवरही झालेला परिणाम या सगळ्याचा परिणाम कांद्यांच्या दरावर होत आहे. भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार आपल्या बफर साठ्यातील कांद्याची विक्री करत आहे.गेल्या महिन्याभरात तूर, मूग, उडीद आणि हरभरा यांसारख्या डाळींच्या दरात देखील वाढ दिसून आली आहेत. तब्बल १ ते २ रुपयांनी वाढ सांगण्यात आली असली तरीही ती सणासुदीच्या काळात फार मोठी वाढ असल्याचं समोर येत आहे. या दरवाढीमागे देखील मान्सूनला कारणीभूत मानलं जात आहे.

### रक्षाबंधनासाठी राखी पाठविणे महागले

**नवी दिल्ली:** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर पोस्टाच्या माध्यमातून भाऊ-बहिणींना राखी, मिठाई किंवा भेटवस्तू पाठवणाऱ्यांच्या खिशाला आता अधिक कात्री लागणार आहे. भारतीय डाक विभागाने पार्सल आणि स्पीड पोस्टच्या दरांमध्ये वाढ केली असून, १ ऑगस्ट २०२६ पासून नवे दर लागू झाले आहेत.नव्या दरांनुसार ५०० ग्रॅमपर्यंतच्या पार्सलसाठी पूर्वी ४२ रुपये शुल्क आकारले जात होते. आता हे शुल्क गंतव्यस्थानानुसार ७७ ते ८४ रुपये झाले आहे. राज्यांतर्गत पार्सलसाठी ७७ रुपये, महानगरांसाठी ८२ रुपये, तर अन्य राज्यांमध्ये पाठवण्यासाठी ८४ रुपये शुल्क आकारले जाणार आहे. यावर जीएसटीही लागू होईल.स्पीड पोस्टच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. २० ग्रॅमपर्यंतच्या पार्सलसाठी पूर्वी ४२ रुपये शुल्क होते. आता त्यासाठी ५६ रुपये द्यावे लागतील. वजन आणि अंतर वाढल्यास शुल्कही वाढणार आहे.डाक विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक वर्षांनंतर पार्सल सेवांच्या दरांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. नव्या व्यवस्थेत शुल्क ठरवताना केवळ वजनच नव्हे, तर अंतर आणि गंतव्य क्षेत्राचाही विचार केला जाणार आहे. त्यामुळे समान वजनाच्या पार्सलसाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे शुल्क लागू होऊ शकते.रक्षाबंधनाच्या काळात राखीसोबत मिठाई, कपडे आणि भेटवस्तू पाठवण्याचे प्रमाण वाढते.

## नेस्ले, पेप्सिकोसह बड्या खाद्य कंपन्यांना एफएसएसएआयचा दणका; १५० हून अधिक नोटिसा

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

नेस्ले, पेप्सिको आणि कोका-कोलासह देशातील अनेक मोठ्या खाद्य व पेय कंपन्यांविरोधात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) कठोर कारवाई सुरू केली आहे. कथित दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, चुकीचे दावे आणि खाद्यपदार्थांच्या लेबलिंगसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गेल्या काही महिन्यांत १५० हून अधिक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील माहिती आणि जाहिरातींमधून केले जाणारे दावे नियामकाच्या




कडक निगराणीखाली आले आहेत.एफएसएसएआयने शनिवारी आपल्या कारवाईची माहिती जाहीर केली. ग्राहकांना खाद्यपदार्थांबाबत अचूक आणि नियमांनुसार माहिती मिळावी, तसेच कंपन्यांकडून कोणतेही दिशाभूल करणारे दावे केले जाऊ नयेत, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

एफएसएसएआयच्या कारवाईच्या कक्षेत नेस्ले इंडिया, पेप्सिको, अॅबॉट इंडिया, रेड बुल इंडिया, डॅनोन इंडिया, मॉन्स्टर एनर्जी इंडिया, हेल एनर्जी, मॉन्डेलेझ इंडिया, कोका-कोला इंडिया, डियाजिओ, पर्नोड रिकार्ड, फेरेरो इंडिया आणि केनव्ह्यू यांसह अनेक कंपन्यांचा समावेश आहे. जाहिरातींमधील दावे, उत्पादनांवरील माहिती आणि लेबलिंग नियमांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित कंपन्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.कारवाईदरम्यान काही कंपन्यांची उत्पादने जप्त करण्यात आल्याची माहितीही एफएसएसएआयने दिली आहे. काही प्रकरणांमध्ये संबंधित परवान्यांवरही कारवाई करण्यात आली आहे. मात्र, एखाद्या कंपनीला नोटीस बजावण्यात आली म्हणजे तिच्यावरील आरोप अंतिमतः सिद्ध झाले आहेत, असा त्याचा अर्थ होत नाही.

## आता सर्वसामान्यांना मिळणार वंदे भारतचा अनुभव

**नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था**

प्रवास म्हटला की प्रत्येकाला वेगवेगळे पर्याय आपलेसे वाटतात. पण जर जलद आणि बजेट फ्रेंडली पर्याय म्हणून जर पाहायचं असेल तर नेहमी रेल्वे प्रवासाकडे पाहिलं जातं. त्याच अत्यंत सोयीच्या पर्याय असलेल्या रेल्वे कडून सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आली आहे. बजेट प्रवासासाठी लोकप्रिय ठरलेल्या 'अमृत भारत' ट्रेनच्या ३.० मध्ये आता एसी कोचचाही समावेश केला जाणार आहे.अमृत भारत एक्सप्रेस ही आतापर्यंत एक नॉन-एसी लांब पल्ल्याची प्रवासी ट्रेन होती. ज्यामध्ये जनरल क्लास आणि स्लीपर क्लासचे डबे होते. सर्वसामान्यांसाठी असलेल्या इतर एक्सप्रेस गाड्यांच्या तुलनेत



अमृत भारत एक्सप्रेस सुपरफास्ट प्रवास करते आणि याचा प्रवास फार इतर एक्स्प्रेसच्या तुलनेत सुखद आणि आरामदायी आहे. पण या सगळ्यात आता एसीच्या सुखद प्रवासाची भर पडणार आहे. त्यामुळे बजेट फ्रेंडली एसी प्रवासाचा अनुभव सामान्यांनाही घेता येणार आहे.२०२३ मध्ये सुरू झालेल्या अमृत भारत ट्रेनपैकी ६० पेक्षा जास्त ट्रेन या भारतीय रेल्वेच्या नेटवर्कवर धावत आहेत. स्लीपर क्लासचा दर प्रति १००० किलोमीटर अंदाजे मध्ये अंदाजे ₹५०० इतका आहे. प्रवास परवडणारा असावा हा यामागील उद्देश आहे. या ट्रेनला बराच प्रतिसाद मिळत असलेला दिसून येतो. भारतीय रेल्वेच्या आकडेवारीनुसार, अमृत भारत ट्रेनच्या स्लीपर क्लासमधील सरासरी प्रवासी संख्या जवळजवळ १००% पेक्षा जास्त आहे.अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना दोन्ही टोकांना लोकोमोटिव्ह इंजिन असतात. त्यामुळे गती आणि वेगाचा संगम नियंत्रित करण्यास मदत होते.

अजिंक्य भारत
आपलं जालना
जालना, सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### बुधवारी शहरात जुलूस निघणार

**जालना :** ईदएमिलाद निमित्त बुधवारी सकाळी ९ वाजता नवीन जालना भागातील मंगळबाजार येथुन जुलुस मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही मिरवणूक मंगळ बाजार, चौक मस्जिद, काद्राबाद, सराफा, फुल बाजार, मोती मस्जिद मार्गे सिंधी बाजार, सावरकर चौक, मामा चौक, महावीर चौक, मुथा बिल्डिंग, तसेच जुना जालना भागातील मंमादेवी मंदिर, मस्तगड, गांधी चमन, टाऊन हॉल, दिपक हॉस्पिटल, इमाम अहेमद रजा चौक जुना जालना पर्यंत राहणार आहे.

### बोगस बियाणे विक्रीप्रकरणी आंदोलन

**जालना :** बोगस बियाणे, खत व औषधांची विक्री करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी छावा महाराष्ट्र सेना व शेतकऱ्यांच्यावतीने मंगळवारी जालना-राजूर रोडवरील बावणे पांगरी येथे रास्ता रोको व चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता बावणे पांगरी स्टॉप येथे हे आंदोलन होणार आहे. बोगस बियाणे, खत व औषधांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

### जालन्यात औद्योगिक परिषदेचे आयोजन

**जालना :** जिल्ह्याच्या औद्योगिक, वाहतूक व निर्यात क्षमतेला नवी दिशा देण्यासाठी 'जालना फर्स्ट' आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक ३ सप्टेंबर २०२६ रोजी औद्योगिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद हॉटेल सिद्धार्थ द फर्न येथे सकाळी ९ ते २.३० वाजेच्या दरम्यान होणार आहे. ड्रायपोर्ट, नवीन गुंतवणूक, निर्यात-आयात वाढ आणि रोजगार निर्मितीवर परिषदेत विशेष भर देण्यात येणार असल्याचे जालना फर्स्टचे अध्यक्ष गोविंद गोयल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## निधन

### मुख्याध्यापक गणेश देशमाने यांचे निधन



**मंठा :** मंठा शहरातील रहिवासी तथा रायपूर,ता. सेलू येथील जिल्हा परिषद शाळेचे कार्यरत मुख्याध्यापक गणेश कामाजी देशमाने (वय ५१) यांचे आज रविवार रोजी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मंठ्याच्या सामाजिक व शिक्षक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात माता-पिता, पत्नी, दोन मुली, जावई आणि मुलगा असा परिवार आहे. अंत्यसंस्काराचा विधी मंठा येथे करण्यात आला. यावेळी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, पत्रकारिता, साहित्य, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विपश्यना केंद्र, बुद्धमूर्ती उभारणीतील प्रशासकीय अडथळा दूर

**कैलास गोरंट्याल यांची माहिती**

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ : येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरातील मोती तलावामध्ये भगवान गौतम बुध्दांची भव्य मूर्ती तसेच या तलावाशेजारी असलेल्या जमीनीवर भव्य विपश्यना केंद्र उभारण्यासाठी लागणारे जिल्हाधिकाऱ्यांचे नाहरकत प्रमाणपत्र मिळाले आहे, आता या दोन्ही महत्वाच्या बाबींमधील महत्त्वाचा खोडा दूर झाला आहे. यासंदर्भात माजी आ.कैलास गोरंट्याल यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.**



अजिंक्य भारत

मोतीबाग तलावातील बुद्धस्मारकाला 'खोडा'

लोकप्रतिनिधींच्या दुटप्पी धोरणामुळे १९ वर्षांपासून प्रकल्प धूळ खात!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

सुशीलकुमार वाठोरे

प्रकल्पाची शोकांतिका: १९ वर्षांचा घटनाक्रम

२००८: नगरपालिकेत सर्वानुमते बुद्धस्मारकाचा ठराव मंजूर.

सुजाण जनता देणार चोख उत्तर

तुकाराम मुंढे आणि स्मारक समिती ट्रस्ट

गोरंट्याल म्हणाले की, मोतीबाग तलावात भीम पार्क उभारण्यास आपला विरोध असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यावेळी देखील आपण आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होती. मोतीबाग तलावाची जागा जरी मनपाची असली तरी सातबारा हा महाराष्ट्र शासनाच्या नावावर आहे. त्यामुळे मनपाला भीम पार्कबाबत नियमानुसार ठराव घेता येत नव्हता. त्यासाठी एक तर राज्य सरकारने मंजुरी द्यावी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) द्यावे, जेणेकरून भीम पार्कबाबत जालना मनपाला ठराव घेता येईल. असे आपण पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेऊन आपण या विषयाच्या अनुषंगाने त्यांच्याशी विस्तृत चर्चा करून नाहरकत प्रमाणपत्र देण्याची मागणी करत तसा प्रस्ताव मनपामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला होता. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी मोतीबाग तलावात प्रस्तावित असलेल्या भीम पार्कच्या उभारणीबाबत जालना मनपाला नुकतेच नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिल्याचेही गोरंट्याल यांनी यावेळी सांगितले. सर्व्हे क्रमांक ५०६ मधील ८१.२७ हेक्टर जमिन दि. ३१ ऑक्टोंबर १९९० मध्ये तत्कालीन नगर परिषदेच्या ताब्यात देण्यात आली असल्याचे जालना मनपाने जिल्हाधिकाऱ्याऱ्यांना लेखी पत्राद्वारे कळविले असून सातबारा उताऱ्यावर मालकी हक्कामध्ये जालना शहर महानगर पालिकेच्या नावाने नोंद होईपर्यंत सदर जागेबर विपश्यना केंद्र (भीम पार्क) व तलावामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती उभारण्यासाठी तसेच प्रस्तावित असलेली अनुषंगिक विकास कामे करण्यास नाहरकत प्रदान करण्याची विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी सर्व्हे क्रमांक ५०६ मधील ८१.२७ हेक्टर आर जमिनी बाबत जालना शहर महानगर पालिकेच्या नावाची नोंद घेण्याची कारवाई प्रस्तावित असल्याचे स्पष्ट करत सदर जमिनीवर जालना मनपाला त्यांच्या प्रकल्पासाठी अधिकृत वापराकरीता उपयोग करण्यास हरकत नसल्याचे जिल्हाधिकारी जालना यांनी पत्राद्वारे कळविले असल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्याशीही आपली या विषयासंदर्भात चर्चा झाली असून महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत,भाजपा महानगर अध्यक्ष भास्कर दानबे, आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह आपण लवकरच सामाजिक न्याय मंत्र्याची भेट घेणार असून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी भीम पार्क बाबत नाहरकत दिल्यामुळे कामाचा मार्ग मोकळा झाला असून या कामासाठी एजन्सी जालना मनपा असावी अशी प्रमुख अट जालना मनपाची राहणार आहे. कारण अन्य एजन्सी काम करून निघून जातात आणि पुढील देखभाल व दुरुस्तीचा खर्च मनपाला सोसावा लागतो ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन एजन्सी जालना मनपाचं असावी अशी अट राहणार असल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस नगरसेवक महावीर ढक्का, आलमखान पठाण, रमेश गौरक्षक, संजय भगत, विनोद यादव, सय्यद अझहर, संजय पाखरे, चेतन खंडेलवाल आदींची उपस्थिती होती.

### भर पावसाळ्यात पाणीटंचाई कायम

**जालना, दि. २३ :** जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्यामुळे भरपावसाळ्यात पाणीटंचाई कायम आहे. जिल्ह्यातील १६ गावांसह १३ वाड्यांमधील तब्बल ५७ हजार ७३८ नागरिकांना २८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, जिल्ह्यात केवळ १२ टक्के पाणीसाठा आहे. जालना, बदनापूर, अंबड, घनसावंगी तालुक्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. बदनापूर तालुक्यात पाणीटंचाईची तीव्रता सर्वाधिक असून १२ गाव, ९ वाड्यांमधील ३९ हजार २७५ नागरिक २० टँकरवर अवलंबून आहेत. जालना तालुक्यात दोन गावांमधील ८ हजार ५८८ नागरिकांसाठी चार टँकरद्वारे तर अंबड तालुक्यात एका गावातील ७ हजार २०० नागरिकांना दोन टँकरद्वारे पुरवठा होत आहे. घनसावंगी तालुक्यात १ गाव, ५ वाड्यांमधील २ हजार ६७५ नागरिकांना दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

# स्पर्धा परीक्षा यशासाठी नियोजनबद्ध तयारी आवश्यक

**बारवाले महाविद्यालयात चर्चासत्र**

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**जालना, दि. २३ :** विद्यार्थ्यांना शासकीय क्षेत्रातील रोजगाराच्या संधींची माहिती मिळावी आणि परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कौशल्य विकास समिती आणि गणित विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र पार पडले.

या चर्चासत्रासाठी उत्तम गोरे व सिद्धार्थ कोंघे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम आणि यशस्वी अभ्यासपद्धती यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, नियोजनबद्ध तयारीची गरज: आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात केवळ पदवी शिक्षणावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू करावी. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग , रेल्वे, बँकिंग, विमा क्षेत्र तसेच राज्य शासनाच्या सरळसेवा भरती प्रक्रियांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी त्यांनी सामान्य अध्ययन, चालू घडामोडी, गणित, बुद्धिमत्ता चाचणी, मराठी व इंग्रजी या विषयांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अनेक परीक्षांच्या अभ्यासक्रमात साम्य असल्याने स्वतंत्र अभ्यासाऐवजी समान विषयांची एकत्रित व प्रभावी तयारी करण्याचा सल्ला देण्यात आला. वेळेचे अचूक व्यवस्थापन, मूलभूत संकल्पनांची स्पष्टता, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, नियमित सराव, अचूकता आणि चालू घडामोडींचे सातत्यपूर्ण वाचन यावर विशेष भर देण्यात आला. या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी पात्रता, वयोमर्यादा, टप्पे, संदर्भ साहित्य, ऑनलाइन साधने आणि मुलाखतीची तयारी याविषयी विचारलेल्या विविध शंकांचे मार्गदर्शकांनी समाधानकारक निरसन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रो.डॉ.भूषण नाफडे यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास समितीचे प्रा.संदीप पाटील, डॉ.निलेश बर्डे, प्रा.रवींद्र शिंपी, डॉ.रामेश्वर मस्के, डॉ.रवींद्र भोरे तसेच गणित विभागाचे प्रा.अक्षय चेडे, सुंदर वायाळ, काशिनाथ खलसे व सुरेश खरात यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे चर्चासत्र अत्यंत फलदायी ठरले.

# जालन्यात तीन दिवसीय मान्सून शो कला महोत्सवाचे आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ :** जालन्यातील नागरिक, विद्यार्थी कलाप्रेमींना सप्टेंबरमध्ये तीन दिवस विविध कलांचा अनुभव घेण्यासाठी जालन्यात राज्यस्तरीय मान्सून शो-२०२६ कला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवात केवळ चित्रांचे प्रदर्शन न करता कलाकारांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, विविध कलाविषयक कार्यशाळा, इकोफ्रेंडली गणपती निर्मिती, कला शिक्षकांसाठी मार्गदर्शन असे विविध उपक्रम होणार आहेत. त्यामुळे हा महोत्सव पाहण्यापुरता मर्यादित न राहता कला शिकण्याची, अनुभवण्याची आणि स्वतःची कला सादर करण्याची संधी या ठिकाणी दाखवता येणार आहे ११ ते १३ सप्टेंबर या कालावधीत हा महोत्सव पार पडणार आहे. कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र जालना, अजिंठा चित्रकला महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव होत आहे. राज्यस्तरीय उपक्रमाचे उद्घाटन १९ सप्टेंबर रोजी होणार आहे. अध्यक्षस्थानी अध्यक्ष राजेश टोपे राहणार आहेत. उद्घाटनाला संचालक डॉ.किशोर इंगळे, विनोद दांडगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जालन्यातील नागरिकांना एकाच ठिकाणी विविध कला प्रकार पाहण्याबरोबरच कला शिकणे, कलाकारांशी संवाद साधणे, स्पर्धेत सहभागी होणे आणि प्रत्यक्ष कलानिर्मितीचा अनुभव घेणे शक्य होणार आहे. चित्रकला, शिल्पकला, हस्तकला, मांडणी शिल्प अशा विविध कलाप्रकारांचा समावेश प्रदर्शनात असेल. कलाकारांशी थेट संवाद साधता येणार असल्याने एखादी कलाकृती तयार करण्यामागची संकल्पना आणि प्रक्रिया समजून घेण्याची संधीही नागरिकांना मिळणार आहे. राज्यातील कलाकार, शाळा, कला महाविद्यालये, विद्यार्थी, कला शिक्षक, कलाप्रेमी, नागरिकांनी या तीनदिवसीय राज्यस्तरीय कला महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशांत महाजन, शाह एजास, सचिव प्रा.रावसाहेब ढवळे, प्रा.रणजित बायस यांनी केले आहे.

# वर्धापनदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जाफराबाद, दि. २३ :** सिद्धार्थ कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब म्हस्के होते तर प्रमुख वक्ते प्रोफेसर डॉ.के.एस.पाटील हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्रोफेसर डॉ.एस.एल.मेढे व प्रा. डॉ.श्याम सर्जे,उपप्राचार्य हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एस.एम.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.संतोष पहारे यांनी केले तर आभार प्रा.उदय वझरकर यांनी मानले.

# 'संजीवनी' मध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ :** येथील संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये थायरॉईड नोड्यूल, गर्भाशयातील गाठी आणि व्हेरिकोज व्हेन्स याबाबत जनजागृती व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन डॉ.बळीराम बागल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ.शिवदास मिरकड यांच्यासह हॉस्पिटलमधील डॉक्टर, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फित कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरामध्ये इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ.प्रणव बंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आजारांची तपासणी व तज्ज्ञांचा सल्ला देण्यात आला. थायरॉईड नोड्यूलसाठी आधुनिक



उपचार पद्धती, गर्भाशयातील गाठींसाठी आधुनिक व कमी त्रासदायक उपचार तसेच व्हेरिकोज व्हेन्ससंबंधी तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. थायरॉईड नोड्यूल, गर्भाशयातील गाठी किंवा पायांच्या शिरा फुगणे, पायात वेदना, जडपणा, सूज, खाज किंवा त्वचेचा रंग बदलणे अशा तक्रारी असलेल्या नागरिकांनी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य वेळी उपचार करावेत, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाच्यावतीने करण्यात आले. संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना यांच्यावतीने आयोजित या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# रेल्वे तिकीट तपासणी मोहीमेत सव्वा चार लाखांचा महसूल वसूल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ :** प्रवाशांनी वैध तिकीटासह प्रवास करावा, रेल्वेच्या नियमांचे पालन करावे आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित व सुव्यवस्थित प्रवासाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात २१ ऑगस्ट २०२६ रोजी व्यापक सघन तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

सर्व तिकीट तपासणी पथकांच्या सक्रिय सहभागाने ही मोहीम सकाळी ४:३० ते रात्री ८ वाजेपर्यंत राबविण्यात आली. मोहिमेचे प्रभावी निरीक्षण शैलेश कुमार सिंह, सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड यांनी केले. या विशेष मोहिमेत ३२ तिकीट तपासणी कर्मचारी आणि ३ RPF जवान सहभागी झाले. विभागातील विविध मार्गांवरील २६ गाड्यांची तपासणी करण्यात आली. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी संवाद साधत वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे तसेच रेल्वेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. तिकीट तपासणीतील उल्लेखनीय कामगिरी मोहिमेदरम्यान तिकीटविना किंवा अनियमित प्रवास तसेच अनबुक्ड लगेजशी संबंधित एकूण ५४३ प्रकरणे आढळून आली. या प्रकरणांतून एकूण ४,२२,६१० रुपये इतका महसूल वसूल करण्यात आला. याशिवाय रेल्वे परिसरात धूम्रपान केल्याचे १ प्रकरण नोंदविण्यात आले असून संबंधित व्यक्तीकडून २ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. त्यामुळे संपूर्ण मोहिमेत एकूण ५४४ प्रकरणे नोंदविण्यात आली असून ४,२४,६१० रुपये इतका एकूण महसूल वसूल करण्यात आला. नांदेड विभागाकडून तिकीट तपासणी मोहिमा केवळ महसूल वसुलीपुरत्या मर्यादित न ठेवता प्रवाशांमध्ये नियम पालनाची जाणीव निर्माण करणे आणि वैध तिकीट घेऊन प्रवास करण्यास प्रोत्साहन देणे यावर विशेष भर दिला जात आहे. तिकीटविना प्रवासामुळे प्रामाणिकपणे तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर अन्याय होतो. त्यामुळे अशा मोहिमांमुळे वैध तिकीटधारक प्रवाशांच्या हक्कांचे संरक्षण, रेल्वे महसुलाचे संरक्षण आणि रेल्वे प्रवासातील शिस्त वाढण्यास मदत होते. नांदेड विभागातील तिकीट तपासणी पथके नियमित तपासणीबरोबरच विशेष मोहिमा राबवून तिकीटविना प्रवास, अनियमित प्रवास, अनबुक्ड लगेज तसेच रेल्वे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बाबींवर प्रभावी कारवाई करीत आहेत.

# काँग्रेस फक्त निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी देणार - खा.डॉ.कल्याण काळे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ : मंठा, परतूर, घनसावंगी तालुक्यात काँग्रेसच्या संघटनात्मक आढावा बैठका पार पडल्या. खासदार डॉ.कल्याण काळे यांनी मार्गदर्शन करताना काँग्रेस पक्षाने या पूर्वी अनेकदा मित्र पक्षांना संधी दिली. येणाऱ्या काळात काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत व सर्वसामान्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन काम करण्याची संधी देणार आहे.**



त्यासाठी पक्ष संघटनेत काम करून जनतेपर्यंत जाऊन काँग्रेस पक्षाची विचारधारा समजावून सांगण्याचे व विकासासाठी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी राहून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळवून देण्यासाठी सज्ज राहावे. असे आवाहन केले. कार्यकर्ते व जनतेच्या सेवेसाठी मी २४ तास उपलब्ध असेल अशी ग्वाही खासदार कल्याण काळे यांनी याप्रसंगी दिली. यावेळी मार्गदर्शन करताना जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण दळे म्हणाले की, जालना जिल्हा काँग्रेसच्या सर्व विभागांच्या पदाधिकाऱ्यांच्या लवकरच नियुक्त्या करण्यात येणार असून यामध्ये उपेक्षित कार्यकर्त्यांना मोठी संधी देणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की भारतीय जनता पक्षाने शेतकरी विद्यार्थी बेरोजगार महिलांना खोटे आश्वासन देऊन भ्रमनिरास केला आहे. विकासाच्या नावावर फक्त भ्रष्टाचार करण्याचे काम केले आहे. राम मंदिरातील आपल्याच हस्तकांमार्फत त्यांनी भक्तांना लुबाडण्याचे काम केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंठा व घनसावंगी तालुका काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन खा.डॉ.कल्याण काळे व जिल्हाध्यक्ष कल्याण दळे यांच्या हस्ते करण्यात आले. या दौऱ्याच्या वेळी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, विधानसभा प्रमुख प्रभाकर पवार, अल्पसंख्यांक विभागाचे बदर चाऊस, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कोळकर, अविनाश चव्हाण, अशोक उबाळे, कांतीलाल बनसोडे, राजाभाऊ कुलकर्णी, गणेश बोराडे, योगिता धांडगे, निरीक्षक गणेश राऊत सहभागी होते. यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत तालुका अध्यक्ष विवेक घारे, बालासाहेब आकात, श्रीरंग कामठे, शहर अध्यक्ष अँड.एकनाथ देवडे, रामप्रसाद जाधव, माजी अध्यक्ष पंजाबराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस अँड.प्रदीप लेकुरवाळे, शरद चव्हाण, रामप्रसाद खरात, निळकंठ वायाळ, शरद बोराडे, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र सातपुते शाहिद शेख, अलीभाई शेख राजेंद्र आरेकर, केरुबा उंबरे, तुकाराम गायकवाड, रामेश्वर येवले आदींची उपस्थिती होती.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपावर जाण्याचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**जालना, दि. २३ :** वरिष्ठ वेतनश्रेणीपासून वंचित असलेल्या दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्या मागणीसाठी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या शनिवारी झालेल्या बैठकीत सदरील निर्णय घेण्यात आला आहे.

उच्च न्यायालय मुंबई व महाराष्ट्र शासन यानी उच्च न्यायालयातील कर्मचारी बाधवांना वरीष्ठ वेतन श्रेणी लागू केली असून २०११ पासून फरकासह रक्कम अदा केलेली आहे. या वेतन श्रेणीपासून राज्यातील दुयम न्यायालयात काम करणाऱ्या राज्यातील ३४ हजार कर्मचाऱ्यांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. त्याकरिता एकाच न्यायव्यवस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बेतनामध्ये आलेली तफावत दूर व्हावी. या करिता "समान काम समान वेतन" हा नारा देत न्यायालयीन कर्मचारी संघटनेने आंदोलनाची दिशा निश्चित केली आहे. आपल्या मागणीसाठी राज्यभरातील सर्व न्यायालयीन कर्मचारी ६ सप्टेंबर सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम करतील, १६-१७ ऑक्टोबर दरम्यान पुन्हा दोन दिवस काळया फिती लावून निषेध नोंदवला जाणार आहे. ५ नोव्हेंबर रोजी सर्व संवर्गातील कर्मचारी 'सामूहिक रजा' आदोलनात सहभागी होतील. मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचारी १७ नोव्हेंबर पासून 'बेमुदत संप' पुकारणार आहेत. संपात कनिष्ठ लिपीक, वरिष्ठ लिपीक, सहायक अधिक्षक, अधिक्षक, प्रबंधक, स्टेनोग्राफर, मुख्य बेलिफ, बेलिफ, वाहनचालक, पुस्तक बांधणीकार, शिपाई, सफाईगार सहभागी होणार आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com

## हरविलेला मोबाईल शोधून प्रवाशाच्या स्वाधीन

**अकोला :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसोबतच त्यांच्या मौल्यवान वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी रेल्वे पोलीस सदैव तत्पर असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. रेल्वे प्रवासादरम्यान हरविलेला मोबाईल फोन रेल्वे पोलिसांच्या तत्परतेमुळे शोधून काढून संबंधित प्रवाशाच्या स्वाधीन करण्यात आला.अकोला येथील प्लॉट क्रमांक २, शंकर कॉम्प्लेक्स, रामदास पेठ येथील रहिवासी सिमरजीत सिंग तरणसिंग सहानी (वय ३२) हे महाराष्ट्र एक्स्प्रेसने प्रवास करीत होते. प्रवासादरम्यान शेगाव रेल्वे स्थानकाच्या हद्दीत त्यांचा व्हिवो वाय-३५ कंपनीचा मोबाईल फोन कुठेतरी पडून हरवला.मोबाईल हरवल्याची माहिती मिळताच रेल्वे पोलीस ठाणे शेगाव येथील पोलीस शिपाई क्रमांक ३०५ ऋषिकेश जवळकर यांनी तत्परतेने मोबाईलचा शोध सुरू केला. अथक प्रयत्नांनंतर त्यांनी हरविलेला मोबाईल शोधून काढण्यात यश मिळविले. त्यानंतर आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मोबाईलची पावती घेण्यात आली आणि तो संबंधित प्रवासी सिमरजीत सिंग सहानी यांच्या स्वाधीन करण्यात आला.

## अनंतायन

### रणांगण



ॲड. अनंत खेळकर

वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, पुढाऱ्यांचे सत्ता अन् संपत्तीसाठी चाललेले कुटील राजकारण, विविध समस्यांवर न केल्या जाणारे उपाय अशा कितीतरी गोष्टींनी मतदार वैतागले. माध्यमे विकल्या गेली, तत्त्व, निष्ठा, नीतिमूल्ये रसातळाला गेलेली. अशा पार्श्वभूमीवर एका स्वातंत्र्य लढ्यात सर्वस्व गमावलेल्या एका थोर स्वातंत्र्य संग्राम सेनानीला मुलाखतकर्त्याने प्रश्न केला, ''तुम्हाला हे सर्व बघून काय वाटते?''

त्यावर ते म्हणाले, ''नेत्यांनी केलेल्या चुकांचे स्पष्टीकरण ते कितीही सफाईदारपणे करत असले तरी ते चुकलेच नाही, असं कधीही समजू नये. आता तर असं वाटतंय, माय माऊलींची अब्रू, बळीराजाचं आयुष्य अन् सैनिकांचा जीव या गोष्टी सोडून बाकी सर्व महाग झालंय. स्वातंत्र्य जेव्हा स्वैराचारात परिवर्तित होते, तेव्हा संस्काराला मूठमाती दिली जाते. देशवासियांना माझी हीच प्रार्थना आहे, परिवर्तनाला घाबरू नका. जर काही चांगलं गमावलं असेल; पण तुम्ही निश्चय केला तर त्यापेक्षाही चांगलं मिळवण्याची तुमच्यात धमक असेल, तर हे जिवंतपणाचे लक्षण आहे. कारण, क्रांती स्मशानातून नव्हे, तर मनाच्या रणांगणातून होते. नाही तर ही अश्वत्थामाच्या कपाळावरील जखम अशीच राहणार, जसे अश्वत्थामाला मरण जवळ करत नाही अन् जखमही भरत नाही. आपल्या देशातील नागरिकांनी वारंवार हे सिद्ध करून दाखवलंय. ठान लेते है दिल में, तो कुछ भी करने का अरमान रखते है ।
लोग तो रखते है, पैरों तले जमीं, ये आसमान रखते है।

# २२ दिवसांच्या खंडामुळे ४.२३ लाख हेक्टरवरील पिके धोक्यात

## काटेपूर्णा धरणात केवळ २५ टक्के पाणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** अकोला जिल्ह्यात गेल्या २२ दिवसांपासून पावसाने हुलकावणी दिल्याने खरीप हंगाम मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाच्या मोठ्या खंडामुळे कापूस आणि सोयाबीन या प्रमुख पिकांसह तब्बल ४ लाख २३ हजार हेक्टरवरील पिके करपू लागली आहेत. जिल्ह्यातील १ लाख ५७ हजार ८४६ हेक्टरवरील कपाशीची वाढ पावसाअभावी खुंटली आहे, तर २ लाख ७३३ हेक्टरवरील सोयाबीन सध्या फुलोऱ्यावर असतानाच पाऊस गायब झाल्याने उत्पादनात प्रचंड घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील शेतकरी तुषार आणि ठिबक सिंचनाच्या माध्यमातून उपलब्ध पाण्यावर पिके वाचवण्यासाठी धडपड करत आहेत.

हवामान विभागाच्या माहितीनुसार जिल्ह्यात २१ ऑगस्टपर्यंत ५१३ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात ३६५.४ मिमी पाऊस झाला असून पावसाची तब्बल २७ टक्के तूट नोंदवली गेली आहे. तालुकानिहाय विचार केल्यास तेल्हारा येथे ४६७.५ मिमी, आकोट ४३०.८ मिमी, मूर्तिजापूर ३९३.४ मिमी, पातूर ३८८.१ मिमी, बार्शिटाकळी ३४४.१ मिमी, बाळापूर ३०१.९ मिमी आणि अकोला तालुक्यात सर्वात कमी २९३.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. ३० आणि ३१ जुलैच्या मुसळधार पावसानंतर एल निनोच्या प्रभावामुळे ऑगस्ट महिन्यात पावसाने स्टॉप दिला आहे.

### एकूण स्थिती

अपेक्षित पाऊस (२१ ऑगस्टपर्यंत): ५१३ मिमी
प्रत्यक्षात झालेला पाऊस: ३६५.४ मिमी
पावसाची एकूण तूट: २७%

या दुष्काळी परिस्थितीचा फटका केवळ पिकांनाच नाही तर पिण्याच्या पाण्यालाही बसत असून, अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य काटेपूर्णा धरणात केवळ २५.१४ टक्के पाणी उरले आहे, जे गेल्या वर्षी याच काळात ८८ टक्के होते. उमा प्रकल्पात तर अवघा ५.१० टक्के साठा उरला असून निर्गुणा प्रकल्पात ५१.९६ टक्के, मोर्णा ६४.१० टक्के आणि एकविरा प्रकल्पात ८२.२९ टक्के साठा आहे. पावसाअभावी खरीप, रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून आता सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

### पाणीसाठ्याची टक्केवारी

काटेपूर्णा धरण : २५.१४%
उमा प्रकल्प : ५.१०%
निर्गुणा प्रकल्प : ५१.९६%
मोर्णा प्रकल्प : ६४.१०%
एकविरा प्रकल्प : ८२.२९%

# खरबडीजवळ कमळगंगा पुलावर अपघात; नागपूर येथील दाम्पत्याचा मृत्यू, चालक जखमी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २३ :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील खरबडी गावाजवळील कमळगंगा नदीच्या पुलावर भरधाव इनोव्हा कार दुभाजकाला धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात नागपूर येथील पती-पत्नीचा मृत्यू झाला, तर कारचालक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात रविवार, २३ ऑगस्ट रोजी पहाटे पावणेचार वाजेच्या सुमारास घडला. यशवंत उत्तमलाल जयस्वाल (वय ५७) व संगीता यशवंत जयस्वाल (वय ५४, दोघे रा. नागपूर) अशी मृतांची नावे आहेत, तर निखिल विनोद डहाणे (वय २५, रा. नागपूर) हा चालक गंभीर जखमी झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, इनोव्हा कार (क्र. ४९ ०६७५) अमरावतीवरून मूर्तिजापूरच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार कमळगंगा पुलावरील दुभाजकाला (डिव्हायडर) जाऊन जोरदार धडकली.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस व ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने शासकीय वाहनाने घटनास्थळी दाखल झाले. १०३३ रुग्णवाहिकेद्वारे तिघांनाही तातडीने मूर्तिजापूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे तपासणीदरम्यान डॉक्टरांनी यशवंत जयस्वाल यांना मृत घोषित केले, तर उपचारादरम्यान संगीता जयस्वाल यांचाही मृत्यू झाला. गंभीर जखमी चालक निखिल डहाणे याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अकोला शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. याप्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची (मर्ग) नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस कर्मचारी राजेश डोंगरे करीत आहेत.

## सिरसो फाट्याजवळ बैलबंडीला दुचाकीची धडक; एकाचा मृत्यू

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील सिरसो फाट्यावरून दर्यापूरकडे जाणाऱ्या मार्गावर बैलबंडी आणि दुचाकीदरम्यान झालेल्या अपघातात एका २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवार, २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास घडली.संदीप विलास वीर (वय २६, रा. कारंजा, जि. वाशीम) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संदीप वीर हे आपल्या दुचाकीने (क्र. २९ २९५६) सिरसो फाट्याकडून दर्यापूरच्या दिशेने जात होते. दरम्यान, रस्त्याने पुढे जात असलेल्या राजेंद्र काळे यांच्या बैलबंडीला दुचाकीची पाठीमागून धडक बसली. या धडकेत संदीप वीर हे गंभीर जखमी झाले व त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी सिरसो येथील रहिवासी सुरेश ज्ञानेश्वर मेहरे यांनी दिलेल्या माहितीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची (मर्ग) नोंद करण्यात आली आहे.

## रील्स स्पर्धेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**अकोला :** माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २१ ऑगस्ट रोजी राज्यभर 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉनवॉक फॉर वॉटर' आणि 'मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धे'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या प्रतिसादाची दखल घेत मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेसाठी रील्स अपलोड करण्याची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# २२ पैकी ८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे मदतीसाठी पात्र; पीडित कुटुंबांना मिळणारा १ लाखाचा आधार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** जिल्ह्यात सततचे घटते उत्पन्न, सावकार व बँकांचे थकीत कर्ज, शेतीचा वाढता खर्च आणि पिकांचे होणारे नुकसान यांमुळे शेतकरी तीव्र आर्थिक अडचणीत सापडले असून, या विवंचनेतून घडणाऱ्या आत्महत्यांनंतर पीडित कुटुंबांवर मोठे संकट ओढवले आहे. अशा आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. यासाठी जिल्हास्तरीय समितीमार्फत प्रकरणांची चौकशी करून पात्रता निश्चित करण्यासाठी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत समितीसमोर सादर करण्यात आलेल्या एकूण २२ प्रकरणांवर बारकाईने विचार करण्यात आला.

शासकीय निकषांची छाननी केल्यानंतर समितीने ८ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरवली असून, निकष पूर्ण न करणारी १४ प्रकरणे अपात्र घोषित केली आहेत. पात्र ठरलेल्या प्रकरणांमध्ये मूर्तिजापूर तालुक्यातील सैदापूर येथील दिवंगत होमेश ललित काळे (वय २६), अकोट तालुक्यातील वडाळी देशमुख येथील मयत पंजाब जानराव बोरोडे (वय ५३) व उमरा येथील दिवंगत मनीष केशव थुटे (वय ३५), बार्शीटाकळी तालुक्यातील लोहगड येथील मयत संगीता राजेंद्र पखाण (वय ५३), अकोला तालुक्यातील निंभोरा येथील दिवंगत वैष्णवी गणेश श्रीनाथ (वय २०) तसेच तेल्हारा तालुक्यातील खंडाळा येथील दिवंगत रवींद्र रामदास संगनवेडे (वय ४४) आणि बलाढ्यपूर येथील दिवंगत महादेव मोतीराम उन्हाळे (वय ४८) यांचा समावेश आहे. जिल्हास्तरीय समितीच्या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या या निर्णयामुळे अखेर ८ बाधित कुटुंबांना शासकीय आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, या संकटकाळात पीडित कुटुंबांना काहीसा आधार मिळण्यास मदत होणार आहे.

## महामार्गांवर बेकायदेशीर पार्किंगचा विळखा

**अकोला:** शहरातून जाणाऱ्या अकोला-नांदेड आणि अकोला-मुंबई या दोन्ही प्रमुख राष्ट्रीय महामार्गांचे चौपदरीकरण होऊनही रस्ते मोकळे होण्याऐवजी अपघातांचे केंद्र बनत असल्याचे चित्र आज पुन्हा एकदा स्पष्ट दिसत आहे. महामार्गावर धुळखात पडलेली नादुरुस्त वाहने आणि बेकायदेशीरपणे उभी केली जाणारी जड वाहने यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून, आरटीओ आणि वाहतूक नियंत्रण विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचा जीव धोक्यात सापडला आहे.

वाशिम बायपास चौकापासून सुमारे अर्धा ते एक किलोमीटरच्या परिसरात महामार्गाच्या दोन्ही बाजूने जड वाहने अनधिकृतपणे उभी केली जात आहेत. अशीच परिस्थिती बाळापूर मार्गावरही पाहायला मिळत आहे. या महामार्गांवर असलेल्या गॅरेजचालकांकडून रस्त्यावरच वाहने दुरुस्तीसाठी उभी केली जातात, ज्यामुळे अर्ध्याहून अधिक रस्ता अडवला जातो. चौपदरीकरणानंतर वाहतूक कोंडी सुटेल ही नागरिकांची अपेक्षा फोल ठरली असून, उलट रस्ता रुंद झाल्याने बेकायदेशीर वाहनधारकांना पार्किंगसाठी अधिक जागा उपलब्ध झाल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

अनेक वर्षांपासून रस्त्याच्या कडेला गंजलेल्या अवस्थेत उभी असलेली वाहने आता कायमस्वरूपी अडथळा ठरत आहेत. या समस्येकडे महानगरपालिका, आरटीओ आणि वाहतूक पोलीस पूर्णपणे डोळेझाक करत आहेत.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुणाला अटक

## वाडेगावातील प्रकरण; पोलिसांकडून पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २३ :** वाडेगाव येथे शिकवणी वर्गावरून घरी परतणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप असलेल्या २३ वर्षीय तरुणाला बाळापूर पोलिसांनी अटक केली. पीडितेच्या तक्रारीवरून संबंधित तरुणाविरुद्ध भारतीय न्याय संहिता व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी दुपारी ही मुलगी शिकवणी वर्गातून पायी घरी जात होती. त्यावेळी आरोपीने दुचाकीवरून तिचा पाठलाग करून तिचा हात पकडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घरी पोहोचल्यानंतर मुलीने नातेवाइकांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास वाडेगाव पोलीस चौकीचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक विनोद खाडे करीत आहेत.

श्री सं ल शिंदे विद्या आणि श्री दिनकरराव पाठक कमवी सस्ती ता पातुर जि अकोला सत्र २६- २७ साठी उच्च माध्यमिक (कमवी )ताशिका तत्त्वावर खालील पदे भरायचे आहे तरी इच्छुक उमेदवारांनी दिनांक २५ / ०८ /२०२६वार मंगळवार सकाळी ११ वाजता मूळ कागदपत्रासह हजर राहावे.

पाहिजेत

| अनु | पदाचे नाव | विषय | शैक्षणिक अहता | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शिक्षक तासिका तत्त्वावर | मराठी | एम ए बी एड द्वितीय श्रेणी | ०१ |
| २ | ----=--- | इंग्रजी | एम ए बी एड द्वितीय श्रेणी | ०१ |
| ३ | ----=--- | इतिहास | एम ए बी एड द्वितीय श्रेणी | ०१ |
| ४ | ----=--- | समाज | एम ए बी एड द्वितीय श्रेणी | ०१ |

मुख्याध्यापक
श्री. सु.पा.पातोंड
७३५०११५२९५,

अध्यक्ष
श्री. गि.वा.शिंदे
८६००२३३९९९

सचिव
श्री.मो.म. बदरखे

वेळ:- स ११:००
स्थळ :- श्री सं ल शिंदे विद्यालय सस्ती
दिनांक : १८/ ०८ /२०२६

## विद्यार्थ्यांकडून खिचडीसाठी लाकडे मागविणे पडले महागात

**अकोला:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राजंदा येथील मुख्याध्यापक कैलास वसंतराव केदार यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मयुर काळे यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. संबंधित मुख्याध्यापकावर निलंबनाची कारवाई करण्यासाठी काळे यांनी उपोषण सुरू केले आहे. निवेदनानुसार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शाळेत राष्ट्रगीत व परिपाठाच्या वेळेत विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरातून खिचडी शिजवण्यासाठी जळाऊ लाकडे आणण्यास पाठवण्यात आले होते.

# झेडपीत 'पीआरसी'ची धास्ती: सुट्टीच्या दिवशीही कार्यालये सुरू

## कागदपत्रे पूर्ण करण्याचे आव्हान

अजिंक्य भारत। प्रतिनिधी





**अकोला, दि. २३ :** महाराष्ट्र विधानसभेच्या पंचायती राज समितीचा २ ते ४ सप्टेंबर दरम्यान अकोला जिल्हा परिषदेसह पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामपंचायतींमध्ये तीन दिवसीय पाहणी दौरा होणार आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कोणतीही दंडात्मक किंवा प्रशासकीय कारवाई टाळण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी शासकीय सुट्ट्यांच्या दिवशीही कार्यालयांमध्ये उपस्थित राहून कागदपत्रांची पूर्तता करत आहेत.

पंचायती राज समिती २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवाल आणि २०२४-२५ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालाचा सखोल आढावा घेणार आहे. यासाठी विधानसभा सचिवालयाकडून आलेल्या विस्तृत प्रश्नावलीची उत्तरे तयार करणे आणि संबंधित कागदपत्रांच्या प्रती संकलित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. एखाद्या प्रश्नाचे निरसन न झाल्यास किंवा माहिती अपूर्ण आढळल्यास समितीला थेट संबंधित अधिकाऱ्याला नोटीस बजावून कारवाई करण्याचे विशेष अधिकार असल्याने, इतर सर्व कामे बाजूला ठेवून अधिकारी केवळ पीआरसीच्या तयारीला प्राधान्य देत आहेत. लेखापरीक्षण परिच्छेदांची माहिती पुस्तिका आणि उत्तरपत्रिकांच्या प्रत्येकी सात प्रती सचिवालयात वेळेत जमा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच माहिती पुस्तिकेची एक प्रत समिती प्रमुखांच्या घरी सादर करणे आवश्यक आहे. विहित वेळेत अहवाल सादर न झाल्यामुळे, प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी शनिवारी शासकीय सुट्टी असूनही सर्व कार्यालये कार्यरत होती आणि रविवारीही कामकाज सुरू ठेवण्यात आले.

**कारवाई** कुख्यात गुंड सैय्यद अजीम सैय्यद कलीम एक वर्षासाठी जिल्हा कारागृहात

# समाजासाठी घातक ठरणारा आणखी एक इसम एमपीडीएखाली स्थानबद्ध

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** अकोला : अकोला शहरातील मस्ताब चौक, मोचीपुरा, अकोट फाईल परिसरातील कुख्यात गुंड सैय्यद अजीम सैय्यद कलीम (२२) याच्याविरुद्ध विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, त्याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व वाळू तस्कर यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम (एमपीडीए) अन्वये एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यात सन २०२६ मध्ये एमपीडीए कायद्यान्वये करण्यात आलेली ही १० वी स्थानबद्धतेची कारवाई असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सैय्यद अजीम सैय्यद कलीम याच्यावर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून परावृत्त करण्यासाठी हल्ला किंवा फौजदारीपात्र बळाचा वापर करणे, दरोडा, इच्छापूर्वक गंभीर दुखापत करणे, दुखापत करणे, घातक हत्यार किंवा साधनांचा वापर करून दुखापत करणे, रात्रीच्या वेळी घरफोडी अथवा घरात अनधिकृत प्रवेश करण्यापूर्वी दुखापत किंवा गैरनिरोध करण्याची तयारी करणे, बेकायदेशीर जमाव जमविणे, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रांनी सज्ज होऊन दंगा करणे, गुन्हेगारी कट रचणे, विविध गटांमध्ये शत्रुत्व वाढविणारी कृत्ये व विधाने करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्याच्याविरुद्ध यापूर्वी विविध कलमांनुसार प्रतिबंधात्मक कारवायाही करण्यात आल्या होत्या. मात्र, या कारवायांचा त्याच्यावर अपेक्षित परिणाम झाला नसल्याचे पोलिसांच्या तपासणीतून समोर आले. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत बदल न झाल्याने त्याच्याकडून भविष्यातही सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेण्यात आली.

या पार्श्वभूमीवर कुख्यात गुंड सैय्यद अजीम सैय्यद कलीम याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी त्याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे सादर केला.

जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी सदर प्रस्तावाची कायदेशीर पडताळणी केली. तसेच उपलब्ध कागदपत्रे, संबंधित गुन्ह्यांची पार्श्वभूमी आणि स्वतःच्या स्रोतांद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे सैय्यद अजीम सैय्यद कलीम हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्यानंतर त्याला एक वर्षासाठी अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश २३ ऑगस्ट २०२६ रोजी पारित केला.

आदेशाची तत्काळ अंमलबजावणी जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर पोलिसांनी सैय्यद अजीम सैय्यद कलीम याचा तात्काळ शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर स्थानबद्धतेचा आदेश बजावण्यात आला आणि २३ ऑगस्ट २०२६ रोजी त्याची अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्धता करण्यात आली. या कारवाईमुळे गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध अकोला पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, पोलीस हेड कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर सैरिसे, पोलीस कॉन्स्टेबल उदय शुक्ला, तसेच अकोट फाईल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेख रहीम यांच्या मार्गदर्शन व सहभागातून ही कारवाई पूर्ण करण्यात आली.



अजिंक्य भारत

# आपला अकोला जिल्हा

अकोला, सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### हिंदू व वीरशैव लिंगायत समाजाचा अमृत संस्थेच्या लक्षित गटात समावेश

**मुर्तिजापूर :** राज्य शासनाने हिंदू लिंगायत व वीरशैव लिंगायत समाजाचा समावेश अमृत (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) संस्थेच्या लक्षित गटात करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची माहिती मुर्तिजापूरचे आमदार हरीष मारोतीआप्पा पिंपळे यांनी दिली.शासनाच्या या निर्णयामुळे लिंगायत समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागास घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन तसेच विविध शैक्षणिक योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या उपक्रमांतर्गत युवक-युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगार, उद्योग आणि व्यवसायासाठी आवश्यक प्रोत्साहन व सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या योजनेमुळे समाजातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

### बंजारा समाजाला एसटी आरक्षणासाठी गोर सेनेचे जनजागृती अभियान

**पिंजर :** गोर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मागणीसाठी गोर सेनेच्या वतीने सकल गोर बंजारा एसटी आरक्षण अभियान



राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे ५ ते ६ हजार ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभेचे ठराव मंजूर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यातील ८४ तांड्यांसह गावागावांत जनजागृती केली जात असून, पातूर, मूर्तिजापूर आणि बार्शीटाकळी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींनी या मागणीचे एकमुखी ठराव मंजूर केले आहेत. बंजारा समाज हा ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या आदिवासी स्वरूपाचा असून, प्रलंबित मागणीसाठी लोकशाही मार्गाने शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती गोर सेनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप चव्हाण यांनी दिली.जिल्ह्यातील मंजूर झालेले सर्व ठराव मुख्यमंत्री व राज्यपालांना सादर करण्यात येणार आहेत. या अभियानात सेवक राठोड, डॉ. विकास जाधव, शिवराज जाधव, कमल चव्हाण, रवी राठोड, किरण पवार, मनोहर राठोड, रवी जाधव, गणेश राठोड, अतिश राठोड, सतीश राठोड, निगम राठोड यांच्यासह पदाधिकारी सक्रिय आहेत.

### राष्ट्रसंतांच्या क्रांतीकार्याविषयी क्रांतीज्योत यात्रा

**तेल्हारा :** स्वातंत्र्यलढ्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ऐतिहासिक योगदानाची ओळख नवी पिढी व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळातर्फे क्रांतीज्योत यात्रा काढण्यात आली आहे. दिवंगत बबनराव वानखडे यांच्या संकल्पनेतून व केंद्रीय प्रचारप्रमुख गोपाल कडू यांच्या नेतृत्वात ही यात्रा विदर्भातील ११ जिल्ह्यांतून जात आहे. यात्रेची सुरुवात ९ ऑगस्ट रोजी यावली येथून झाली. पहिल्या टप्प्यात अमरावती तर दुसऱ्या टप्प्यात नागपूर विभागातील जिल्ह्यांमध्ये ही यात्रा मार्गक्रमण करीत आहे. १९३० चा जंगल सत्याग्रह आणि १९४२ च्या चले जाव आंदोलनादरम्यान राष्ट्रसंतांनी भजनांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा दिली होती.

# तेल्हारा एमआयडीसी झाली केवळ कागदावरच मर्यादित!

## स्थानिक तरुणाईला सोसावा लागतोय रोजगाराचा वनवास

। पुरुषोत्तम इंगोले ।




**तेल्हारा, दि. २३ :** समृद्ध कृषी संस्कृती आणि कष्टाळू शेतकऱ्यांचा भूभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तेल्हारा तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) परिसरात आज भयाण शांतता पसरली आहे. निर्मितीला अनेक वर्षे उलटूनही एकाही मोठ्या कृषी प्रक्रिया उद्योगाचा पाया येथे रचला गेला नाही. परिणामी, हाताला काम नसल्याने स्थानिक सुशिक्षित तरुणाईला महानगरांकडे रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत असून तेल्हारा तालुक्याचा रोजगाराचा वनवास अद्याप संपलेला नाही.तालुक्यात कपाशी, सोयाबीन, ज्वारीसह केळी, टोमॅटो, कांदा व मिरची या नगदी पिकांचे विक्रमी उत्पादन होते. यामुळे कॉटन जिनिंग-प्रेसिंग, सरकी व सोयाबीन खाद्यतेल शुद्धीकरण प्रकल्प, केळी वेफर्स, बनाना फायबर आणि टोमॅटो सॉस, मिरची पावडर उद्योग सहज उभे राहू शकतात. मात्र, लोकप्रतिनिधींची राजकीय इच्छाशक्ती, प्रशासकीय उदासीनता आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे ही औद्योगिक वसाहत केवळ कागदावरच उरली आहे.

स्थानिक पातळीवर संधी नसल्याने पदवीधर तरुणांना मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर व गुजरातकडे धाव घ्यावी लागत आहे. घरातील तरुण शेकडो मैल दूर गेल्यामुळे मागे राहिलेल्या वृद्ध आई-वडिलांना आजारपणात आधार उरलेला नाही. गावागावांतील ओस पडणारी घरे या गंभीर सामाजिक समस्येची साक्ष देत आहेत. प्रशासनाने विशेष कर सवलती जाहीर करून उद्योजकांना आकर्षित केल्यास शेतमालाला योग्य भाव मिळेल आणि तरुणांचे स्थलांतर थांबेल.

#### प्रक्रिया उद्योगांची गरज अन् होणारे लाभ

तालुक्यात सूतगिरणी, सरकी–सोयाबीन तेल प्रक्रिया प्रकल्प, बनाना फायबर युनिट आणि भाजीपाला शीतगृहे (कोल्ड स्टोरेज) उभारल्यास मोठा आर्थिक बदल घडू शकतो. यामुळे थेट मध्यस्थांची साखळी मोडीत निघून शेतकऱ्यांचे शोषण थांबेल. तरुणांना गावातच हक्काचा रोजगार मिळाल्यास महानगरांकडील वाढते स्थलांतर रोखले जाईल आणि वृद्धापकाळात एकाकी पडलेल्या ज्येष्ठ पालकांना भक्कम सामाजिक व कौटुंबिक आधार लाभेल.

## उपजिल्हा रुग्णालयात सहायता हेल्प सपोर्ट ग्रुपतर्फे फळवाटप




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर : दि २३ :** येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात सहायता हेल्प सपोर्ट ग्रुपच्या वतीने दाखल रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात लक्ष्मीबाई देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर ग्रुपच्या सदस्यांनी विविध कक्षांतील रुग्णांची विचारपूस करत अल्पोपहार व फळे दिली. याप्रसंगी आयोजकांनी मूर्तिजापूरसह अकोला आणि अमरावती येथील शासकीय रुग्णालयांत उपचार घेत असलेल्या गरजू रुग्णांना व त्यांच्या नातेवाइकांना ग्रुपच्या वतीने भोजनाचा डबा उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती दिली. यासाठी गरजू रुग्णांच्या नातेवाइकांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमास सहायता ग्रुपचे संस्थापक शहीद चाऊस, अध्यक्ष नितेश गुंजाळ, नितीन वर्मा, रोहित जोगी, अमोल राऊत, रामदास हाटकर, ललित चौधरी, ज्ञान नर्मदा संस्थेचे संस्थापक विष्णू लोडम, रुग्ण कल्याण समितीचे सुनील लशुवानी, अब्दुल रफिक, प्रथमेश धानोकार, तुषार जंगले, आकाश डहाके, रूपाली, जया यांच्यासह ग्रुपचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनी कुटासा येथे मोफत नेत्रतपासणी शिबिर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि २३ :** भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अकोला अ‍ॅग्रोसिटीच्या वतीने कुटासा येथील शिवाजीराव देशमुख यांच्या परिसरात मोफत नेत्रतपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे शिबिर रोटरी क्लब अकोला नॉर्थच्या सहकार्याने आणि रोटे. डॉ. जुगल चिरानिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.




शिबिराचे नेतृत्व डायरेक्टर मेडिकल सर्व्हिसेस रोटे. दिनेश नंदवंशी यांनी केले. या सामाजिक उपक्रमात एकूण २५० नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. त्यापैकी गरजू ४२ रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप निश्चित झाले, तर मोतीबिंदू व इतर नेत्र शस्त्रक्रियांची आवश्यकता असलेल्या ८ रुग्णांची पुढील उपचारासाठी निवड करण्यात आली.

शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी अ‍ॅग्रोसिटीचे अध्यक्ष अ‍ॅड. संतोष पाटील, मानद सचिव रोटे. रवी शिंदे, सहसचिव रोटे, किरण ढवळे, ए.जी. रोटे, गुणवंत देशपांडे, पि.पि रोटे. नीरज देशमुख, डायरेक्टर क्लब अ‍ॅडमिनिस्ट्रेशन रोटे, नारायण कलमकर, रोटे, सुनिता देशपांडे आणि उपाध्यक्ष स्वप्नील कोकाटे यांच्यासह सर्व रोटरी सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून मोलाचे योगदान दिले.

## अडगाव बु. येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगाव बु. : दि २३ :** स्थानिक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेच्या वतीने बालाजी मंगल कार्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. सुरुवातीला वैयक्तिक व सांघिक गीतानंतर भगव्या ध्वजाचे पूजन करून गुरुदक्षिणा समर्पित करण्यात आली. याप्रसंगी तेल्हारा तालुका संघचालक डॉ. माधव बनकर यांनी मार्गदर्शन करताना संघाच्या कार्याची माहिती दिली. तसेच वैयक्तिक व सामाजिक



जीवनात राष्ट्रभक्तीचे महत्त्व पटवून देत संघाच्या विचारांवर चालून देशविकासात योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाची सांगता संघ प्रार्थनेने झाली.

या सोहळ्यास तालुका सहकार्यवाहक प्रशांत उजाळे, तालुका कुटुंब प्रबोधन संयोजक फकीरचंद भट्टड, अकोट खंड वाहक नरेंद्र मानकर, अडगाव बु. शाखा कार्यवाहक मयूर रहाटे, उपकार्यवाहक कृष्णा लोणकर यांच्यासह शिवाजी नगर भागातील नागरिक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकोट बसस्थानकासाठी लोकजागर मंचाकडून नामफलक भेट




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि २३ :** येथील बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना बसची ओळख, मार्ग आणि गंतव्यस्थान सहज कळावे यासाठी लोकजागर मंचच्या वतीने बससाठी नामफलक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मंचचे संस्थापक अनिल गावंडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

अकोट बसस्थानकावरून दररोज शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. अनेकदा बसवर मार्गफलक स्पष्ट नसल्याने प्रवाशांची धावपळ होते. ही अडचण दूर होऊन प्रवाशांना योग्य बस निवडणे सुलभ व्हावे, या उद्देशाने हे नामफलक देण्यात आले आहेत.याप्रसंगी आगार व्यवस्थापक मिथुन शर्मा, अनंतराव सपकाळ, गजानन बोरोकार, राजू गावंडे, सचिन नागापुरे, योगेश जायले, अविनाश बघेले, ओम पाचपोहे, संजय शेळके, हरिभाऊ कुकडे, विनोद शित्रे यांच्यासह मंचचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. आगामी काळातही प्रवाशांच्या सोयीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## ग्रामसभा कामकाजावर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा बहिष्कार

### सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; बार्शीटाकळी तहसीलदारांना संघटनेचे निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी : दि २३ :** पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्रामसभेत घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेचा निषेध नोंदवत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या बार्शीटाकळी शाखेने ग्रामसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून, तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.ग्रामसभेदरम्यान अधिकाऱ्यांवर होणारा कथित



दबाव व तणावामुळे निर्माण होणारी असुरक्षितता दूर करावी, अशी मागणी युनियनने केली आहे. ग्रामसभेचे कामकाज ठप्प होऊ नये म्हणून स्थानिक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांऐवजी अन्य विभागातील अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांची ग्रामसभेचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असा पर्याय संघटनेने सुचवला आहे. जोपर्यंत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना व स्पष्ट नियमावली लागू होत नाही, तोपर्यंत स्थानिक अधिकाऱ्यांना ग्रामसभेच्या कामकाजातून सूट मिळावी, अशी भूमिका घेण्यात आली आहे.या वेळी संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव राजेश बंड, सहसचिव यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

या निवेदनामुळे प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**पावसाने फिरवली पाठ** | **भविष्यातील पाणीटंचाईचे संकट गंभीर**

## पाण्याचा प्रत्येक थेंब जपा - आ. हरीश पिंपळे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी : दि २३ : यंदा पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेली स्थिती पाहता, आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाण्याचा प्रत्येक थेंब जपून ठेवावा, असे आवाहन आमदार हरीश पिंपळे यांनी केले आहे.**



तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिके धोक्यात आली असून शेतजमिनींना भेगा पडत आहेत. पावसाअभावी भूजल पातळी खालावल्यास विहिरी, कूपनलिका व तलावांमधील पाणीसाठा आटण्याची भीती निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या पाण्याचा अमर्याद उपसा सुरू राहिल्यास उन्हाळ्यात अनेक गावांवर टँकरवर अवलंबून राहण्याची पाळी येऊ शकते.

पाण्याच्या टंचाईचा सर्वाधिक फटका शेतीसह पशुधनाला बसणार असून, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर रूप धारण करू शकतो. भविष्यातील बिकट परिस्थिती टाळण्यासाठी नागरिकांनी केवळ प्रशासनावर विसंबून न राहता नळ सुरू ठेवणे, वाहने धुणे किंवा पाण्याचा अपव्यय करणे टाळावे. घरातूनच पाणी बचतीची चळवळ सुरू करून जलस्रोतांचे संवर्धन करण्याची गरज असल्याचे आ. पिंपळे यांनी नमूद केले.

#### पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी हे करा

- नळ सुरू ठेवून किंवा वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा.
- जलवाहिन्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करून पाणी वाया जाण्यापासून रोखावे.
- विहिरी व कूपनलिकांमधील पाण्याचा उपसा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करावा.
- शेतीसाठी ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करावा.

## हिवरखेड येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिवरखेड : दि २३ :** येथील श्री गजानन महाराज मानव सेवा समितीच्या वतीने जुनी चावडी, कामठा येथे लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या नूतन मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसारोहण सोहळा पार पडला.या सोहळ्यानिमित्त १८ ऑगस्ट रोजी श्री गजानन महाराजांची मूर्ती, शिवलिंग, रामलला दरबार, आसरा माता व कळसाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यात वारकरी संप्रदाय व भजनी मंडळे सहभागी झाली होती. १९ ऑगस्ट रोजी पौरोहित्य देव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होम-हवन व पूजन पार पडले. यामध्ये सुरेश ओंकारे, अशोक नाठे, महादेव पोके, विशाल हागे, महेश शर्मा, दिलीप नाठे, राहुल नाठे, सुरेश हागे, वैभव येलूकार यांनी सहकुटुंब यजमानपद भूषविले.२० ऑगस्ट रोजी मूर्ती स्थापना व कळसारोहणाचा मुख्य विधी पार पडला.

## रोटरी क्लबतर्फे ७५० रोपांचे वृक्षारोपण




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि २३ :** पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा संदेश देत रोटरी क्लब ऑफ अकोटच्या वतीने ७५० विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणाचा ऱ्हास लक्षात घेऊन वृक्षारोपण व संवर्धन करणे काळाची गरज आहे. या मोहिमेत वड, पिंपळ, औदुंबर, बेल, पाम, सिल्व्हर ओक, सप्तपर्णी आदी प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली.

केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या रोपांचे नियमित संगोपन करण्याचा निर्धार यावेळी सदस्यांनी व्यक्त केला.या उपक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. नावेश्चंद्र मोहता, सचिव श्यामकुमार शर्मा, माजी अध्यक्ष रवी पवार, राजकुमार गांधी, संदीप ढोक, अश्विन पितांबरवाले, प्रवीण बानेरकर, परीक्षित बोचे आदी उपस्थित होते. प्रकल्पाचे आयोजन प्रकल्प प्रमुख विवेक रघुवंशी यांनी केले.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### शेतात काम करताना महिलेस सापाचा दंश

**मालेगाव :** शेतात काम करत असताना ६० वर्षीय लक्ष्मीबाई पांडुरंग खवले यांच्या हाताला विषारी घोणस सापाने दंश केल्याची घटना गुरुवारी घडली. त्यांना तातडीने मालेगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी वाशीम जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती शनिवारी प्राप्त झाली. मालेगाव शहरातील खवले वेटाळातील रहिवासी लक्ष्मीबाई खवले या सुनेसह शेतात काम करीत असताना दुपारच्या सुमारास त्यांच्या हाताला सापाने दंश केला. घटनेनंतर सुनेने आरडाओरड करून मदत मागितली. आसपासच्या शेतकऱ्यांनी धाव घेऊन नातेवाईकांनाही माहिती दिली. त्यानंतर त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### जिल्ह्यात ८,४९३ शेतकऱ्यांचे विहिरींचे अनुदान रखडले

**वाशीम :** जिल्ह्यातील सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण होऊनही तब्बल दोन वर्षांपासून जिल्ह्यातील ८ हजार ४९३ शेतकऱ्यांचे अनुदान रखडले आहे. यामुळे ते आर्थिक अडचणीत सापडले आहे.

यासंदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुआण्णा इंगोले यांनी सांगितले की, सिंचन विहिरींच्या अनुदानासाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### जिल्ह्यातील ७७ प्रकल्पांत अवघा ३७ टक्के पाणीसाठा!

**वाशीम :** ऑगस्ट महिन्यात पावसाने मारलेल्या प्रदीर्घ दडीमुळे वाशीम जिल्ह्यातील जलप्रकल्पांमधील पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. जलसंपदा विभागाच्या २२ ऑगस्टच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील लहान-मोठ्या तब्बल ७७ प्रकल्पांमध्ये अवघा ३६.८९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. वेळेवर दमदार पाऊस न झाल्यास आगामी काळात सिंचनासह पाणीटंचाईच्या संकटात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वाशीम पाटबंधारे विभागांतर्गत ७७ प्रकल्पांची एकूण साठवण क्षमता २९५.४५ दलघमी आहे. मात्र, सध्या या प्रकल्पांमध्ये केवळ १०८.९८ दलघमी उपयुक्त पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील मध्यम स्वरूपाच्या दोन प्रकल्पांपैकी वाशीम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या 'एकबुर्जी' प्रकल्पात ४१.८५ टक्के, तर मालेगाव तालुक्यातील 'सोनल' प्रकल्पात अवघा १९.२१ टक्के साठा उपलब्ध आहे.

# साडे तीनशे रुपयांच्या चोरीचा तपासातून पोलिसांच्या हाती लागला १२ लाखांचा ऐवज!

## मालेगाव पोलिसांची चकित करणारी कामगिरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मालेगाव, दि. २३ :** दुकानाचे कुलूप तुटले होते... आतून अवघ्या साडेतीनशे रुपयांचे साहित्य चोरीला गेले होते. पहिल्या नजरेत ही एक अतिशय किरकोळ चोरी वाटत होती. परंतु, याच अवघ्या ३५० रुपयांच्या चोरीचा शोध घेताना मालेगाव पोलिसांनी असा काही दोर पकडला की, थेट १२ लाख २० हजार रुपयांच्या मोठ्या मुद्देमालाचा आणि बेकायदेशीर साठ्याचा पर्दाफाश झाला!

पांगरी कुटे (ता. मालेगाव) येथील रहिवासी गजानन हरिभाऊ कुटे (वय ४६) यांचे बस स्थानकाजवळ महाराष्ट्र मोटर वाइंडिंग नावाचे दुकान आहे. दि. २० ऑगस्ट २०२६ च्या रात्री ९:०० वाजेच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले. मात्र, २० ऑगस्टच्या रात्री ते २१ ऑगस्टच्या सकाळी ८:०० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दुकानातून केवळ ३५८ रुपयांचा माल गायब झाला होता. गजानन कुटे यांच्या तक्रारीवरून मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.



साडेतीनशे रुपयांच्या चोरीचा तपास करण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज खंगाळण्यास सुरुवात केली. फुटेजमधील संशयास्पद हालचाली आणि गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या एका ठोस टिपच्या आधारे पोलिसांचे पथक सुलतानापूर-बीबी रोडवरील खापरखेडा फाट्याकडे रवाना झाले. तेथील हॉटेल रामभरोसे येथे अचानक छापा टाकला आणि संशयितांना ताब्यात घेतले. यामध्ये रामनारायण दिगंबर चव्हाण (रा. खापरखेडा, ता. लोणार, जि. बुलढाणा), आणि हमीद खा शाबास खा (वय ४२, रा. सावजी गल्ली, डोणगाव, जि. बुलढाणा) या आरोपींचा समावेश आहे.

पोलिसांनी पंचांसमक्ष हॉटेलची आणि परिसराची कसून झडती घेतली, तेव्हा समोर आलेले दृश्य पाहून तपास पथकही चक्रावले. ज्या चोरीचा आकडा ३५० रुपये होता, तिच्या तपासात तब्बल १२,२०,७७० रुपयांचा संशयास्पद व बेकायदेशीर साठा हाती लागला होता. विनापरवाना मोठा गॅस सिलेंडर साठा, किराणा सामान व हॉटेल-धाब्यावरील भांडी, सीसीटीव्ही कॅमेरे व डीव्हीआर , चोरी करण्यासाठी लागणारे साहित्य कॉपर वायर, खुर्च्या, मोटर पंप, बॅटरी आणि गुन्ह्यात वापरलेली महागडी इनोव्हा कार असा मुद्देमाल जप्त केला. साडेतीनशे रुपयांच्या छोट्या चोरीच्या धाग्यावरून पोलिसांनी हा १२ लाखांचा मोठा डोंगर उघडा पाडला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन कल्ले करत आहेत. ही कौतुकास्पद कारवाई वाशिमचे पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे , अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक राजेश खेरडे, पोलीस हवालदार सुनील पवार, शिवाजी काळे, जयशंकर पाटील तसेच पोलीस कॉन्स्टेबल अमोल पवार, वैभव झरकर, गणेश मेटांगळे व योगेश इंगळे यांच्या पथकाने विशेष कामगिरी बजावली.

# पावसाची दडी : २२ दिवसांत केवळ २१ टक्के पाऊस!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २३ :** जिल्ह्यात ऑगस्ट महिन्याचा बहुतांश कालावधी कोरडा गेल्याने खरीप हंगामातील पिकांवर संकट गडद झाले आहे. २२ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात केवळ ४९.८ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, ऑगस्टच्या २३६.१ मि.मी. सरासरीच्या तुलनेत हे प्रमाण अवघे २१.१ टक्के इतके राहिले आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस, हळद सह अन्य पिकांची वाढ आणि उत्पादन क्षमता यावर परिणाम होण्याची शक्यता असून, जमिनीतील ओलावा कमी होत चालल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमध्ये पावसाचे प्रमाण सरासरीच्या तुलनेत कमी असून कारंजा तालुक्यात परिस्थिती सर्वाधिक गंभीर आहे. तिथे २२ ऑगस्टपर्यंत केवळ ६.२ मि.मी. म्हणजे सरासरीच्या ३ टक्के पाऊस झाला आहे.

कारंजा तालुक्यात २२ ऑगस्टपर्यंत केवळ ६.२ मि.मी. पाऊस झाला असून, तालुक्याच्या २०३.८ मि.मी. सरासरीच्या तुलनेत हे प्रमाण अवघे ३ टक्के आहे. त्यामुळे तालुक्यातील खरीपावरील संकट अधिक तीव्र झाले आहे.

**तालुकानिहाय पावसाची स्थिती!**

२२ ऑगस्टपर्यंत वाशीम तालुक्यात ८४.४ मि.मी., रिसोडमध्ये ६४.४ मि.मी., मालेगावमध्ये ७३.४ मि.मी., मंगरूळपीरमध्ये ३०.४ मि.मी., मानोरामध्ये २९.८ मि.मी. आणि कारंजाात केवळ ६.२ मि.मी. पाऊस नोंदला गेला. जिल्ह्याची एकूण सरासरी २३६.१ मि.मी. असताना प्रत्यक्ष पाऊस ४९.८ मि.मी.वरच राहिला आहे.

मानोरा तालुक्यात २९.८ मि.मी., तर मंगरूळपीरमध्ये ३०.४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. दोन्ही तालुक्यांतील पावसाचे प्रमाण त्यांच्या अनुक्रमे २०६.१ आणि २२३.८ मि.मी. सरासरीच्या तुलनेत अत्यंत अल्प आहे. त्यामुळे पिकांना आवश्यक असलेला ओलावा टिकवून ठेवण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे.

# नियोजन कागदावर नको; विद्यार्थ्यांत गुणवत्ता दिसावी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २३ :** शैक्षणिक वर्ष सुरू होऊन पावणेदोन महिने उलटले आहेत. वर्षभराच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीचे नियोजन झाले असलेही; मात्र नियोजन केवळ कागदावरच न राहता त्याचे प्रतिबिंब प्रत्येक विद्यार्थ्याच्या अध्ययनात दिसले पाहिजे, असा स्पष्ट संदेश वाशीम पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी २२ ऑगस्ट रोजी शिक्षकांना दिला. 'नियोजनापेक्षा वर्गातील अंमलबजावणी महत्त्वाची' या वेगवेगळ्या अंगाने त्यांनी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी कृती कार्यक्रम राबविण्याचे आवाहन केले.



फाळेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आयोजित केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत ते बोलत होते. जिल्ह्यातील ७४ केंद्रांवर एकाच दिवशी शिक्षण परिषद पार पडली. फाळेगावातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघाचे राज्याध्यक्ष अशोकराव महाले होते. शिक्षण विस्तार अधिकारी गजानन परांडे, केंद्र मुख्याध्यापक प्रवीण महाजन, गजानन वारकड, नाणाराव घुगे, प्रशांत देशमुख, वैजनाथ भदमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थी सुरक्षा आणि शाळेचे वातावरणही गुणवत्तेचा महत्त्वाचा भाग असल्याचे डाबेराव यांनी यावेळी स्पष्ट केले. शाळेच्या वर्गखोल्या अद्यावत, स्वच्छ व सुरक्षित असाव्यात. शालेय साहित्याचीही योग्य निगा राखली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

शिक्षण परिषदेत अशोकराव महाले यांनी 'निपुण महाराष्ट्र'अंतर्गत विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर निश्चितीबाबत मार्गदर्शन केले. मिनेश खडके, प्रशांत इंगळे, महेंद्र काळे आणि विषय शिक्षक अनिल गोरे यांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन केले. शिक्षकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणीबाबत यावेळी चर्चा झाली.

# गायरान जमीन हस्तांतरित करण्यास ग्रामस्थांचा विरोध!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २३ :** तालुक्यातील हिवरा बु. येथील गट क्र. ९६ मधील गायरान जमीन वन विभागाकडे हस्तांतरित करण्याच्या हालचालींना ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. गावातील गुरेढोरे व पशुधनाच्या चराईसाठी ही जमीन अत्यंत महत्त्वाची असून, ती अन्य विभागाकडे हस्तांतरित करू नये, अशी मागणी ग्रामस्थांनी तहसील कार्यालयाकडे २२ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

गट क्र. ९६ मधील गायरान जमीन गावातील गुरांच्या चराईसाठी वापरली जाते. तसेच या जमिनीतून लगतच्या शेतांकडे ये-जा करण्यासाठी ग्रामस्थ व शेतकरी मार्गाचा वापर करतात. त्यामुळे जमीन हस्तांतरित झाल्यास चराईसह शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. यापूर्वी ग्रामस्थांनी १५ जुलै रोजी यासंदर्भात लेखी अर्ज दिला होता. त्यानंतर १५ ऑगस्ट रोजी तलाठी मनवर हे पाहणीसाठी ग्रामपंचायतीत आले असता ग्रामस्थ एकत्र आले. यावेळी त्यांनी गायरान जमीन वनविभागाकडे देण्यास स्पष्ट हरकत नोंदविली. गायरान जमीन गावाच्या सार्वजनिक उपयोगाची असून ती गुरांच्या चराईसाठी कायमस्वरूपी राखीव ठेवावी. ग्रामस्थांची बाजू ऐकून घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.

जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. निवेदनावर विजय तुळजापुरे, किसन रोहनकार, संजय कोल्हे, सतीश गावंडे, नंदकिशोर करुनकार यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्रावण मासात पर्यावरणाचा जागर! मंदिर परिसरात विद्यार्थ्यांकडून बेलवृक्षांचे रोपण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २३ :** पवित्र श्रावण मासाचे औचित्य साधून लाखाळा परिसरातील प्राचीन कोंडेश्वर संस्थानाच्या आवारात शनिवारी (२२ ऑगस्ट) बेलवृक्षांचे रोपण करण्यात आले. अलीकडच्या काळात दुर्मिळ होत चाललेल्या बेलवृक्षांचे जतन व्हावे, या उद्देशाने 'राष्ट्रीय हरित सेना', 'निसर्ग इको क्लब', एसएमसी इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

श्रावण महिन्यात पूजेसाठी बेलाच्या पानांची मोठ्या प्रमाणावर मागणी असते, ज्यामुळे या झाडांची तोड आणि ऱ्हास होतो. ही झाडे वाचवून त्यांच्या संवर्धनाबाबत समाजात जनजागृती व्हावी, यासाठी चिमुकल्यांनी पुढाकार घेतला. या वेळी राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजित जोशी यांनी बेलवृक्षांचे औषधी व धार्मिक महत्त्व विशद करत वृक्षारोपणाचा संदेश दिला. हा उपक्रम प्राचार्या मीना उबगडे, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक पन्हाळ, सहायक वनसंरक्षक पद्माकर मोगरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी अंशुल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वनपाल बेले, रवी कामडी, हरणे तसेच वनरक्षक बी. एस. वानखडे, संतोष जुमडे आणि कोंडेश्वर संस्थानाचे पुजारी दिनकर गिरी महाराज यांनी विशेष सहकार्य केले.

# एसटीच्या प्रसारासाठी कर्मचाऱ्यांना 'सोशल मीडिया'चे व्यासपीठ!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २३ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) विविध प्रवासी योजना, लोकाभिमुख उपक्रम आणि प्रवाशांच्या सोयी-सुविधांचा नागरिकांपर्यंत प्रभावी प्रचार व प्रसार करण्यासाठी महामंडळाने आता 'सोशल मीडिया'चा आधार घेण्याचे ठरवले आहे. या पार्श्वभूमीवर, फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि यूट्यूबवर सक्रिय असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती मागवण्यात आली असून, इच्छुक कर्मचाऱ्यांनी विहित नमुन्यात



आपला अर्ज त्वरित सादर करावा, असे आवाहन जिल्ह्यातील एस.टी. कर्मचाऱ्यांना करण्यात आले आहे.

रा.प. महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महामंडळाची सकारात्मक प्रतिमा उंचावण्यासाठी आणि विविध योजना जास्तीत जास्त प्रवाशांपर्यंत पोहोचवण्यासाठी समाजमाध्यमे हे एक प्रभावी माध्यम ठरत आहेत. ज्या कर्मचाऱ्यांचे स्वतःचे सोशल मीडिया अकाऊंट्स असून ज्यांना चांगला प्रतिसाद (फॉलोअर्स) आहे, किंवा जे महामंडळाच्या योजनांचा प्रचार करण्यास उत्सुक आहेत, अशा कर्मचाऱ्यांचा वापर करून महामंडळाच्या विविध सकारात्मक घडामोडी प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

## मोबाईल ॲपद्वारे खत बुकिंग | २५ ऑगस्टपासून जिल्ह्यात 'पथदर्शी प्रकल्पा'ची सुरुवात

# शेतकरी बांधवांनो ..! आता घरबसल्या खताची उपलब्धता कळणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** खत विक्री आराखड्यानुसार आता मोबाईल ॲपद्वारे खताची नोंदणी व खरेदी करता येणार आहे. खत वितरण प्रणालीच्या 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' (एफएफएफएस) या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणी होत असून २५ ऑगस्ट २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष या प्रकल्पाची सुरुवात होणार आहे.



एफएफएफएस या पथदर्शी प्रकल्पाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व सहाय्यक निबंधक यांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत. तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), ग्रामपंचायत अधिकारी, कृषी मित्र, कृषी सखी, कृषी तंत्र व्यवस्थापक (एटीएम) व तालुका तंत्र व्यवस्थापक (बीटीएम) यांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करावे. या प्रशिक्षणात प्रणालीची संपूर्ण कार्यपद्धती आणि उद्दिष्टे समजावून सांगावीत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

प्रत्येक गावासाठी एका अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक करून गावपातळीवर शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सदस्य व लोकप्रतिनिधी यांना या प्रकल्पाची माहिती देऊन व्यापक जनजागृती करावी, असेही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले आहे. या पथदर्शी प्रकल्पामध्ये ॲग्री स्टॅकचा शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) व खत वितरणाची एकात्मिक खत व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. खत वितरणासाठी शेतकऱ्यांसाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' अर्थात 'खत विक्रीसाठी चौकट' हे ॲप तयार करण्यात आले असून, या ॲपद्वारे शेतकऱ्यांना अनुदानित खताची बुकिंग करता येणार आहे.

हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. या ॲपच्या वापरामुळे खत दुकानांमध्ये खत उपलब्ध आहे किंवा नाही, याची माहिती शेतकऱ्यांना घरबसल्या मिळणार आहे. त्यामुळे खत खरेदीसाठी रांगेत उभे राहून प्रतीक्षा करण्याचा शेतकऱ्यांचा वेळ वाचणार आहे. शेतकऱ्याने ॲपद्वारे आपल्या पसंतीच्या कृषी सेवा केंद्राकडे खत बुक केल्यानंतर ॲपमध्ये द्रुत प्रतिसाद संकेत (क्यूआर संकेत) निर्माण होईल. बुक केलेले खत तीन दिवस शेतकऱ्यांच्या नावे संबंधित कृषी सेवा केंद्रावर राखीव राहील. या तीन दिवसांच्या कालावधीत शेतकरी आपल्या सवडीने संबंधित केंद्रावर जाऊन क्यूआर संकेत स्कॅन करून खताची उचल करू शकतो. शेतकऱ्याने खरेदी केलेल्या प्रत्येक अनुदानित खताच्या गोणीची नोंद या प्रणालीमध्ये राहणार आहे. त्यामुळे अनुदानित खतांचे समन्यायी वाटप होण्यास मदत होईल तसेच खताच्या गैरवापरास प्रतिबंध घालता येणार आहे.

एफएफएफएस ॲपमध्ये आधार क्रमांक वापरूनही प्रवेश करता येत असला तरी, प्रणालीचा सुरळीत वापर करण्यासाठी ॲग्री स्टॅकचा 'शेतकरी ओळख क्रमांक' (फार्मर आयडी) असणे अधिक प्राधान्याचे व सोयीचे आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपला शेतकरी ओळख क्रमांक तयार केलेला नाही, त्यांनी तो लवकरात लवकर तयार करून घ्यावा. अन्यथा भविष्यात खत बुकिंग करताना त्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

> ■ शेतकऱ्यांना खतासाठी रांगेत उभे राहण्याची गरज भासू नये, उपलब्ध खतसाठ्याची माहिती घरबसल्या मिळावी आणि गरजेपुरते अनुदानित खत पारदर्शकपणे उपलब्ध व्हावे, हा या पथदर्शी प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यंत्रणेने शेतकऱ्यांना ॲपच्या वापराबाबत योग्य मार्गदर्शन करून या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा.
>
> 
>
> **-योगेश कुंभेजकर,** जिल्हाधिकारी,वाशिम.

# बारावी परीक्षा गैरप्रकार; संबंधित नियमानुसार होणार कारवाई



**वाशीम :** बारावी परीक्षेतील गैरप्रकाराच्या प्रकरणात संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांवर प्रस्तावित कारवाई तसेच वेतन रोखण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी शिक्षक महासंघाने केली होती. त्यावर अमरावती विभागीय मंडळाचे अध्यक्ष संदीप संगवे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना यथानियम कारवाई करून संबंधितांना कळिवण्याचे निर्देश २१ ऑगस्ट रोजी दिले.

बारावी परीक्षेतील गैरप्रकाराच्या अनुषंगाने माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी १२ ऑगस्ट रोजी आदेश काढला होता. संबंधितांवर दोन दिवसांत कारवाई करून सेवापुस्तकात प्रतिकूल नोंद करावी, तसेच कारवाई पूर्ण केल्याची सत्यप्रत सादर केल्याशिवाय वेतन देयके स्वीकारू नयेत, असे निर्देश या आदेशातून देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी अमरावती विभागीय मंडळाकडे निवेदन सादर केले होते.

संबंधितांवर घाईघाईने कारवाई करण्याऐवजी प्रकरणाचा फेरविचार करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. विभागीय मंडळाने या प्रकरणात नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाधिकारी कोणती भूमिका घेतात, याकडे संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांसह शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

महत्त्वाचे

## लाखपुरी येथे आज कावड उत्सवाची नियोजन बैठक



**मूर्तिजापूर :** तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे सावन कावड उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सोमवार, २४ ऑगस्ट रोजी श्री लक्षेश्वर संस्थान येथे जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत गर्दीचे नियोजन, पार्किंग व्यवस्था, कावड मार्गावरील सुविधा, आरोग्य व्यवस्था आणि आपत्कालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. उत्सव शांततेत, शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन आणि इतर विभागांच्या समन्वयावर भर दिला जाईल. या वेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक मार्गदर्शन करतील, बैठकीस दर्यापूर व मूर्तिजापूर तालुक्यातील विविध कावड मंडळांचे पदाधिकारी, कावडधारी, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते राजू दहापुते यांनी या बैठकीचे आयोजन केले असून सर्व संबंधितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## कृषी अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करा :निवेदन

**अकोला :** बनावट अहवाल तयार करून सूडबुद्धीने खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप करत, जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची मागणी सम्राट अशोक सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेचे अध्यक्ष आकाश शिरसाट यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना लेखी तक्रार दिली. तक्रारीनुसार, जिल्ह्यातील बोगस बियाणे विक्रीविरोधात १० जुलै रोजी कृषी अधीक्षक कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेले असता, संबंधित अधिकाऱ्यांनी नंतर सूडभावनेतून पोलिसांत खोटी तक्रार दिल्याचे शिरसाट यांनी म्हटले आहे.

निधन वार्ता

## सरोजिनी गिलबिले



**पातूर नंदापूर :** येथील प्रतिष्ठित नागरिक तथा सांप्रदायिक मंडळाचे आधारस्तंभ निळकंठ आगळे यांच्या भगिनी सरोजिनी गिलबिले (वय ७०, रा. पातूर नंदापूर) यांचे शनिवार, २२ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण, भाचे, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

## गोदावरीबाई बागडे



**जानोरी मेळ :** येथील अंश आर. ओ. प्लांटचे संचालक राहुल मारुती बागडे यांच्या मातोश्री गोदावरीबाई मारुती बागडे यांचे शनिवार, २२ ऑगस्ट रोजी रात्री १ वाजेच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

# वैनगंगा प्रकल्पाच्या भूसंपादनात बार्शीटाकळीतील १२ गावे

## प्राथमिक अधिसूचना जारी; जमीन व्यवहारांवर निर्बंध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. २३ :** विदर्भातील दुष्काळी स्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील भूसंपादनाची प्रक्रिया बार्शीटाकळी तालुक्यात अधिकृतपणे सुरू झाली आहे. भूसंपादन अधिनियमातील कलम ११ अन्वये प्राथमिक अधिसूचना जारी झाल्यामुळे बाधित क्षेत्रातील शेतजमिनींच्या नियमित खरेदी-विक्री व्यवहारांवर प्रशासकीय निर्बंध लागू झाले असून, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे लक्ष आता मूल्यांकनाकडे आणि योग्य मोबदल्याकडे लागले आहे.

प्राथमिक अधिसूचनेनंतर या भागातील जमिनींच्या नियमित खरेदी-विक्रीला मर्यादा आल्या आहेत. मात्र, विशेष किंवा अपवादात्मक परिस्थितीत जमीनमालकांना आपली बाजू मांडून जिल्हाधिकाऱ्यांकडे रीतसर अर्ज करण्याची कायदेशीर तरतूद उपलब्ध आहे.

शासनाच्या २० ऑगस्ट २०२४ च्या अधिकृत निर्णयानुसार ८८ हजार ५७४.९२ कोटी रुपयांच्या या महाकाय प्रकल्पातून विदर्भातील सहा जिल्ह्यांतील ३ लाख ७१ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी व गतीसाठी शासनाने स्वतंत्र देखरेख समितीही गठीत केली आहे. या पार्श्वभूमीवर, अकोला जिल्ह्याला आणि पर्यायाने बार्शीटाकळी तालुक्याला नेमका किती जललाभ मिळणार, याचे अधिकृत स्वरूप स्पष्ट व्हावे, अशी मागणी जोर धरत आहे. भूसंपादन प्रक्रियेदरम्यान जमिनीचे चालू बाजारमूल्य, फळझाडे, विहिरी, बोअरवेल आणि शेतातील इतर बांधकामांचे पारदर्शक मूल्यांकन करून शेतकऱ्यांना कायद्यानुसार न्याय्य भरपाई मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, या भूसंपादन प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांसंदर्भात अधिकृत माहिती घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, रविवारच्या शासकीय सुटीमुळे संपर्क होऊ शकला नाही.

### पहिल्या टप्प्यातील बाधित गावे

१२ गावे : टिटवा, सय्यदपुरा, तुळजापूर खुर्द, पद्मिनी, सकणी, पुनोती खुर्द, जुनुना, मंगरूळ, राजनखेड, राजनखेड तांडा, चिंचोली रुद्रायणी आणि वाघजाळी.

कार्यवाही : क्षेत्र मोजणी व हरकतींची प्रक्रिया पार पडणार.

### प्रकल्पाचे स्वरूप व कालवा मार्ग

मुख्य कालवा : गोसीखुर्द ते नळगंगा दरम्यान ४२६.५२ किमी मुख्य जोड कालवा.

दुवा कालवा : निम्न वर्धा ते काटेपूर्णा (१२६.९४ किमी) व काटेपूर्णा ते नळगंगा.

वापर : सहा जिल्ह्यांतील शेती सिंचनासह पिण्याच्या व औद्योगिक पाण्यासाठी वापर.

## जय बजरंग विद्यालयात स्काऊट गाईडचा वृक्षसंवर्धनाचा संकल्प



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**चान्नी, दि. २३ :** येथील जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील लोकमान्य टिळक स्काऊट पथक, अहिल्याबाई होळकर गाईड पथक आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले गाईड पथकाच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपण करून त्यांच्या संवर्धनाचा संकल्प केला.

विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या उपक्रमात चान्नी पोलीस ठाण्याचे ठाणेदार गंगाधर दराडे, जय बजरंग मंडळाचे संस्थापक संचालक गजानन इंगळे, संचालक डॉ. विनायकराव इंगळे, संचालक मधुकरराव गाडगे, संचालक प्रकाश बंड व प्राचार्य संग्राम इंगळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. स्काऊट हा निसर्गप्रेमी असून पर्यावरणाचे रक्षण करतो या तत्त्वाचे पालन करत विद्यार्थ्यांनी लावलेल्या रोपांना नियमित पाणी घालून त्यांचे संगोपन व संरक्षण करण्याचा निश्चय केला.

कार्यक्रमाचे नियोजन पर्यावरण प्रमुख संजय जायभाये व स्काऊट शिक्षक वसंत ढोकणे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंग्लिश हायस्कूलमध्ये डेंग्यू, साथरोग प्रतिबंधाबाबत जनजागृती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**अकोला, दि. २३ :** जागतिक डास दिनानिमित्त जिल्हा हिवताप कार्यालयाच्या वतीने गायत्री नगर परिसरातील इंग्लिश हायस्कूलमध्ये हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया तसेच कीटकजन्य व जलजन्य साथरोग प्रतिबंधात्मक जनजागृतीपर विशेष मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. कार्यक्रमाला जिल्हा हिवताप कार्यालयाच्या एडीएमओ जगताप यांच्यासह विभागातील प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा आरोग्य पर्यवेक्षक चंद्रशेखर तडस यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया रोगांचा प्रसार कसा होतो, त्यांची प्राथमिक लक्षणे कोणती आणि त्यापासून स्वतःचा बचाव कसा करावा, याविषयी अत्यंत सविस्तर व मोलाचे मार्गदर्शन केले. आरोग्य पर्यवेक्षक चव्हाण यांनी साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी घराच्या व शाळेच्या परिसरात स्वच्छता राखणे, पाण्याची सर्व भांडी व्यवस्थित झाकून ठेवणे आणि हात धुण्याच्या योग्य शास्त्रीय पद्धतीचे महत्त्व प्रात्यक्षिकासह पटवून दिले. या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचा तसेच जनजागृतीचा सामूहिक संकल्प केला. कार्यक्रमास मुख्याध्यापक राजकुमार तडस, शिक्षक डॉ. नरेश हल्लागडे, बहादूरसिंह चौहान, सचिन खर्चे, संतोष पुरी, किरण खोडस्कर, अनंत नागे, शिक्षिका दिपिका आदे, प्रणिता पवार, राजेश्वरी पांडे तसेच आरोग्य जिल्हा निरीक्षक गायकी, नागरे, संसारे व काळणे प्रामुख्याने उपस्थित होते.

## सर्वोपचार रुग्णालयाला ४० हजार मास्क भेट

**अकोला :** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाला मुंबईच्या व्हीआयपी इंडस्ट्रीज लिमिटेडने सीएसआर अंतर्गत तब्बल ४० हजार दर्जेदार फेस मास्क भेट दिले आहेत. हे मास्क १०० टक्के विषाणू प्रतिबंधक असून, टीबी व सारीसारख्या संसर्गजन्य आजारांपासून रुग्ण, नातेवाईक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे संरक्षण करण्यास उपयुक्त ठरतील, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने यांनी दिली.या उपक्रमासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण सपकाळ, प्रशासकीय अधिकारी महेश महाकालीवर, मेट्रन ग्रेसी मारियन, सीएसआर राज्य समन्वयक विजय गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. समाजसेवा अधीक्षक अमोल शेंडे व विनायक साखरे यांनी समन्वयाची जबाबदारी सांभाळली.

## कारंजा लाड येथे ३० ऑगस्टला भव्य शिक्षक मेळावा

### शिक्षकांच्या हक्क व विविध समस्यांवर होणार मंथन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्या, हक्क आणि सुरक्षिततेवर विचारमंथन करण्यासाठी रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता शेलू बाजार मार्गावरील कन्हैया रिसॉर्ट येथे भव्य शिक्षक मेळावा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्याचे उद्घाटन आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी मेस्टाचे संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष डॉ. संजयराव तायडे पाटील राहतील. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून यशदाचे आनंद मास्टर ट्रेनर डॉ. शिवाजीराव कुचे व शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. शिक्षकी पेशातील जबाबदाऱ्या सांभाळताना कौटुंबिक आनंद कसा जपावा, शिक्षकांच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधणे आणि शासनस्तरावर प्रभावी मागण्या मांडणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमाचे आयोजन मेस्टाचे विदर्भ अध्यक्ष किरण चौधरी यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. मेळाव्याच्या पूर्वतयारी बैठकीस जिल्हाध्यक्ष साहेबराव भरणे, संजय मगर, राजेश दिवनाले, निलेश धरमकर, विनोद पाटील, अमर हलवणे, डॉ. नदीम, राऊत, बाकडे तसेच राज्य सल्लागार पुरुषोत्तम जुजगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यास शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सुरक्षेच्या दृष्टीने प्रभाग क्र. १ मध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट , दि. २३ :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका रेश्मा परवीन मोहम्मद अजीम इनामदार व समाजसेवक अझीम इनामदार यांच्या पुढाकाराने प्रभागातील विविध भागांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

नागरिकांची सुरक्षितता वाढवणे आणि वाढत्या चोऱ्यांसह विविध गैरप्रकारांना आळा घालण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. या यंत्रणेमुळे प्रभागातील मुख्य चौक, अंतर्गत गल्ल्या आणि संवेदनशील ठिकाणांवर आता २४ तास नजर ठेवली जाणार आहे. परिसरातील हालचालींवर नियंत्रण राहण्यास यामुळे मदत होणार आहे.शहरातील इतर भागांच्या तुलनेत प्रभागातील नागरिकांच्या दैनंदिन सुरक्षिततेला प्राधान्य देऊन ही सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संभाव्य गुन्हेगारी घटनांना प्रतिबंध बसेल आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यास प्रशासनाला सहकार्य लाभेल. प्रभागातील सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने राबवण्यात आलेला हा उपक्रम उपयुक्त ठरणार असून, परिसरातील नागरिकांमधून या सुरक्षा व्यवस्थेचे स्वागत केले जात आहे.

## मूर्तिजापूर जंक्शनवर १४ प्रमुख गाड्यांना थांबा देण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २३ :** जिल्ह्यातील ऐतिहासिक व महत्त्वाच्या मूर्तिजापूर जंक्शनवर १४ प्रमुख सुपरफास्ट व एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांना प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्यात यावा, अशी मागणी प्रवासी, व्यापारी आणि नागरिकांच्या वतीने खासदार अनुप धोत्रे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मूर्तिजापूर हे कृषी बाजारपेठ, व्यापार व शिक्षणाचे प्रमुख केंद्र असल्याने येथून दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. मात्र अनेक महत्त्वाच्या गाड्या येथे थांबत नसल्याने मुंबई, पुणे, नागपूर, अहमदाबाद, तिरुपती व राजस्थानकडे जाण्यासाठी प्रवाशांना अकोला किंवा बडनेरा स्थानक गाठावे लागते. यामुळे वेळ व पैशांचा अपव्यय होत असून वृद्ध, रुग्ण व महिलांची गैरसोय होत आहे. खासदार धोत्रे यांनी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करून हे थांबे मंजूर करून द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### या गाड्यांना थांब्याची मागणी

अमरावती - तिरुपती, अमरावती - पुणे, नागपूर - अहमदाबाद, पुणे - नागपूर गरीब रथ, चेन्नई - भगत की कोठी, नागपूर - मडगाव, ब्रह्मपुत्र - उधना, हिसार सुपरफास्ट, पुरी - अहमदाबाद, रीवा - हडपसर, अजमेर सुपरफास्ट, डॉ. आंबेडकर नगर नागपूर शताब्दी, साईनगर शिर्डी व पुणे सुपरफास्ट एक्स्प्रेस.

## बालकांच्या पुनर्मिलनाबद्दल संरक्षण अधिकारी सुनील लाडूळकरांचा सत्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २३ :** जिल्ह्यातील विविध बालगृहांमध्ये दाखल असलेल्या चार हरविलेल्या मूकबधिर बालकांची आधार नोंदणी करून त्यांच्या पालकांचा शोध घेत सुरक्षित पुनर्मिलन घडवून आणल्याबद्दल जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे संरक्षण अधिकारी सुनील लाडूलकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

बालकांच्या पालकांचा शोध लागल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीत या बालकांना त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षितपणे स्वाधीन करण्यात आले होते. या अत्यंत संवेदनशील व उल्लेखनीय कार्याची जिल्हा प्रशासनाने विशेष दखल घेतली. स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय समारंभात जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते सुनील लाडूलकर यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, वीरमाता, वीरपत्नी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लाडूलकर यांच्या या प्रेरणादायी कार्याबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

भाविकांची मांदियाळी | पूर्णातीरावर वसलेले ‘लक्ष्मणपुरी’

# रामायणकालीन पाऊलखुणा अन् साडेअकरावे ज्योतिर्लिंग; लाखपुरीच्या लक्षेश्वराचा विलोभनीय वारसा

। सागर सदांशीव ।

**मूर्तिजापूर, दि. २३ :** विदर्भाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवात महत्त्वाचे स्थान असलेले अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथील पुरातन श्री लक्षेश्वर मंदिर हे भाविकांचे मोठे श्रद्धास्थान मानले जाते. निसर्गरम्य पूर्णा नदीच्या तीरावर वसलेल्या या प्राचीन मंदिराचा संबंध स्थानिक लोकश्रद्धेनुसार प्रभू श्रीरामाच्या वनवास काळाशी जोडला गेला असून, श्रावण मास आणि महाशिवरात्रीला येथे विदर्भभरातून भाविकांची मोठी गर्दी होते.



स्थानिक आख्यायिका व पारंपरिक संदर्भांनुसार, अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील आजचे लाखपुरी हे गाव प्राचीन काळी ‘लक्ष्मणपुरी’ म्हणून ओळखले जात असल्याचा उल्लेख मिळतो. वनवासादरम्यान प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण या भागात वास्तव्यास असताना, लक्ष्मणाने या पूर्णातीरावर या शिवलिंगाची स्थापना केल्याची भाविकांची गाढ श्रद्धा आहे. भाविकांच्या मान्यतेनुसार, या शिवलिंगाचा काही भाग नदीपात्रात तर उर्वरित भाग मुख्य मंदिरात असल्याची श्रद्धा असल्याने या स्थानाला ‘साडेअकरा ज्योतिर्लिंगांचे



श्रद्धास्थान’ अशी जनमानसात ओळख लाभली आहे.

श्रावणातील प्रत्येक सोमवारी पंचक्रोशीसह भाविक पूर्णा नदीचे जल आणून येथे जलाभिषेक करतात. मंदिर परिसरात प्राचीन स्थापत्यशैलीची वैशिष्ट्ये, तसेच ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्यासह विविध पुरातन शिल्पे असल्याने या परिसरास पुरातत्त्वीय महत्त्व प्राप्त झाले आहे. स्थानिक माहितीनुसार, दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी भेट देतात.

भाविकांची संख्या लक्षात घेऊन स्थानिक विश्वस्त व्यवस्था व प्रशासनाकडून पेयजल, वाहनतळ, प्रकाशव्यवस्था आणि आपत्कालीन सुरक्षेची व्यवस्था करण्यात येते.

### शिल्पकलेचा वारसा अन् श्रद्धा

प्राचीन परंपरेचा वारसा लाभलेले हे तीर्थक्षेत्र अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्याच्या वैभवात भर घालणारे मानले जाते. मंदिरातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, पूर्णा नदीचा घाट, पुरातन शिल्पे आणि कावड यात्रेमुळे हे विदर्भातील प्रमुख धार्मिक पर्यटन केंद्र ठरत आहे.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६



## महत्त्वाचे

### अवैध देशी दारू जप्त; तरुणावर गुन्हा

**मलकापूर :** तांदुळवाडी येथील सार्वजनिक रस्त्यावर बेकायदेशीररीत्या देशी दारू बाळगणाऱ्या ३० वर्षीय तरुणावर एमआयडीसी दसरखेड पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ४०० रुपये किमतीच्या देशी दारूच्या १० बाटल्या जप्त केल्या. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एएसआय विजय टेकाडे यांना तांदुळवाडी येथे एक व्यक्ती अवैधरीत्या दारू बाळगत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष सार्वजनिक रस्त्यावर छापा टाकला. यावेळी राहुल सुभाष खोसे (वय ३०, रा. तांदुळवाडी, ता. मलकापूर) याच्याकडे वायरच्या पिशवीत ९० एमएल क्षमतेच्या देशी दारूच्या १० सीलबंद बाटल्या आढळून आल्या. प्रत्येक बाटलीची किंमत ४० रुपये असून, एकूण ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. त्यापैकी एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी सीए सॅम्पल म्हणून सील करण्यात आली. या प्रकरणी एएसआय विजय टेकाडे यांच्या फिर्यादीवरून राहुल खोसे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा क्र. १०४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला बीएनएसएस कलम ३५ (३) अन्वये सूचनापत्र देऊन जागेवरच सोडले. पुढील तपास एएसआय विजय टेकाडे करीत आहेत.

### वृद्ध महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**शेगाव :** व्यंकटेश नगर येथे ८४ वर्षीय वृद्ध महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी रोजी सकाळी उघडकीस आली. मृत महिलेचे नाव कुमुद सखाराम कुलकर्णी (वय ८४) असे आहे. त्या दीर्घकाळापासून आजारी होत्या. आजारपणाला कंटाळून त्यांनी आपल्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीत लोखंडी ग्रिलला बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी गोपाळ जमनादास राठी (वय ४६, रा. व्यंकटेश नगर, शेगाव) यांनी शेगाव शहर पोलिस ठाण्यात माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस कलम १९४ अंतर्गत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला असून पुढील तपास पोउपनिरीक्षक भामोदकर करीत आहेत.

### दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या तरुणावर गुन्हा

**खामगाव :** दारूच्या नशेत दुचाकी अनियंत्रित व बेदरकारपणे चालविणाऱ्या तरुणाविरुद्ध खामगाव शहर पोलिसांनी मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली. ही घटना जयपूर लाडे फाटा परिसरात घडली. स्वप्निल विजय माळी (२८), रा. वाडी किल्ला, पो. वाघारी, ता. जामनेर, जि. जळगाव असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिस हवालदार राहुल भागवत इंगळे हे ड्युटीवर असताना कॉल प्राप्त झाल्यानंतर पोलिस पथक व पंचासह घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी माळी हा एमएच-१९ डीएक्स-०३५४ क्रमांकाची दुचाकी अनियंत्रितपणे चालविताना आढळून आला. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता दारूच्या नशेत वाहन चालविल्याचा संशय आला. त्यानंतर शासकीय सामान्य रुग्णालय, खामगाव येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीने मद्यसेवन केल्याचा अभिप्राय दिला. याप्रकरणी पोकॉ राहुल इंगळे यांच्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात कलम १८५ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोकॉ सचिन वानखेडे करीत आहेत.

# जिल्हा बँकेसाठी मतदान; आज होणार मतमोजणी

## सहकार पॅनल विरुद्ध अजित पवार पॅनलमध्ये मुख्य लढत

अजिंक्य भारत / प्रतिनिधी

**बुलडाणा २३ :** जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदांच्या २१ पैकी उर्वरित ९जागांसाठी आज रविवारी मतदान झाले आहे. आज जिल्ह्यातील विविध भागात मतदान केंद्रावर मतदान घेण्यात आले. बुलडाण्यात आमदार संजय गायकवाड, बुलडाणा नगर पालिकेच्या नगराध्यक्षा पुजाताई गायकवाड, नगर पालिकेचे गटनेते मृत्युंजय गायकवाड, मेहकर येथे केंद्रीय आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रताप जाधव, चिखलीच्या आमदार श्वेता महाले, माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी आज मतदान केले आहे.







या आधी सहकार पॅनलच्या १२ जागांची बिनविरोध वर्णी लागली असल्याने सत्तासंपादनासाठीच्या बहुमताचे गणीत याआधीच जुळलेले दिसत असले तरी जिल्हावासियांचे लक्ष वेधले गेले आहे ते आज रविवारी होत असलेल्या मतदानाकडे. तद्वतच सहकार पॅनल व स्व. अजितदादा पवार शेतकरी परिवर्तन पॅनल मधील अटीतटीच्या लढतींकडे. बहुमत आधीच जुळले असतांना आता पुढच्या निकालाने काय फरक पडणार? त्यामुळे काही समीकरणे बदलू शकतील का?असे अनेकांना वाटत आहे.सहकार पॅनल आठ जागा, शेतकरी परिवर्तन पॅनल सात जागा आणी स्वतंत्र उमेदवार आठ जागा असे एकूण २३ उमेदवार दिसत असले तरी यापैकी दोन उमेदवारांनी माघार घेतली असल्याने ख-या अर्थाने २१उमेदवारांतच लढत झाली आहे.

## खुमगाव बुट्टीत घरफोडीचा प्रयत्न उधळला; चाकूचा धाक दाखविणारे दोघे नातेवाईकांच्या तावडीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि. २३:** तालुक्यातील खुमगाव बुट्टी येथे घरफोडीच्या प्रयत्नादरम्यान महिलेचा चाकूचा धाक दाखवून धक्का देत पळून जाणाऱ्या दोन संशयितांना नातेवाईकांनी पाठलाग करून पकडल्याची घटना शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खुमगाव बुट्टी येथील सौ. सुलोचना संजय सातव (वय ४०) या त्यांच्या सासू सुशिलाबाई पंढरी सातव यांच्या घरी जेवण घेऊन जात होत्या. त्यावेळी त्यांना त्यांचे दीर विनायक श्रीराम सातव यांच्या घरासमोर एक अनोळखी इसम उभा असल्याचे दिसले. सुलोचना सातव यांनी त्याच्याकडे चौकशी केली असता, तो मुलाला पाहण्यासाठी आल्याचे सांगून मोटारसायकलवरून पुढे निघून गेला. दरम्यान, काही क्षणांतच विनायक सातव यांच्या घरातून आणखी एक अनोळखी इसम बाहेर आला. संशय आल्याने सुलोचना सातव यांनी त्याला 'तू चोर आहेस का?' अशी विचारणा केली. यावेळी त्याने जवळील चाकू काढून सुलोचना सातव यांना धक्का दिला आणि तेथून पळ काढला. त्यानंतर दोन्ही इसम एकाच मोटारसायकलवरून पसार होऊ लागले. घटनेनंतर सुलोचना सातव यांनी घराची पाहणी केली असता घराचे कुलूप तुटलेले आणि दरवाजा उघडा असल्याचे आढळून आले. त्यामुळे घरफोडीचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच त्यांच्या नातेवाईकांनी दोन्ही संशयितांचा पाठलाग करून त्यांना पकडले. पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी पोलीस दाखल झाले. संशयितांकडील मोटारसायकलचा क्रमांक एमएच १९ एव्ही ३०५८ असल्याचे समोर आले. पकडलेल्या संशयितांची नावे अजय सुकलाल धर्मा (रा. कुवरदेव, ता. जळगाव जामोद) आणि संजय नामदेव चिंचोळकर (रा. केलपाणी, ता. अकोट) अशी आहेत. फिर्यादी सौ. सुलोचना सातव यांच्या तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी अप. क्र. ५३९/२०२६ अन्वये कलम ११५(२), ३३१(३), ३०५(), ६२ व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही- संतोष खाडे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि. २३ :** गावातील जुने मतभेद आणि दंगलीचा डाग पुसून टाकण्यासाठी सर्व समाजातील नागरिकांनी व तरुणांनी पुढाकार घेऊन एकोप्याने सण साजरे करावे कावड यात्रेला तुमच्यावर विश्वास ठेवून हवा तो मिरवणूक मार्ग मोकळा करून दिला आहे त्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका आणि सनोत्सव काळात कुणी गालबोट लावून कावसूचा भंग केला अथवा कायदा हातात घेतल्यास याचे वाईट परिणाम भोगावे लागतील असे खडे बोल उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये आयोजित शांतता समितीच्या सुनावले.

आगामी कावडयात्रा आणि ईद-ए-मिलादुन्नबी या दोन्ही सणांच्या पार्श्वभूमीवर दि. २२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७ वाजता पोलीस स्टेशनच्या सभागृहात शांतता समितीची बैठक पार पडली.ते पुढे बोलतांना म्हणाले की, गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सर्व धर्मीयांचे सण अत्यंत शांततेत व उत्साहात साजरे व्हावेत, हाच पोलीस प्रशासनाचा उद्देश असून मिरवणुकीदरम्यान ठरवून दिलेल्या मार्गांचे पालन करणे, डीजेचा आवाज मर्यादित ठेवणे आणि पोलिसांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन जनतेने प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहनही केले. ते म्हणाले की, आमचा अंत पाहू नका गावाला लागलेला संवेदनशीलतेचा कलंक पुसणे तुमच्या हातात आहे. आम्ही प्रामाणिकपणे आपणास सहकार्य करतो तसेच आपणही पोलीसांना सहकार्य करावे. कायदा हातात घ्याल तर खैर नाही तथापि अशावेळी कुणीही नंतर आमची मनधरणी केल्यास कुणालाही भीक घालता येणार नाही, माझी पाश्वभूमी बघा आणि कायदा हातात घेऊन बघा, याचे परिणाम काय होतील ते बघा असे स्पष्ट सांगितले. दरम्यान गतकाळी मोहरमच्या मीरवणूकीत उद्भवलेल्या दंगलीमुळे मोहरमसह कावड यात्रेचे मार्ग बदलण्यात आले होते. ग्रामस्थांच्या विनंतीवरून जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी मार्गबदलाचा आदेश खारीज करीत परंपरेनुसार मार्गाला परवानगी दिली आहे. तरीही काही संवेदनशील भागात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा शांतता समितीचे सदस्यांनी आपापली बाजू मांडत कावड यात्री तसेच आगामी सनोत्सव शांततेत पार पाडण्याची हमी दिली. यावेळी कावड यात्रेला परंपरागत मार्ग मिळविण्यासाठी सकारात्मक अहवाल सादर करणाऱ्या उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, ठाणेदार युवराज रबडे यांचे टाळ्या वाजवून आभार मानले. बैठकीचे सूत्रसंचालन आणि प्रस्ताविक ठाणेदार युवराज रबडे यांनी तर आभार प्रदर्शन दुय्यम ठाणेदार मेधने यांनी केले. बैठकीस शांतता समिती सदस्य, पत्रकार, कावडयात्रा मंडळाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महा वॉकेथॉन स्पर्धेत रवी इंगळेचा तृतीय क्रमांक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लाखनवाड दि. २३ :** महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने 'महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर' या स्पर्धेचे आयोजन २१ ऑगस्ट रोजी बुलढाणा येथे करण्यात आले. बुलडाणा येथील जिजाऊ स्टेडियमपासून या स्पर्धेला सुरुवात झाली. माती व पाणी संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेत श्री संत नारायण महाराज कनिष्ठ व महाविद्यालय, आंबेटाकळी येथील विद्यार्थी रवी प्रकाश इंगळे याने सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. रवीने





स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. त्याला १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले विशेष म्हणजे, रवी हा प्रकाश सदाशिव इंगळे यांचा मुलगा असून त्याचे वडील व्यवसायाने ड्रायव्हर आहेत. साधारण आर्थिक परिस्थितीतून आलेल्या रवीने आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्याने मिळविलेल्या या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

## चांगेफळ खुर्द येथे बंद घर फोडून ७१ हजारांचा मुद्देमाल लंपास

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि. २३ :** तालुक्यातील चांगेफळ खुर्द येथे बंद घराच्या दरवाजाची कडी-कोंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरातील सोन्या-चांदीचे दागिने व पितळेच्या समई असा एकूण सुमारे ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.

फिर्यादी शिवशंकर नारायण थेरोकार (वय ४२, व्यवसायसहाय्यक सरकारी अभियोक्ता, रा. चांगेफळ खुर्द, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा, ह.मु. धारूर, जि. बीड) यांच्या बंद घरात १९ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजेपासून २० ऑगस्ट रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने प्रवेश केला. चोरट्याने घराच्या दरवाजाची कडी-कोंडा तोडून तसेच लोखंडी कपाटाचा कोंडा तोडून कपाटातील सुमारे ५० हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने, २० हजार रुपये किमतीचे



सोन्याचे दागिने आणि १ हजार रुपये किमतीच्या चार पितळेच्या समई असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून तामगाव पोलीस ठाण्यात अप. क्र. २८४/२०२६, कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) बीएनएस अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा. पोलीस निरीक्षक यांच्या आदेशाने पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोपटे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## कॉलेज ऑफ मॅनेजमेंटला बी.एस्सी.डेटा.सायन्स अभ्यासक्रमाची मान्यता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि. २३ :** शहरातील नामांकित महाविद्यालय कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या बॅचलर ऑफ सायन्स इन डेटा (सायन्स) या पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाली आहे.

डेटा सायन्स हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील अत्यंत महत्वाचे व रोजगाराभिमुख क्षेत्र असून, या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना डेटा विश्लेषण, प्रोग्रामिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग तसेच आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राप्त होणार आहे. बी.एस्सी.डेटा.सायन्स, हा संगणक अनुप्रयोग क्षेत्रातील महत्वाचा पदवी अभ्यासक्रम असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर विकास, डेटाबेस, नेटवर्किंग तसेच विविध तंत्रज्ञानविषयक क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. बी.एस्सी.डेटा.सायन्स अभ्यासक्रम तीन वर्षाचा असून यासाठी १२वी उतीर्ण झालेले तसेच इंगीनीरिंग,डिप्लोमा पदवीधर विद्यार्थी प्रवेश घेऊ शकता. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट हे खामगाव मधील शिक्षण क्षेत्रातील एक महत्वची शैक्षणिक संस्था असून,महाविद्यालयात विविध उच्च शिक्षण अभ्यासक्रमांसाठी पायाभूत सुविधा व अनुभवी प्राध्यापक वर्ग उपलब्ध आहे. महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रात बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित), बी.एस्सी.डेटा.(सायन्स), एम.सी.ए इत्यादी अभ्यासक्रम गेल्या १५ वर्षापासून सुरु आहेत. याचा परिसरातील हजारो विध्यार्थ्यांना लाभ झालेला आहे. एमसीए अभ्यासक्रमाच्या उपलब्धतेमुळे खामगाव व परिसरातील विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणासाठी दूरच्या शहरांकडे जाण्याची आवश्यकता कमी होणार असून, स्थानिक पातळीवरच गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळणार आहे. या मान्यतेमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा टप्पा जोडला गेल्याची भावना विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी व्यक्त केली आहे.तरी विद्यार्थी व नोकरी करणारे विध्यार्थानी या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान संस्था अध्यक्ष माननीय तेजेंद्रसिंह चौहान,संचालिका सौ.राजकुमारी तेजेंद्रसिंह चौहान,प्राचार्य डॉ. डी.एस.रामटेके, उपप्राचार्य कोम मन्त्री केंद्रसंयोजक प्रा.सुदाम जाधव, सौ.मंगला बोराडे यांनी केले आहे.

**आयोजन** 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरला' उत्स्फूर्त प्रतिसाद

## सुरक्षित भविष्य घडवा; जलसंवर्धनासाठी लोकसहभाग आवश्यक - आ.गायकवाड

अंजिक्य भारत / प्रतिनिधी

**बुलडाणा दि. २३ :** पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरविणे, पाणी वाहून जाऊ न देता त्याचे योग्य नियोजन करणे आणि जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागाची जोड देणे आवश्यक आहे. पाणी, निसर्ग आणि पर्यावरणाचे संवर्धन झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहील, असे प्रतिपादन आमदार संजय गायकवाड यांनी केले.



जिजामाता प्रेक्षागार क्रीडा संकूल येथे जलसंधारण दिनानिमित्त आयोजित 'महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर' रॅलीला हिरवी झेंडी दाखविल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी अजिंक्य घोडके, राजेंद्र पोळ, समाधान गायकवाड, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, मृद व जलसंधारणचे कार्यकारी अभियंता अमोल मुंडे, उपअभियंता अमोल जाधव, मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे सांगून आ. गायकवाड म्हणाले की, पाण्याशिवाय निसर्ग आणि निसर्गाशिवाय मानवी जीवन शक्य नाही. त्यामुळे जलसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शासनाच्या जलसंधारणाच्या प्रयत्नांना नागरिकांनी सहकार्य करून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच प्रत्येकाने पिंपळ, वड, पिंपरी यांसारखी निसर्गपूरक किमान पाच झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. आ गायकवाड पुढे म्हणाले की, बुलडाणा व मोताळा क्षेत्रात नदी-नाल्यांचे खोलीकरण, जलसाठ्यांची निर्मिती, रिचार्ज स्ट्रक्चर आणि पाणी अडविण्याच्या विविध उपाययोजनांमुळे भूजल पातळी सुधारण्यास मदत झाली आहे. पाणी अडविल्यानंतर त्याच्या परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीतही वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. महावॉकथॉनच्या माध्यमातून पाणी वाचवा, पाणी अडवा आणि पाणी जमिनीत जिरवा, हा संदेश जनमनसात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढल्यास आगामी काळात जिल्ह्याला दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आमदार गायकवाड यांनी व्यक्त केला.

**जलसंवर्धनाची शपथ**

महावॉकेथॉनच्या माध्यमातून 'पाणी वाचवा, पाणी अडवा आणि पाणी जमिनीत जिरवा' हा संदेश जनमानसात पोहोचविण्यात आला. कार्यक्रमात सहभागी मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी जलसंवर्धनाची शपथ घेतली. जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग वाढविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्या साधून आयोजित महा वॉकेथॉनला बुलडाणाकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिजामाता क्रीडा संकुल येथून रॅलीला सुरुवात झाली. तहसील चौक, चिंचोले चौक मार्गे पुन्हा जिजामाता क्रीडा संकुल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

## गो. से. महाविद्यालयात शैक्षणिक कार्यभार निश्चितीवर जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खागगाव दि. २३ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० (-२०२०) च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालयीन शिक्षकांचा शैक्षणिक कार्यभार निश्चित करणे, त्याचे नियोजन व नियमन याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे बुलडाणा जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.





संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या तत्वावधानाखाली तसेच गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयातील स्व. शंकरराव बोबडे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर होते. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून विद्वत परिषदेचे सदस्य तथा रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. हेमंत चांडक उपस्थित होते. व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. डी. एन. व्यास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. डी. एन. व्यास यांनी उपस्थित मान्यवर, प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापिकांचे स्वागत करून कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० मुळे उच्च शिक्षण क्षेत्रात अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, क्रेडिट प्रणाली, विविध शैक्षणिक उपक्रम तसेच शिक्षकांच्या कार्यभार नियोजनामध्ये महत्वपूर्ण बदल झाले आहेत. या बदलांच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांचा शैक्षणिक कार्यभार योग्य पद्धतीने निश्चित करणे व त्याचे नियमन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. हेमंत चांडक यांनी शैक्षणिक कार्यभार निश्चितीच्या विविध तांत्रिक व प्रशासकीय बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अशा मार्गदर्शनपर कार्यशाळांचे महत्व अधोरेखित केले. या कार्यशाळेसाठी बुलढाणा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक, एनईपी सेल समन्वयक, कार्यभार निर्धारण व नियमनाशी संबंधित समन्वयक तसेच ज्येष्ठ प्राध्यापक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुलढाणा जिल्ह्यातून शंभरहून अधिक प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापिकांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. सुभाषजी बोबडे, उपाध्यक्ष मा. प्रकाशजी तांबट, सचिव मा. डॉ. प्रशांतजी बोबडे तथा कोषाध्यक्ष मा. अजिंक्यदादा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात 'शैक्षणिक कार्यभार निश्चिती' या विषयावर जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**महत्त्वाचे**

## वृद्ध कलावंत मानधन समितीवर पंजाबराव देशमुख

**खामगाव :** महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या बुलडाणा जिल्हा वृद्ध कलावंतांच्या मानधन समितीवर अशासकीय सदस्य म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस जनसंपर्क कार्यालय येथे मा. आ. दिलीपकुमार सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. वृद्ध कलावंतांनी आपल्या कलेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन केले आहे. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना शासनाच्या माध्यमातून मानधन व विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वृद्ध कलावंत मानधन समितीची भूमिका महत्वपूर्ण आहे. अशा महत्वाच्या समितीवर पंजाबरावदादा देशमुख यांची सदस्य म्हणून निवड झाल्याने कलावंतांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळण्यासोबतच त्यांच्या अडचणी शासनदरबारी प्रभावीपणे मांडल्या जातील असे सांगुन पंजाबरावदादा देशमुख यांचा सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेता त्यांची ही निवह महत्वपूर्ण मानली जात आहे. त्यांच्या माध्यमातून बुलडाणा जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांच्या समस्या, मागण्या आणि हक्कांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी निश्चितच प्रयत्न करतील असा विश्वास- सानंदांनी व्यक्त केला. यावेळी सत्कारमुर्ती पंजाबरावदादा देशमुख - म्हणाले की, माझी बुलडाणा जिल्हा वृध्द -कलावंत मानधन समितीच्या सदस्यपदी निवड झाल्यामुळे त्या संधीच मी सोनं करेल जिल्ह्यातील कलावंतांना न्याय देण्यासाठी सदैव कटीबध्द राहिल तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी मी पुर्ण शक्तीनिशी प्रयत्न करेल असे त्यांनी यावेळी सांगितले.

## हनवतखेड शिवारात बकरी गिळलेल्या अजगराला ठेचले

**खामगाव :** तालुक्यातील हनवतखेड शिवारात बकरी गिळलेल्या सुमारे १२ फूट लांबीच्या अजगराला जमावाने दगडांनी ठेचून मारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेचे चित्रीकरण समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर वन विभागाने अज्ञात व्यक्तींविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. हनवतखेड शिवारात १९ ऑगस्ट रोजी चराणाऱ्या कळपातील एक बकरी बेपत्ता झाली होती. तिचा शोध घेत असताना ग्रामस्थांना पोट फुगलेल्या अवस्थेत अजगर आढळला. अजगराने बकरी गिळल्याचा संशय आल्याने जमावातील काहींनी त्याच्यावर दगडांनी हल्ला केला. त्यानंतर अजगराचे पोट कापून मृत बकरी बाहेर काढण्यात आल्याचे व्हायरल व्हिडीओत दिसत असल्याची माहिती वन विभागाने दिली. या चित्रफितीची दखल घेत वन विभागाने वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२मधील कलम ९ अन्वये अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविला. मृत अजगराचे शवविच्छेदन केले.

## जि.प. मराठी उच्च प्राथमिक शाळा कोलोरी येथे मंत्रिमंडळ गठीत

**खामागाव :** लोकशाहीची प्रत्यक्ष ओळख व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांसह शिस्त व जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा कोलोरी (ता. खामगाव) येथे प्रत्यक्ष निवडणूक मतदान प्रक्रियेद्वारे शालेय मंत्रिमंडळ गठीत करण्यात आले. या निवडणुकीत सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने मतदानाचा हक बजावला. यात मुख्यमंत्री म्हणून रोहन इंगळे तर उपमुख्यमंत्री म्हणून प्रक्षिक गुडदे यांची निवड झाली. नवनिर्वाचित शालेय मंत्रिमंडलामध्ये मुख्यमंत्री, रोहन इंगळे, उपमुख्यमंत्री प्रक्षिक गुडदे, सांस्कृतिक मंत्री वेदिका टिकार, शिक्षण व आरोग्य मंत्री समीक्षा गुडदे, गृह मंत्री सानिका टिकार, पर्यावरण मंत्री सम्यक तायडे, बालविकास मंत्री अपर्णा टिकार या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. टेंभुर्णा केंद्राचे केंद्र समन्वयक डॉ. श्याम देवकर यांच्या मार्गदर्शनात उद्यश्रेणी मुख्याध्यापक आजम खान पठाण, शिक्षक विकास कोमटे, राम नेवरे, अमोल कावणे आणि रेणू अलकरी यांनी या संपूर्ण मतदान प्रक्रियेचे यशस्वी आयोजन केले.

# खामगाव येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि. २३ :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), बुलडाणा, कृषी विज्ञान केंद्र, जळगाव जामोद आणि रोटरी क्लब, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी सभागृह येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

महोत्सवाचे उद्घाटन खामगावच्या नगराध्यक्षा श्रीमती अपर्णा सागर फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोदचे प्रमुख डॉ.विकास जाधव, रोटरी क्लबचे रो. समीर संचेती, रो. विनायक सावजी, रो. विनीत लोडाया, दीपक बुटे, नगरसेविका नीलिमा ढोरे, प्रमोद अग्रवाल, शर्मा यांच्यासह शेतकरी, महिला शेतकरी गट, आदिवासी बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांनी रानभाज्या हा आजी-आजोबांच्या काळापासून चालत आलेल्या पारंपरिक आहाराचा महत्वपूर्ण ठेवा असल्याचे सांगितले. पावसाळ्याच्या सुरुवातीला ग्रामीण भागातील कुटुंबामध्ये विविध रानभाज्यांचा आहारात आवर्जून समावेश केला जात असे. या भाज्यांमधून शरीराला आवश्यक पोषक घटक मिळत असल्याने पारंपरिक आहारपद्धतीचे महत्व आजही कायम आहे. फास्ट फूडच्या वाढत्या प्रभावाच्या काळात नव्या पिढीला रानभाज्यांची ओळख करून देणे गरजेचे असून, प्रत्येक कुटुंबाने वर्षातून किमान एकदा तरी रानभाज्यांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी रानभाज्यांचे ग्रामीण अर्थव्यवस्था, आदिवासी शेतकरी आणि पारंपरिक शेतीशी असलेले नाते स्पष्ट केले. कृषी विभागाच्या माध्यमातून दरवर्षी रानभाज्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण व आदिवासी भागातील पारंपरिक ज्ञान शहरी नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. डॉ. विकास जाधव यांनी रानभाज्यांचे आहारातील महत्व सांगताना प्रत्येक भाजीची योग्य ओळख पटवूनच तिचे सेवन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. रानभाजी तयार करताना स्वच्छता आणि शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. महोत्सवात विविध शेतकरी गटांनी रानभाज्यांचे प्रदर्शन मांडले. महात्मा फुले, बळीराजा, अभिनव आणि नवचैतन्य शेतकरी गटांसह हेलगे, पारखेड, जनुना, सलाईबन, पिंपळगाव राजा आदी भागातील शेतकरी व आदिवासी बांधव सहभागी झाले. अकोला जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांनीही विविध पारंपरिक रानभाज्या प्रदर्शनासाठी आणल्या. महिला शेतकरी बचत गटांनी रानभाज्यांपासून तयार केलेल्या विविध पारंपरिक खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. नागरिकांनी या स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद देत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी रानभाज्यांवरील विशेष पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले तसेच सहभागी शेतकरी व आदिवासी बांधवांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. पारंपरिक आहार, स्थानिक जैवविविधता आणि शेतकरी आदिवासी बांधवांच्या ज्ञानाचा वारसा जतन करण्यासोबतच रानभाज्यांना बाजारपेठ व व्यापक ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने हा महोत्सव महत्वपूर्ण ठरला.

## जिल्हा सहकारी बँक संचालक पदासाठी १४१ पैकी १३९ मतदारांचे मतदान



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि. २३ :** जिल्हा सहकारी बँकेच्या उर्वरित नऊ संचालक पदासाठी आज मेहेकर येथे श्री शिवाजी विद्यालय मतदान केंद्रात एकूण १४० पैकी १३९ मतदारांनी मतदान केले. मतदान प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडली.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत २१ पैकी १२ संचालक अविरोध निवडून आलेले असून उर्वरित नऊ संचालक पदासाठी आज मतदान झाले. इतर सहकारी संस्था मतदार संघ, इतर मागासवर्गीय मतदार संघ, कृषी पतपुरवठा संस्था संग्रामपूर व लोणार मतदार संघ, नागरी सहकारी बँक मतदारसंघ, अनुसूचित जाती जमाती मतदारसंघ आणि महिलांसाठी राखीव असलेल्या दोन जागांसाठी आज मतदान झाले. सहकार पॅनल व शेतकरी परिवर्तन पॅनल यांचे उमेदवार रिंगणात होते. अनुसूचित जाती जमाती मतदार संघासाठी माजी आमदार संजय रायमुलकर मेहकर हे उमेदवार होते. त्यांच्यासह केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राजश्री प्रताप जाधव, बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी मतदान केले. मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून पी बी कस्तुरे यांनी काम पाहिले.

## चिंचपूर येथे शालेय व्यवस्थापन समिती गठीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. २३ :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दिनांक २१ ऑगस्ट रोजी विशेष पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शासन आदेशान्वये दर दोन वर्षांनी शालेय व्यवस्थापन समिती नव्याने स्थापन करण्यासाठी पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी वर्ग १ ते ७ पर्यंतच्या वर्गातून ठरलेल्या आरक्षणावरून एकूण ११ सदस्यांची पालकांच्या सहमतीने निवड करण्यात आली. व ठरलेल्या ११ सदस्य मधूनच अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड मतदान पद्धतीने करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी कपिल त्र्यंबक गवारगुरु, तर उपाध्यक्षपदी शेख अहमद शेख कासम यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या समितीमध्ये सदस्य सौ.सरला गणेश अंभोरे, सौ. जयश्री शत्रुघ्न क्षीरसागर, सौ.इंदु राजुदास राठोड, सौ.सरिता उमेश चापाइत, सौ.शारदा राजेंद्र वाळके, सौ.वैशाली नागेश गवारगुर, संतोष रामराव राठोड, अब्दुल शाह राऊत शा, अनिल अशोक कदम, तर शालेय व्यवस्थापन समितीच्या शिक्षण तज्ञ पदी पत्रकार विनोद देशमुख यांची अविरोध निवड करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस.जे. जगताप, शाळेचे माजी सभापती गणेश आंभोरे, शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी, गावातील असंख्य नागरिक व पालक वर्ग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेट्रोल टाकून अर्टिका कार जाळली; पती-पत्नीवर गुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**नांदुरा दि. २३ :** वडनेर भोलजी येथील हरी ओम नगर येथे घरासमोर उभी असलेली अर्टीका कार पेट्रोल टाकून जाळल्याची घटना दिनांक १४ ऑगस्टला रात्री १.३० वाजता दरम्यान घडली. याबाबत फिर्यादी सुनील शालिग्राम कुयटे राहणार वडनेर भोलजी यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

त्यानुसार त्यांनी रवी शंकर सोनाग्रे यांच्याकडून अर्टिका कार एम एच १२ टीके ५४५१ विकत घेतली होती. त्यानंतर फिर्यादी कडून आरोपी अधिकची पन्नास हजार रुपयांची मागणी करत होता. परंतु फिर्यादीने रक्कम देण्यास दिली नाही म्हणून आरोपी व त्याची पत्नी अर्चना रवि सोनाग्रे राहणार हिंगणे गव्हाड यांनी संगणमत करून अर्टिका कार पेट्रोल जाळून टाकली. त्यामध्ये फिर्यादीचे तेरा लाख रुपयाचे नुकसान झाले. आरोपी एवढ्यावरच न थांबता फिर्यादीला जिवे मारण्याची धमकीही दिली. फिर्यादीने दिनांक १८ ऑगस्टला दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रवि शंकर सोनाग्रे व अर्चना रवी सोनाग्रे यांच्या विरुद्ध ६(फ),३५१(२),३५१(३),३(५) कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकॉ नवाज शेख करीत आहे.

## मोलकरणीने सोन्याच्या पोथीसह एक लाख वीस हजाराचा मुद्देमाल केला लंपास

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नादुंरा दि. २३ :** डागा ऑइल मिल परिसरात वास्तव्यास असलेल्या घरातील कपाटातून रोख ४५ हजार रुपये व सोन्याची पोथीसह एक लाख वीस हजार रुपयांचा मुद्देमाल मोलकरीणने लंपास केल्याची घटना दिनांक १५ जुलैला सकाळी ११ वाजे दरम्यान घडली.

याबाबत फिर्यादी रेणू राकेश डागा राहणार डागा ऑइल मिल यांनी पोलीस स्टेशनला दिनांक २२ ऑगस्टला तक्रार दिली. त्यानुसार त्यांच्या जेठाचे निधन झाले असुन धार्मिक विधी करीता त्यांच्या पतीचे नेहमी बाहेर येणे जाणे सुरू होते. या धावपळीत त्यांनी कपाटात रोख ४५ हजार रुपये व तुळशी माळेच्या मण्याची पोथ वजन १५ ग्रॅम किंमत ७५ हजार रुपये कपाटात ठेवले होते. त्यानंतर कपाटात ठेवलेली रोख रक्कम व सोन्याची पोत दिसून आली नाही. त्यांनी कुटुंबातील व्यक्ती व घरातील मोलकरीणकडे चौकशी केली असता नकार दिला. परंतु सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता त्यामध्ये काम करणारी मोलकरीण शारदा तायडे खोलीमधुन परत येत असताना पेपर मध्ये पैशाचे बंडल ठेवताना दिसली. त्यामुळे कपाटात ठेवलेले ४५ हजार रुपये व एक तुळशी मन्याची सोन्याची पोत पंधरा ग्रॅम किंमत ७५ हजार रुपये असा एक लाख वीस हजार रुपयांचा मुद्देमाल घरात काम करणाऱ्या मोलकरीणने चोरून नेल्याचे खात्री झाली आली. फिर्यादी रेणू डागा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मोलकरीण शारदा अनंता तायडे राहणार नांदुरा हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०६ कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकॉ सैय्यद करीत आहे.

## शर्वरीची तलवार तळपली राज्यस्तरावर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२३ :** परभणी येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये , कु. शर्वरी मीना प्रवीण मिसाळ हिने बुलडाणा जिल्ह्याच्या वतीने फेन्सिंग (इप्पी), या खेळामध्ये, राज्यस्तरावर सिल्वर मेडल पटकावले आहे. बुलडाणा जिल्ह्यासाठी ही मोठी अभिमानाची गोष्ट असल्याने शर्वरीच्या जिद्द व चिकाटीची सर्वत्र चर्चा होत आहे.

विशेष म्हणजे पुढे होणाऱ्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा जम्मू काश्मीर येथे आयोजित करण्यात येणार आहे, या स्पर्धेसाठी देखील शर्वरी मिसाळ ची निवड झाली आहे. त्यासोबतच अक्षरा पांडव, आरोही क्षीरसागर या विद्यार्थिनीने देखीत कास्यपदक पटकावले असून बुलढाण्याचा डंका या स्पर्धेत गाजविला आहे. शर्वरी ही शिवसेना नेते कै शांताराम जगताप यांची नात आहे. या यशामध्ये तिची आई मीना मिसाळ(जगताप) वडील प्रविण मिसाळ यांचा सिंहाचा वाटा असून, तिचे कोच, आकाश बनसोड सर, बुलडाणा तलवारबाजी असोसिएशन, शेषनारायण लोढे (सचिव बुलडाणा तलवारबाजी असोसिएशन तसेच राज्य शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त शिक्षक;शिवश्री शिवाजी राजे जाधव (अध्यक्ष बुलडाणा जिल्हा तलवारबाजी असोसिएशन), मयूर पाटील बाहेकर (उपाध्यक्ष), नितीन पाटील जेऊघाले (सहसचिव) यांचा सुद्धा खूप मोठा वाटा आहे, कारण या सर्व लोकांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना तलवारबाजी स्पर्धेसाठी तयारी करण्यासाठी स्वतः मेहनत घेऊन तलवारबाजी स्पर्धेसाठी कमी खर्चात जिल्हा तलवारबाजी केंद्र उभारले, त्यातून मेहनतीने खेळाडू तयार केले, त्यामुळे त्यांचा पाठिंबा सुद्धा खूप महत्वाचा आहे.

**निसर्ग** सातपुड्याच्या कुशीत निसर्गाच्या सिव्हिल इंजिनियरची लगबग

# अंबा बरवा अभयारण्यात सुगरणींच्या घरट्यांचे विणकाम सुरु

अंजिक्य भारत / प्रतिनिधी



**संग्रामपूर दि. २३ :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या प्रसिद्ध अंबा बारवा अभयारण्यामध्ये निसर्गाचा कुशल सिव्हिल इंजिनियर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुगरण पक्ष्याने घरटे बांधण्यास सुरुवात केली आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे वनपरिक्षेत्र अधिकारी सोनाळा अजय बावणे यांनी दिली आहे. सुगरण हा पक्षी आपल्या अत्यंत सुंदर आणि कौशल्यपूर्ण घरट्यासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या विणकाम कौशल्यामुळेच मराठीत त्याला सुगरण म्हणजे सुघड किंवा कुशल विणकर म्हटले जाते.

सुगरण पक्षाला पक्षांचा इंजिनियर विनाकारण म्हटले जात नाही. सुगरणीचे थक्क करणारे इंजिनियरिंग नेमके काय आहे. स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग घरटे बांधताना तो नेहमी पाण्याच्या वर लटकणाऱ्या किंवा बाभळीसारख्या काटेरी झाडांच्या टोकाच्या फांद्या निवडतो. यामुळे साप किंवा खार यांसारखे शत्रू तिथपर्यंत पोहोचू शकत नाहीत. घरट्याची सुरुवात करताना तो फांदीभोवती गवताचे लांब दोरे अत्यंत घट्ट गाठी मारून गुंफतो जेणेकरून वादळ-वाऱ्यातही घरटे खाली पडत नाही. मटेरिअल सिलेक्श सुगरण पक्षी वाळलेले गवत वापरत नाही; तो ओल्या, ताज्या आणि लांब गवताच्या काड्या किंवा नारळाच्या पानांच्या बारीक पट्ट्या चोचीने कापून आणतो. ओले गवत वाळल्यानंतर आकुंचन पावते आणि घरट्याची वीण अधिक घट्ट व दणकट होते. काउंटर-वेट आणि एरोडायनॅमिक घरटे पूर्ण होत आल्यावर सुगरण पक्षी आतल्या बाजूला ओल्या मातीचे वा चिखलाचे गोळे लावून ठेवतो. ही माती वाळल्यावर घरट्याला वजन मिळते, ज्यामुळे जोरदार वाऱ्यात घरटे हेलकावे खाताना उलटून जात नाही. विणकाम इतके घट्ट असते की बाहेर कितीही पाऊस असला तरी आत पाणी शिरत नाही. सेफ्टी इंजिनियरिंग घरट्यामध्ये आत जाण्यासाठी तो खालच्या बाजूने लटकणारी एक अरुंद नळी / बोगदातयार करतो. यामुळे आत बसलेल्या मादीला आणि पिलांना बाहेरून कोणताही शिकारी पक्षी पाहू शकत नाही. सध्या अभयारण्यात अशी शेकडो घरटी विणण्याचे काम सुरू असून हे दृश्य पर्यटकांसाठी मोठे आकर्षण ठरत आहे. ना कोणती स्केल, ना मोजपट्टी, ना सिमेंट-रेती केवळ निसर्गाने दिलेली बुद्धिमत्ता आणि प्रचंड परिश्रमांच्या जोरावर सुगरण पक्षी टांगते, मजबूत आणि १००% सुरक्षित घरटे उभारतो. या कालावधीत नागरिकांनी पक्ष्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी अजय बावणे यांनी केले आहे.

## बोरखेडच्या प्रीतीची एमपीएससी परीक्षेत दमदार कामगिरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**संग्रामपूर दि. २३ :** महागड्या खासगी शिकवणीचा आधार न घेता घरच्या घरी अभ्यासाचे योग्य नियोजन करत बोरखेडच्या प्रीती घाटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले आहे. दररोज ८ ते १० तास नियमित अभ्यास, विषयानुसार नियोजन आणि सातत्यापूर्ण मेहनत यामुळे त्यांनी हे यश संपादन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांची ही कामगिरी निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.

तालुक्यातील बोरखेड येथील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील प्रीती संजय घाटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या कुटुंबासह गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. राज्य शासनाच्या वित्त विभागातील राज्यकर निरीक्षक तसेच दुय्यम निबंधक या दोन महत्वाच्या पदांसाठी त्यांची निवड झाली आहे. एकीकडे अनेक मुले पैशाचा चुराडा करून मोठ मोठ्या शहरात वेगवेगळ्या क्लासेसला दिवसरात्र परिश्रम करत राहतात, तरीही त्यांच्या पदरी यश पडत नाही. तर दुसरीकडे कोणत्याही खासगी शिकवणी किंवा क्लासचा आधार न घेता प्रीती यांनी घरच्या घरी नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यास करत हे यश मिळविले. दररोज तब्बल ८ ते १० तास अभ्यासाचे सातत्य राखत त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. अभ्यासातील सातत्य, योग्य नियोजन,आत्मविश्वास आणि ध्येय गाठण्याची जिद्द या जोरावर त्यांनी कठीण स्पर्धेत आपले स्थान निर्माण केले. प्रीती यांनी आपल्या कामगिरीतून मागासवर्गीय प्रवर्गातून राज्य स्तरावर तिसरा क्रमांक मिळविण्याचा बहुमानही पटकावला आहे. १७ मे २०२५ रोजी त्यांनी राज्यकर निरीक्षक पदासाठी परीक्षा दिली होती. त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत त्यांनी सातत्यपूर्ण कामगिरी करत दोन्ही पदांवर निवडीची संधी मिळविली. शेतकरी कुटुंबातील परिस्थितीशी संघर्ष करत उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रीती यांचा हा प्रवास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. प्रीती घाटे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ऑगस्ट रोजी बोरखेड येथे ग्रामस्थ व समाजबांधवांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलीने मिळविलेल्या या यशामुळे बोरखेडसह संपूर्ण संग्रामपूर तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रतिकूल परिस्थितीला न घाबरता ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते, असा संदेश प्रीती घाटे यांच्या यशातून मिळतो. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे आणि उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून तयारी करावी, यासाठी त्यांचा संघर्षमय प्रवास प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही प्रशासकीय सेवेत उत्कृष्ट कार्य करण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, सोमवार २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### पारधी बेड्यावर पोलिसांची धाड

अमरावती : फ्रेजरपुरा पोलिसांनी पारधी बेडा, राजुरा येथे अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई केली. त्याच्या ताब्यातून अंदाजे १ हजार ४० रुपयांची देशी दारू जप्त करीत गुन्हा नोंदवला. स्वप्निल नजुल भोसले (२०) असे गुन्हा नोंद झालेल्या युवकाचे नाव आहे.

### शासकीय कामात आणला अडथळा

अमरावती : गाडगेनगर हद्दीतील चौधरी चौक ते लेखुमल चौक परिसरात १९ ऑगस्ट रोजी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन कारवाईदरम्यान वाद निर्माण झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, हातगाड्या जप्त करताना तिघांनी ४० ते ५० जणांना जमवून कारवाईत अडथळा आणला तसेच सुमारे दोन तास विलासनगर रस्ता बंद केला. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध बीएनएसच्या कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

### शहरात विविध घटनांमध्ये चौघांचा मृत्यू

अमरावती : कोंडेश्वर तलावात बुडून पंकज दिनेश मोरवाल (३०, रा. विलास नगर) यांचा मृत्यू झाला. ते १७ ऑगस्ट रोजी कोंडेश्वर येथील नातेवाईकाकडून अमरावतीला जात असल्याचे सांगून निघाले होते. १९ ऑगस्ट रोजी त्यांचा मृतदेह तलावात आढळला. मलकापूर येथील नरेंद्र निळकंठ इंगळे (५८) यांनी विष प्राशन केल्याने उपचारादरम्यान २० ऑगस्ट रोजी मृत्यू झाला. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी मर्ग नोंदविला. नांदगाव पेठ येथील मारवाडीपुरा परिसरातील रहिवाशी नारायणराव पांडुरंग कापडे (७८) यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याने त्यांचा मृत्यू झाला चौथ्या घटनेत भातकुली तालुक्यातील बहादूरपूर येथील विश्वनाथ सोमाजी हिरखन (६५) यांनी शेतातील झाडाला गळफास घेतला. त्यांना ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. भातकुली पोलिसांनी मर्ग नोंदविला आहे.

# शिक्षणाधिकारी कार्यालयात असंतोष

## कर्मचाऱ्यांनी घेतली सामूहिक रजा : वरिष्ठांकडे लेखी तक्रार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. मागील काही दिवसांपासून शिक्षण विभागात अधिकारी आणि कर्मचारी, असा सामना रंगला आहे. कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेतल्याने माध्यमिक शिक्षण विभागाच्या कामकाजावर परिणाम झाला आहे. कामाचा अतिरिक्त दबाव व वरिष्ठांकडून अधिकार क्षेत्राबाहेरील कामे सांगितली जात असल्याचा आरोप काही कर्मचाऱ्यांनी या तक्रारीमध्ये केला आहे. कर्मचाऱ्यांच्या मते, कार्यालयीन कामकाजाचे वाटप करताना स्पष्ट लेखी आदेश दिले जात नसल्याने जबाबदारी निश्चित करण्याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. काही कामे तोंडी स्वरूपात सांगितली जात असून, ती निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी दबाव आणला जात असल्याचीही तक्रार कर्मचाऱ्यांची आहे. काम पूर्ण न झाल्यास कठोर शब्दांत विचारणा केली जाते. त्यामुळे कार्यालयात मोकळेपणाने काम करणे कठीण झाल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

परिणामी काही कर्मचारी रजेवर गेल्याने कामाचा अतिरिक्त भार इतर कर्मचाऱ्यांवर पडला आहे. मागील काही दिवसांत विभागातील अनेक कर्मचारी वैद्यकीय,



अर्जित किंवा अन्य प्रकारच्या रजेवर गेले आहेत.

त्यामुळे कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून, दैनंदिन प्रशासकीय कामकाजासह शिक्षकांच्या सेवाविषयक प्रकरणांच्या निपटाऱ्यावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वेतननिश्चिती, सेवानिवृत्तीविषयक प्रस्ताव, शिक्षकांची मान्यता, पदोन्नती, न्यायालयीन प्रकरणे, वैद्यकीय देयके आणि इतर सेवाविषयक प्रस्तावांसाठी जिल्हाभरातील शिक्षक व कर्मचारी माध्यमिक शिक्षण विभागाशी नियमित संपर्क साधतात. कर्मचारी अनुपस्थितीचे प्रमाण वाढल्यास अशा प्रकरणांच्या निपटाऱ्यास विलंब होऊन त्याचा थेट परिणाम शिक्षक व कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी करावी.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्रपणे बाजू ऐकून घ्यावी; कर्मचाऱ्यांच्या रजेची कारणे, कामाचे वाटप आणि कार्यालयीन आदेशांची पडताळणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही कर्मचारी किंवा अधिकाऱ्याविषयी पूर्वग्रह निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचीही गरज व्यक्त केली जात आहे.

नियमित पदाशी आणि कार्यविवरणाशी संबंधित नसलेली कामे देण्यात येत असतील तर त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे स्पष्ट लेखी आदेश देण्यात यावे. संबंधित काम कोणत्या नियमांतर्गत व कोणत्या अधिकाऱ्याच्या आदेशाने सोपविण्यात आली, हेही नमूद करण्यात यावे, अशी मागणी कर्मचारीवर्गातून होत आहे. तोंडी आदेशांमुळे भविष्यात प्रशासकीय किंवा आर्थिक जबाबदारी निश्चित करताना कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली.

> शिक्षण विभागात कामाची अधिक पेंडन्सी असल्यामुळे मी काही कर्मचाऱ्यांना शनिवारी व रविवारी सुटीच्या दिवशीसुद्धा कार्यालयात बोलविते, त्यामुळे त्यांची मानसिकता खराब झाली असावी. मात्र त्यांना कुठलीही नियमबाह्य कामे सांगितली जात नाहीत, तर कार्यालयीन रखडलेली कामेच पूर्ण करण्यास सांगितले आहे. काही कर्मचारी रजेवर गेल्याची माहिती आहे.
>
> **प्रिया देशमुख,**
> **शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जि. प. अमरावती.**

# पडक्या विहिरीत आढळला युवकाचा मृतदेह

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तिवसा, दि. २३ :** गुरुदेव नगर येथील मंजुळा माता नगरातील शुभम अरुण राऊत (वय २७) याने गुरुवार, २० ऑगस्ट रोजी रात्री दिंडेकर लेआऊट परिसरातील पडक्या विहिरीत उडी घेतल्याची दुर्दैवी घटना घडली. जिल्हा शोध व बचाव पथकाने रात्रभर शोधमोहीम राबविल्यानंतर शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी सकाळी शुभमचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. शुभम मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. कष्टाळू आणि मनमिळाऊ स्वभावामुळे तो परिसरात परिचित होता. विशेष म्हणजे २० ऑगस्ट रोजीच त्याचा वाढदिवस होता.



वाढदिवशीच त्याचा जीवनप्रवास संपल्याने कुटुंबीय, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. शुभमच्या पश्चात आई-वडील, बहीण आणि मोठा आप्तपरिवार आहे. या घटनेने राऊत कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून गुरुदेव नगर परिसरात शोककळा पसरली आहे. त्याने हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणातून उचलले, हे अद्याप स्पष्ट झालेले नसून तिवसा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. बुडालेल्या शुभमचा डीडीआरएफ पथकाला शोध माहिती मिळताच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे डीडीआरएफ पथक सकाळी ८.२० वाजता घटनास्थळी दाखल झाले. गोताखोरांनी गळाच्या सहाय्याने विहिरीत शोधमोहीम सुरू केली.

जुनी विहीर असल्याने त्यात मोठ्या प्रमाणात गाळ व काडीकचरा साचला होता. अवघ्या दहा मिनिटांत लोखंडी गळाला शुभमचा मृतदेह लागला. पुढील कारवाईसाठी मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. या शोधकार्यात सचिन धरमकर, आकाश निमकर, मुकेश सदाशिव, गणेश कासदेकर, मनीष उताणे यांनी सहभाग घेतला. शोधकार्यात तिवसा पोलिसांचे सहकार्य लाभले.

# अत्याचार प्रकरणी नराधमाला २० वर्षे कारावास

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २३ :** जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला २० वर्षांच्या सश्रम कारावासाची आणि १८,००० रुपये दंडाची कठोर शिक्षा सुनावली आहे. प्रदीप लक्ष्मणराव जामनिक (वय ३६ वर्षे, रा. गायवाडी) असे शिक्षापात्र आरोपीचे नाव आहे.



दुसरीत शिकणारी पीडित मुलगी तिच्या आजी-आजोबांसोबत राहत होती. आजी शेतात कामाला आणि आजोबा बाजारात गेले असताना, मुलगी घरात एकटीच होती. आजोबा बाजारातून परत आल्यावर पीडिता अस्वस्थ अवस्थेत पलंगावर आढळली दवाखान्यात घेऊन जात असताना तिच्या शरीरातून रक्तस्राव होत असल्याचे आजोबांच्या लक्षात आले. पीडितेने दीपक उर्फ दिपू जामनिक या आरोपीने तिच्यावर अत्याचार करून तिचा गळा आवळल्याचे सांगितले.

२ जानेवारी २०२० रोजी घडलेल्या या घटनेत आजोबांच्या तक्रारीवरून दर्यापूर ठाण्यात आरोपीविरुद्ध बलात्कार, जिवे मारण्याचा प्रयत्न, घरात अनधिकृत प्रवेश आणि पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक प्रिया उमाळे यांनी प्रकरणाचा सखोल तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. सुरुवातीला अचलपूर अतिरिक्त सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. २५ जुलै २०२५ रोजी दर्यापूर येथे अतिरिक्त सत्र न्यायालयाची स्थापना झाल्यामुळे हा खटला दर्यापूर न्यायालयात वर्ग करण्यात आला. सरकारी पक्षातर्फे सुनावणीदरम्यान सहाय्यक सरकारी वकील अ‍ॅड. जी.ए. विघोरे व अ‍ॅड. दिलीप तिवारी यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडत १० साक्षीदार तपासले. पीडितेसह इतर साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पीडित बालिकेची साक्ष अत्यंत निर्णायक ठरली.

# घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## सहा आरोपींना अटक: गुन्हेशाखेची कारवाई

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**परतवाडा, दि. २३ :** बंद घरांवर पाळत ठेवून घरफोडी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश करून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

१८ ऑगस्ट रोजी न्यायधिश मोहम्मद सादीक मोहम्मद उमर (६५) रा. सिव्हील लाईन परतवाडा यांच्या घराच्या दाराचा कुलूपकोंडा तोडून आतील कपाटाच्या तिजोरीतील ५ तोळे सोन्याचा नेकलेस, २ तोळे सोन्याच्या बांगड्या किंमत अंदाजे ९ लाख ८० हजार रूपये, २० तोळे चांदीचे पैजण किंमत ४० हजार रूपये तसेच नगदी १ लाख ७० हजार रूपये असा एकूण ११ लाख ९०



हजार रूपयांचा माल चोरट्यांनी चोरून नेला होता. याप्रकरणी मोहम्मद सादीक यांनी परतवाडा पोलिसांत तक्रार दाखल केली असता पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हे दाखल करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान गुन्हेशाखेच्या पथकाने तब्बल ८० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली, तसेच २१० डीपीआरचे तांत्रिक विश्लेषण केले. सोबतच बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून संशयित आरोपींचा माग काढण्यात आला. त्या माहितीच्या आधारे १८ ऑगस्ट रोजी आरोपी श्रीरंग चंद्रचुड रत्नपारखी (३०) रा. द्वारकाधीश नगर, साईनगर अमरावती, प्रशिक संतोष बारसे (३१) रा. पंचशिल नगर अमरावती, आकाश ऊर्फ कोब्रा विनोद कंगाले (२८) रा. आदिवासी नगर अमरावती, साहिल ऊर्फ बंटी बाळकृष्ण वाकपांजर (२३) रा. थिलोरी ह. मु.अमरावती, अक्षय बाळू जुनघरे (३१) रा. महात्मा फुले कॉलनी, नवसारी व आकाश ऊर्फ पक्या सुरेश धुर्वे रा. अमरावती यांनी एकत्र येवून मद्यपान केले. त्यानंतर त्यांनी ही घरफोडी केली. सर्व माहिती संकलित करून पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे चार आरोपींनाताब्यात घेण्यात आले.

# सात अट्टल चोरटे पोलिसांच्या ताब्यात

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या घरफोडीच्या तपासाला गती देत गुन्हे शाखा, युनिट क्रमांक १ च्या पथकाने अट्टल घरफोड्यांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे.

या कारवाईत पोलिसांनी सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणत सोने-चांदीचे दागिने तसेच रोख रकमेसह तब्बल १९ लाख ६६ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सामरा नगर येथील प्रेमानंद रत्नाकर शिंदे (वय ३८) हे २५ जुलै रोजी कुटुंबासह चिखलदरा येथे गेले होते. २६ जुलै रोजी घरी परतल्यानंतर त्यांच्या घराच्या मुख्य दरवाज्याचे ऑटोमॅटिक लॉक तुटलेले आढळले.

# कर्जमाफीविषयी आक्षेपार्ह पोस्ट, पेठ इतबारपूरचा तलाठी निलंबित

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेविषयी सोशल मीडियावर प्रक्षोभक, नकारात्मक आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवणे पेठ ईतबारपूर (ता. दर्यापूर) येथील तलाठ्याला चांगलेच महागात पडले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ही बाब गंभीरतेने घेत विश्वनाथ गोंडाणे यांना २१ ऑगस्टला तत्काळ प्रभावाने शासनसेवेतून निलंबित केले आहे. शासनाविरोधात गैरसमज पसरवल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाल्याने, निष्पक्ष चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी हा धडक निर्णय घेतला. चौकशीदरम्यान तलाठी गोंडाणे यांनी संबंधित मोबाइल क्रमांक (८००७५८४२२५) आपल्या पत्नीचा असून, वैद्यकीय कारणास्तव स्वत: मोबाइलचा वापर बंद केल्याचा बचाव मांडला होता. मात्र, निवासी नायब तहसीलदारांच्या चौकशीत तहसील कार्यालयाशी संबंधित अधिकत ४५७ सदस्यांच्या ग्रुपवर वादग्रस्त मेसेज दर्यापूर येथील तक्रारदार अभिषेक इंगळे यांनी केलेल्या ई-मेल तक्रारीनंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात आली होती. चौकशीदरम्यान तलाठी साझा, पेठ ईतबारपूर या सुमारे ४५७ सदस्य असलेल्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर कर्जमाफीत शेतकऱ्यांची संतापजनक फसवणूक या मथळ्याखाली शासनाच्या धोरणावर वादग्रस्त संदेश प्रसारित झाला.

त्यानुसार दर्यापूर तहसीलदार यांना कारवाई करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. कामांच्या ग्रुपमध्येही याच क्रमांकावरून मेसेज येत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे गोंडाणे यांनी दिलेला खुलासा व संदेश प्रसाराच्या तारखांमधील विसंगतीमुळे त्यांची सत्यता संशयास्पद ठरली. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये निलंबनाची कारवाई केली. निलंबन कालावधीत गोंडाणे यांचे मुख्यालय धारणी तहसील कार्यालय आहे.

## ४२ कागदपत्रे जप्त | एका शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर सहकार विभाग ॲक्शन मोडवर

# जिल्ह्यात अवैध सावकारांच्या सहा प्रतिष्ठानांवर धाडी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** अवैध सावकारी व बेकायदेशीर व्याज वसुलीच्या मानसिक छळाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर जिल्हा सहकार विभागाने जिल्ह्यात मोठी धड़क कारवाई केली आहे. अमरावती, मोर्शी व चांदूरबाजार तालुक्यात ६ ठिकाणी एकाच दिवशी धाड व झडतीची कारवाई करण्यात आली असून यात ४२ हून अधिक संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत.

मोर्शी तालुक्यातील तरोडा डोमक येथील महिला तक्रारदार यांनी तक्रार दिली होती की, त्यांचे पती पवन विश्वासराव भाकरे यांनी अवैध सावकारीला कंटाळून २५ जुलै २०२६ रोजी खेड येथील शेतात आत्महत्या केली. ही तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयात प्राप्त होताच जिल्हा उपनिबंधक राजेश वि. भुयार यांनी तत्काळ ६ पथकांची नेमणूक करून गाडगेनगर, चांदूरबाजार व मोर्शी पोलिसांच्या मदतीने २१ ऑगस्ट २०२६ रोजी ही कारवाई केली.

पथक क्र.१ चे प्रमुख किशोर इंगळे यांनी मोर्शी येथील घनश्याम गट्टानी रा.



राधाकृष्णा कॉलनी मोर्शी यांच्या घरी सकाळी ११.१५ ते १२.३५ पर्यंत झडती घेतली. येथे काहीही आढळले नाही. पथक क्र २ चे प्रमुख स्वाती गुडधे यांनी अमरावती येथील नवनीत रतनलाल चांडक यांच्या देवी रेसिडेन्सी, आराधना बिल्डिंग, कठोरा रोड येथे सकाळी १०.४६ ते दुपारी १.४५ पर्यंत झडती घेतली. येथे ३२ संशयास्पद दस्तऐवज आढळले. यात स्वाक्षरी असलेले कोरे स्टॅम्प पेपर, १ रुपयाचे तिकीट असलेले कोरे कागद, धनादेश, विक्री पावत्या, खरेदीखत यांचा समावेश आहे. पथक क्र. ३ चे प्रीती धामणे यांनी नवनीत रतनलाल चांडक यांच्या गौरीनंदन प्रोव्हीजन, कठोरा रोड येथील किराणा दुकानात घेतलेल्या झडतीत एक कोरा (नाव नसलेला) धनादेश आढळून आला असून तो सील करण्यात आला आहे.

पथक क्र. 4 चे प्रमुख अनिरुद्ध राऊत यांनी चांदूरबाजार येथील राजेश चांडक (मारवाडीपुरा) यांच्या घरी दुपारी १२ ते २.४५ पर्यंत झडती घेतली. येथे कोणतेही दस्तऐवज आढळले नाहीत. पथक क्र.५ चे प्रमुख आशिष चर्जन यांनी चांदूरबाजार येथील कमलकिशोर सारडा यांच्या आनंद ट्रेडर्स, जयस्तंभ चौक येथे सकाळी ११.३० ते दुपारी १.०० पर्यंत झडती घेतली. येथे ९ कोरे स्टॅम्प आढळून आले असून ते जप्त करण्यात आले आहेत.

पथक क्र. ६ चे प्रमुख सचिन पतंगे यांनी चांदूरबाजार येथील कैलास कमलकिशोर सारडा रा. हनुमान चौक, चांदूरबाजार यांच्या घरी सकाळी ११.३० ते दुपारी २.५५ पर्यंत कारवाई केली. येथे ९ दस्तऐवज जप्त करण्यात आले असून यामध्ये स्थावर मालमत्ता खरेदीखत, नोंदवही व इतर कागदपत्रांचा समावेश आहे.

ही सर्व कारवाई महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार असून जप्त कागदपत्रांची पडताळणी विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन व जिल्हा उपनिबंधक राजेश वि. भुयार यांच्या मार्गदर्शनात सहायक निबंधक स्वाती गुडधे करणार आहेत. दरम्यान, गेल्या ३ दिवसांत अमरावती सहकार विभागाच्या ११ पथकांनी अमरावती, तिवसा, चांदूरबाजार, मोर्शी, नांदगाव खंडेश्वर तालुक्यात अवैध सावकारी तक्रारींवर कारवाई केल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप

## बहुजन वंचित आघाडीची चौकशीची मागणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. २३ :** तालुक्यातील रास्त भाव (रेशन) दुकानांमार्फत लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या धान्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या धान्यामध्ये किडे, धूळ, माती तसेच खराब व मानवी वापरास अयोग्य धान्य आढळत असल्याच्या तक्रारी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहेत.

या गंभीर प्रकाराची तातडीने चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे चांदूर बाजार तालुका अध्यक्ष सुरज चव्हाण यांनी तहसीलदार, चांदूर बाजार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, रेशन दुकानदारांकडे निकृष्ट धान्याबाबत विचारणा केली असता, पुरवठा विभागामार्फत आम्हाला असेच धान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे, असे सांगण्यात येत असल्याचा दावा



करण्यात आला आहे. त्यामुळे निकृष्ट धान्याचा पुरवठा नेमका कोणत्या स्तरावरून होत आहे, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

लाभार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकार गंभीर असून, संबंधित रेशन दुकानांमधील धान्याचे अधिकृत नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी. तसेच धान्याचा दर्जा, साठवणूक, पुरवठा आणि वितरण प्रक्रियेची तपासणी करून दोषी अधिकारी, कर्मचारी अथवा रेशन दुकानदारांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

> आलेल्या तक्रारीनुसार धान्यांचे नमुने घेऊन तपासणी करून शासनाला तसेच तक्रारदार यांना अहवाल सादर करण्यात येतील. **- राहुल केदारे**
> **प्रभारी निरीक्षन अधिकारी.**

निकृष्ट धान्याचे वाटप तात्काळ थांबवून लाभार्थ्यांना चांगल्या प्रतीचे व मानवी वापरास योग्य धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाची प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसील कार्यालय, चांदूर बाजार येथे पुरवठा विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.सुरज चव्हाण, हरिदास इंगळे, पवन मनोहरे, तोषल नव्हाळे, राहुल हिवराळे, नरेश नाईक, सुरेश वासनकर,अंकुश गव्हांदे, सिद्धार्थ तायडे,भारत तायडे, ऋषकेश रडके, सुनील कुरवाळे, प्रभाकर इंगळे. इत्यादी पदाधिकारी तसेच कार्यकर्ते हजर होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, सोमवार २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com


# बेलोरा विमानतळावरून नोव्हेंबर अखेरपर्यंत नाईट लँडिंग होणार

## पुणे, तिरुपतीसह पाच शहरांना अमरावतीशी जोडण्याचा प्रस्ताव

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** एप्रिल २०२५ मध्ये अतिशय दिमाखात सुरू झालेल्या अमरावतीच्या बेलोरा विमानतळाच्या शिरपेचात आता आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. या विमानतळावर बहुप्रतीक्षित नाईट लँडिंग (रात्रीच्या वेळी विमानांचे उड्डाण व उतरण्याची सुविधा) ही सेवा आगामी नोव्हेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होणार आहे. यामुळे केवळ विमान सेवा २४ तास उपलब्ध होणार नाही, तर अमरावतीच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासालाही मोठी गती मिळणार आहे.

विमानतळाबाबत या महत्त्वपूर्ण टप्प्यासोबतच अमरावतीहून पुणे, तिरुपती, हैदराबाद, सुरत आणि अहमदाबाद या प्रमुख शहरांसाठी नवीन विमान फेऱ्या सुरू करण्याच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. या संदर्भातील अधिकृत माहिती महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दिली आहे.

बेलोरा विमानतळावर सध्या १८५० मीटरचा सुसज्ज रनवे उपलब्ध आहे. रात्रीच्या विमान प्रवासासाठी आवश्यक असणारी अत्याधुनिक प्रकाश व्यवस्था बसवण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.



१६ एप्रिल २०२५ रोजी अलायन्स एअरलाइन्सच्या माध्यमातून अमरावती ते मुंबई अशी पहिली विमान सेवा सुरू करण्यात आली होती. प्रवाशांची वाढती संख्या आणि मागणी लक्षात घेता, आता विमान फेऱ्या आणि नवीन शहरांच्या कनेक्टिव्हिटीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सूत्रांच्या माहितीनुसार, अमरावतीहून शिक्षणासाठी, आयटी क्षेत्रासाठी आणि व्यवसायासाठी पुण्यात जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळेच अमरावती-पुणे विमान सेवेसाठी प्रवाशांकडून सर्वाधिक मागणी केली जात आहे. विमानतळ प्राधिकरणाने पुणे, तिरुपती, हैदराबाद, सुरत आणि अहमदाबाद या पाच शहरांसाठी विमान सेवा सुरू करण्याचा रीतसर प्रस्ताव अलायन्स एअरलाइन्सकडे पाठवला आहे. या प्रस्तावावर आता अलायन्स एअरलाइन्सकडून अंतिम निर्णय घेतला जाणार असून, लवकरच अमरावतीकरांना एकाच वेळी अनेक शहरांशी जोडणारी विमान सेवा मिळण्याची चिन्हे आहेत.

> बेलोरा विमानतळावर नाईट लँडिंगचे काम अंतिम टप्प्यात असून ऑक्टोबरमध्ये डीजीसीएचे पथक पाहणीसाठी येत आहे. नोव्हेंबर अखेरपर्यंत ही सुविधा सुरू करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला दिशा मिळेल.
>
> **दीपक कपूर,**
> **उपाध्यक्ष व एमडी, एमएडीसी**

### ऑक्टोबरमध्ये डीजीसीएची पाहणी

डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन आणि एअरपोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या अंतिम परवानगीनंतर नाईट लँडिंग सुविधा अधिकृतपणे सुरू होईल. यासाठी ऑक्टोबर महिन्यात डीजीसीएची विशेष चमू अमरावती विमानतळाला भेट देणार आहे. यावेळी या चमूकडून धावपट्टी व प्रकाश व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. या पाहणीत चमूने काही सुधारणा सुचवल्यास त्या तात्काळ पूर्ण करून नोव्हेंबर अखेरपर्यंत नाईट लँडिंगचा हिरवा कंदील मिळण्याची शक्यता आहे.

# पार्डी ( देवी ) उपकेंद्राचे लोकार्पण व वाचनालयाचे उद्घाटन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. २३ :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पार्डी (देवी) येथे आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्राच्या नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा तसेच ग्रामपंचायतीच्या वाचनालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडले. ठीक दुपारी १२ वाजता राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास बडनेरा मतदार संघाचे आमदार रवि राणा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्डी (देवी)चे सरपंच अक्षय मेश्राम होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ग्रामपंचायतीच्या वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. नव्या वाचनालयामुळे विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना तसेच ग्रामस्थांना अभ्यास व वाचनासाठी हक्काची सुविधा उपलब्ध होणार आहे.यावेळी बंडू डकरे, दिनेश टेकाम, अजय घुले, पोलीस पाटील नितीन बेंडे, सुभाष खंडार, प्रतिभा बनसोड, अरुण मडके, राजू पिसे, जगदीश अंबाडकर, रक्षणा सरदार, सुनील राऊत, डॉ. मधुकरराव पिसे, आदी उपस्थित होते.

# टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये योग व बाल संस्कार शिबिर

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** हॉलीवूड कॉलनी परिसरातील टायटन्स पब्लिक स्कूलच्या विशेष युनिट किंडरगार्टन वाटिका येथे योग, उच्च मूल्ये व बाल संस्कार या विषयावर विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. परमपूज्य संत श्री आसारामजी बापू यांच्या प्रेरणेने योग वेदांत सेवा समितीच्या बाल संस्कार विभागाच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला.



यावेळी प्रमुख वक्त्या व प्रशिक्षक अर्चना ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना बालवयातच योग, प्राणायाम, एकाग्रता तसेच चांगल्या आचरणाचे महत्त्व समजावून सांगितले.

## थोडक्यात

### वकीलाला धक्काबुक्की करणाऱ्यावर गुन्हे दाखल

अमरावती : जिल्हा व सत्र न्यायालयाच्या परिसरात एका वकिलाला धक्का देत अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना १७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी प्रेम राजेंद्रकुमार शर्मा (२३, रा. विलास नगर) तसेच मयंक चंदन शर्मा (२५, रा. सातुर्णा) यांनी गाडगे नगर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दिल्यात पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हे नोंदवलेत. या घटनेचा पुढील तपास गाडगेनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### मजुरावर धारदार शस्त्राने हल्ला

अमरावती : सुन्नी मस्जिद परिसरात जुन्या तक्रारीच्या कारणावरून शेख आसिफ शेख इशाक (४०) यांच्यावर गोलू अण्णा (३२) याने शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना १८ ऑगस्ट रोजी घडली. गोल अण्णा याने धारदार वस्तूने डोक्यावर वार केल्याने आसिफ यांच्या डोक्यातून रक्तस्राव झाला, तसेच खांदा व पायालाही मार लागला. भांडण सोडविण्यास आलेल्या त्यांच्या पत्नी व वहिनीलाही शिवीगाळ करण्यात आली.

### स्पीकरच्या आवाजावरून सळाखीने हल्ला

शिरखेड : स्पीकरच्या जोरात आवाज सुरू असल्याने महिलेने मुलगी अभ्यास करीत असे म्हटल्याने दारूच्या नशेत इसमाने लोखंडी सळाख महिलेच्या हातावरू मारल्याने यात ती जखमी झाली. विचोरी येथे ही घटना घडली. याप्रकरणी ३६ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून गजानन बापूगिर गिरी वय ४८ , रा. विचोरी याच्याविरूध्द शिरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### जाब विचारणाऱ्या महिलेला मारहाण

अमरावती : दारूच्या नशेत शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तीला जाब विचारल्याने ५० वर्षीय महिलेला काठीने मारहाण केल्याची घटना विर्शी येथे घडली. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, राजेश भानुदास शिंद्रे (६०) हा तिच्या मुलीला शिवीगाळ करीत होता. याबाबत विचारणा केली असता त्याने महिलेलाही शिवीगाळ करून डाव्या हातावर काठीने मारले.

# हिंदू स्मशानभूमी येथे वृक्षरोपण सोहळा साजरा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि. २३ :** हिंदू स्मशानभूमी (वैकुंठ धाम), बेनोडा (शहीद) येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी, गुरुवारला वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. वृक्षारोपण करणारे नागरिक बेनोडा (शहीद) येथील शैलेश फरकाडे, यश फरकाडे, जय सातपुते, रोशन लाड, आदित्य श्रीराव, रितेश चिंचमलातपुरे, श्रीराम उत्सव समिती व बेनोडा ग्रामवासी उपस्थित होते.



# शकुंतला रेल्वे नॅरोगेज बस सेवा सुरू करण्याकरिता ध्वज संचलन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.२३ :** शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रहाच्या वतीने २०११ पासून विविध पद्धतीने सत्याग्रह सुरू आहे.शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रहाची मूळ मागणी ही शकुंतला रेल्वे नॅरोगेज मध्ये सुरू ठेवणे.ही प्रवाशांची मूलभूत गरज होती आहे.कारण की आदिवासी,शेतकरी,शेतमजूर,दिन दुबळया,गरिबांसाठी अत्यंत मूलभूत प्रवासाची सेवा होती. ती कुठलेही ठोस कारण न देता.बंद करण्यात आली. अनेक ग्रामपंचायती,नगरपालिकानी नॅरोगेज रेल्वे म्हणून चालविण्यात यावी. असे सर्वानुमते ठराव घेण्यात आले. हजारो प्रवाशांच्या स्वाक्षऱ्या सुद्धा घेण्यात आल्या. रेल्वे प्रशासनाला अनेक निवेदने पाठवण्यात आली.



मात्र रेल्वे प्रशासनाने मूळ मागणीकडे दुर्लक्ष केले. यात क्लिक निक्सन कंपनीला पाठीशी घालायचा स्पष्ट हेतू होता. असे दिसते. शकुंतला रेल्वे संदर्भातील अत्यंत चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या अफवा प्रसार माध्यमांद्वारे रेल्वे प्रशासनाच्या मदतीने पसरविण्यात आल्या. त्या खोट्या होत्या.

शकुंतला रेल्वे ही क्लिक निक्सन कंपनीच्या मालकीची कधीच नव्हती.ती फक्त संचलन करणारी संस्था होती. तत्कालीन भारत सरकारने, गव्हर्मेंट ऑफ इंडियाने १९०९ मध्ये तीस लाख रुपये व शकुंतला रेल्वेच्या उभारणीसाठी लागणारी जमीन मोफत देण्यात आली होती. त्यावेळी भारत सरकार व क्लिक निक्सन कंपनी मध्ये झालेले करार. अत्यंत पारदर्शी, अभ्यासनीय, आहेत.असा दावा शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रहाचे प्रवर्तक विजय विल्हेकर यांनी केला.

आमचा ब्रॉडगेजला अजिबात विरोध नाही परंतु या कामाला सहज तीस-पस्तीस ४० वर्षे लागतील. तोपर्यंत प्रवाशांच्या सेवेसाठी किमान नॅरोगेज रेल्वे बस चालविण्यात यावी.

# हिंदू मोक्षधाम येथे सगुण शिवमूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि. २३ :** हिंदू स्मशानभूमी (वैकुंठ धाम), बेनोडा (शहीद) येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी, गुरुवार सगुण शिव मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.



या पवित्र कार्यासाठी यजमान श्री. विवेकराव रामभाऊजी पोटोडे व सौ. मेघाताई विवेकराव पोटोडे यांच्या वतीने, त्यांच्या वडिलांच्या व काकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्व. श्री. रामभाऊजी श. पोटोडे व स्व. श्री. लक्ष्मणराव श. पोटोडे यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून हिंदू स्मशानभूमी (वैकुंठ धाम) येथे सगुण शिव मूर्ती अर्पण करण्यात आली.या पवित्र व समाजोपयोगी कार्याबद्दल श्री. विवेकराव रामभाऊजी पोटोडे, सौ. मेघाताई विवेकराव पोटोडे तसेच त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांचे समस्त बेनोडा (शहीद) ग्रामवासीयांच्या वतीने मन:पूर्वक आभार व कृतज्ञता व्यक्त करण्यात आले. त्यांचे असेच प्रेम, मार्गदर्शन व सहकार्य आपणा सर्वांना वेळोवेळी लाभत राहो. तसेच मूर्ती स्थापनेच्या वेळी रोषण कुबडे, शैलेश फरकाडे, भूषण फरकाडे, यश फरकाडे, अनिकेत कावणपुरे, जय सातपुते, रोषण लाड, गोकुल कढे, आदित्य श्रीराव, अरविंदराव चोबे, बंडूजी चोबे व इतर गावकरी उपस्थित होते.

# थोर पुरुषांना मानवंदना देऊन जागतिक छायाचित्र दिन साजरा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, दि. २३ :** जागतिक छायाचित्र २०२६ दिनानिमित्त चांदूर रेल्वे तालुक्यातील फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्र परिवारातर्फे श्रावण शुभपरवाच्या बुधवारला सर्वप्रथम चंद्रशेखर आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तींचे पूजन व हारार्पण करून चांदूर रेल्वे तून बाईक रॅली काढण्यात आली. त्यानंतर हॉटेल गणराज येते येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कॅमेऱ्याचे पूजन करून उपस्थित मान्यवरांचे वृक्ष व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रम करिता अध्यक्ष म्हणून राकेश जैन , उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय कोल्हे, राजीव शिवणकर सक्षम बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा साप्ताहिक सक्षम पुकारचे संपादक मनोज ढाकूळकर, सुनील सदावर्ते, अक्षय वानखडे,,आनंद राऊत उपस्थित होते.



यावेळी सर्व फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्रांनी जागतिक छायाचित्र २०२६ दिना निमित्ताने आप आपले मनोगत मांडले. चांदूर रेल्वे तालुका फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्रपरिवार चे संजय कोल्हे ,राजूभाऊ वडतकर राकेश जैन, राजीव शिवणकर, मनोज ढाकूळकर, अक्षय वानखडे,विशाल आमले, सुनील सदावर्ते, निखिल मेटे, हिमांशू कडू, तेजस यादव, श्रवण काळे, ऋषिकेश गोखे, संग्राम खंडाते, रोशन बांगळे, करण ठाकरे ,साहील करवाडे शुभम गवई, धिरज ईश्वरकर, शुभम चोपकर , आनंद राऊत, निखिल वाहणे, कार्तिक राऊत , अनिकेत बागडे, हार्दिक रामटेके उपस्थित होते व हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता या सर्वांनी परिश्रम घेतले.

## जलसंधारणाचा जागर: ७१ हजारांचे लकी ड्रॉ

# ‘महा वॉकेथॉन’ मध्ये युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** नागरिकांमध्ये जलसंधारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी शहरात महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर हा उपक्रम उत्साहात पार पडला. सकाळी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावरून या वॉकेथॉनला सुरुवात झाली. या वॉकेथॉनमध्ये युवक, विद्यार्थी व अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत जलसंवर्धनाचा संदेश दिला.

या वॉकेथॉनला विभागीय आयुक्त नयना गुंडे व शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. सुरुवातीला विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांच्याहस्ते जलपूजन करण्यात आले, तसेच उपस्थितांना जलसंधारणाची शपथ देण्यात आली. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून सुरू झालेली ही वॉकेथॉन पंचवटी चौक, गर्ल्स् हायस्कूल चौक, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सिंचन भवन या मार्गे पुन्हा शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर पोहोचली. तिथे या वॉकेथॉनचा समारोप करण्यात आला.




वॉकेथॉनमध्ये सहभागी झालेल्यांसाठी लकी ड्रॉ द्वारे ७१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यात १० विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. यामध्ये प्रथम तनुजा मेश्राम, द्वितीय कस्तुरी बहुरूपी, तर तृतीय क्रमांक आयुष मुंढे यांनी पटकाविला, तर राजू मुंढे, अंजू कासदेकर, आचल वानखडे, विजोथ केनॉय, खुशी नवखार, प्रचिती पाटील, अविनाश साऊरकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. यान पुरण दिन या उपक्रमात प्रा. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्यासह विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी सहभागींसाठी महा वॉकेथॉन झुंबाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधीक्षक अभियंता दिलीप निपाने, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, पाटील, जलसंधारणाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, श्रीकांत उमप, सोनाली काकडे, मुख्याधिकारी विकास खंडारे, शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य गावंडे आदी उपस्थित होते.

# श्रावणातील कावड यात्रेने भक्तिमय वातावरण

## आ. रवि राणा यांची उपस्थिती

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त शिवशक्ती धाम मित्र मंडळ, कल्याण नगर चौक यांच्या वतीने भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. सात पवित्र तीर्थस्थळांवरून आणलेल्या जलाने सजलेल्या कावडी घेऊन मोठ्या संख्येने शिवभक्तांनी ‘हर हर महादेव’ आणि ‘जय भोलेनाथ’च्या जयघोषात कावड यात्रा काढली. या यात्रेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.या भव्य कावड यात्रेला महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष तथा आमदार रवि राणा यांनी सदिच्छा भेट देत शिवभक्तांचा उत्साह वाढविला. यावेळी त्यांनी कावडधारी भाविकांशी संवाद साधत भगवान महादेवांचे दर्शन घेतले व आशीर्वाद घेतला. यावेळी बोलताना आ. रवि राणा म्हणाले,



श्रावणातील कावड यात्रा ही श्रद्धा, भक्ती आणि भगवान महादेवावरील अढळ विश्वासाचे प्रतीक आहे. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने अमरावतीमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. या माध्यमातून समाजात एकता, सद्भावना आणि सकारात्मक ऊर्जा वाढो, हीच महादेव चरणी प्रार्थना आहे. श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या कावड यात्रेत शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. संपूर्ण मार्गावर महादेवाच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. यावेळी श्री महाकाली माता शक्तीपीठाचे पीठाधीश्वर श्री शक्ती महाराज, शिक्षण सभापती अॅड. प्रिती रेवने, कुणाल गुप्ता, दिनेश गुप्ता, महेश गुप्ता, आदर्श गुप्ता, कैलाश गुप्ता, कळदिन गुप्ता, अमित गुप्ता, सुधीर गुप्ता, मोहन यादव, सुधीर धुमटकर, सुभाष गुप्ता, विजय गुप्ता, गणेश यादव, गणेश गुप्ता, संजय गुप्ता, पप्पू गुप्ता, श्रीराम देशपांडे, प्रमोद कौशल, शंकर मालविय, आनंद गुप्ता, शुभम गुप्ता, राकेश गुप्ता, प्रतिभा गुप्ता, अरुणा गुप्ता, उषाताई गुप्ता यांच्यासह शिवशक्ती धाम मित्र मंडळाचे आयोजक, पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने कावडधारी भाविक व शिवभक्त उपस्थित होते.

## थोडक्यात



### नेर येथे स्वातंत्र्यदिनी गौरव सोहळा

**नेर :** येथील परदेसीकर हॉलमध्ये १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आणि वनिता बहुउद्देशीय ग्रामोद्योग महिला मंडळ शिरजगाव पांढरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्रात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मास कम्युनिकेशन आणि राज्यशास्त्र विषयात द्वितीय आचार्य पदवी मिळवल्याबद्दल प्रा. डॉ. मिलिंद आठवले यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच ३१ जुलै रोजी मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झालेल्या वंदना किटके यांना सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले. प्रशिक्षणार्थी प्रीती निमकर यांना वाढदिवसानिमित्त भेटवस्तू देण्यात आली. सागर वानखडे, नीता पाटील, पायल खरे, मंजुश्री ठाकरे, अर्चना वासनिक यांनी क्रांतीगीते सादर केली. महाकवी वामनदादा कर्डक व कवी रोहन नागदिवे यांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या तालुकाध्यक्ष वनिता इंगोले-मोरे अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. स्मिता चौधरी, पपीता पाटील, ऋषभ मेश्राम, श्रद्धा सोईतकर, मनीषा शेटे उपस्थित होत्या. प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन डॉ. शरद मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल क्षीरसागर यांनी केले.




### राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय पुरस्कार

**यवतमाळ :** अमरावती येथे पार पडलेल्या अधिवेशनात महावितरणचे मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय एमिनेंट इंजिनियर पुरस्कार प्रदान करण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते हा सन्मान झाला. विद्युत क्षेत्रातील ३७ वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स भारत या संस्थेने पवार यांना या पुरस्काराने सन्मानित केले. अमरावती येथे संस्थेच्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनात विकसित भारताचे ध्येय तसेच एआय आणि हरित तंत्रज्ञान विषयावर विचारमंथन झाले. कार्यक्रमाला आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रवीण तायडे, संस्थेचे अध्यक्ष मनिष कोठारी, पदाधिकारी आनंद जवंजाळ, राम विघे, आर. आर. तंवर आणि सुनील राठी उपस्थित होते. अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार असल्याचे प्रतिपादन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. भारतीय अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. एलिफंटा बेटावर समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहोचवण्याचे आव्हान अभियंत्यांनी यशस्वीपणे पेलले. तत्पूर्वी संचालक राजेंद्र पवार यांनी विकसित भारत २०४७ च्या ऊर्जा उद्दिष्टांवर आधारित सादरीकरण केले. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया या संस्थेची स्थापना १९२० मध्ये झाली असून तिचे मुख्यालय कोलकाता येथे आहे.

### 'अमोलकचंद'च्या खेळाडूंचा गौरव

**यवतमाळ :** येथील नेहरू स्टेडियमवर झालेल्या जिल्हा अजिंक्यपद ज्युनिअर अॅथलेटिक्स स्पर्धेत अमोलकचंद कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू सुमित पाटील याने १०० मीटर धावणे या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल जिंकले. तसेच संजीव पाटील याने १०० मीटर धावणे या स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला आहे. लांब उडी स्पर्धेत युवराज चिल्लावार या विद्यार्थ्याने कांस्यपदक पटकावले. या विद्यार्थ्यांना क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. किशोर तायडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. संजय पंदिरवाड आदींचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. या खेळाडूंचा महाविद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला.

# सोयाबीनवर 'यलो मोझॅक' तर ऊसावर पांढरी माशी

## पावसाअभावी सोयाबीनवर विषाणूजन्य रोगाचे आक्रमण, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ संभाजी भोयर**



**उमरखेड, दि. २३ :** तालुक्यात पावसाच्या मोठ्या खंडाने खरीप हंगामाला जबर फटका बसला आहे. सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक', तर ऊस पिकावर पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावाने शेतकरी पुन्हा एकदा भीषण संकटात सापडला आहे. एकीकडे कृषी विभागाकडून योग्य मार्गदर्शनाचा अभाव, तर दुसरीकडे महागड्या कीटकनाशकांचा भुर्दंड यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत अडकला आहे. उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाल्याने, बळीराजाच्या आशेवर अक्षरशः पाणी फिरले असून संपूर्ण तालुक्यात चिंतेचे वातावरण आहे.

यंदाच्या खरीप हंगामात चांगल्या पावसाची आणि भरघोस उत्पादनाची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा एकदा घोर निराशा पडली आहे. नैसर्गिक संकटांची मालिका सुरूच असून, पावसाने दिलेली प्रदीर्घ ओढ आणि बदलत्या हवामानामुळे पिकांवर विविध भयंकर रोगांचे आक्रमण झाले आहे. उमरखेड तालुक्यात यंदा हजारो हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे; मात्र सध्या या मुख्य पिकावर 'यलो मोझॅक' या विषाणूजन्य रोगाचे भीषण संक्रमण अतिशय वेगाने पसरत आहे. दिवसागणिक हा रोग संपूर्ण शिवार व्यापत असल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी प्रचंड धास्तावला आहे. या रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकरी जीवाचा आकांत करत आहेत. बाजारातील अत्यंत महागड्या कीटकनाशकांच्या एकामागून एक फवारण्या करूनही रोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात येत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना थेट बांधावर जाऊन सखोल व तांत्रिक मार्गदर्शन मिळणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासकीय यंत्रणेने डोळेझाक केल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर तर सोडले नाही ना, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. याच अगतिकतेचा गैरफायदा घेत काही कृषी केंद्र चालक शेतकऱ्यांच्या माथी वाटेल ती महागडी व अनावश्यक कीटकनाशके मारत आहेत. त्यामुळे आधीच अस्मानी संकटाने पिचलेला बळीराजा आता दुहेरी आर्थिक संकटाच्या खाईत लोटला जात आहे. कृषी विभागाच्या कीटकनाशक नियंत्रण शाखेने तात्काळ लक्ष घालून शेतकऱ्यांना योग्य औषधांबाबत मार्गदर्शन करण्याची नितांत गरज आहे. परंतु, यंत्रणेकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने आता वालीच उरला नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. पावसाचा मोठा खंड आणि पाण्याची कमतरता यामुळे पिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली असून, कीटकांचा प्रादुर्भाव वाढल्याचा अंदाज जाणकार शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. वेळीच शासनाने व प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्यास यंदा उत्पादनात मोठी घट होऊन गंभीर आर्थिक पेचप्रसंग निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

### काय आहे 'यलो मोझॅक'चा धोका?

**सोयाबीन पीक साधारण २५ ते ३० दिवसांचे झाल्यानंतर या घातक आणि विषाणूजन्य रोगाची प्राथमिक लक्षणे दिसू लागतात. यामध्ये प्रामुख्याने पिकाला येणारी नवीन पाने पिवळ्या रंगाची होऊ लागतात. योग्य वेळी नियंत्रण न मिळवल्यास हळूहळू या रोगाचे संक्रमण संपूर्ण झाडावर आणि पर्यायाने शेतात वेगाने पसरते. यामुळे पिकाची वाढ खुंटते आणि शेंगा न लागल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणावर तूट येते. हा रोग अत्यंत घातक मानला जातो.**

### ऊस उत्पादकांवर पांढऱ्या माशीचे संकट

**उमरखेड तालुक्यात ऊस पिकाचे क्षेत्रही मोठ्या प्रमाणावर असून, सध्या उसावर पांढऱ्या माशीचा मोठा प्रादुर्भाव वाढल्याचे चित्र आहे. उसाची उंची जास्त असल्याने पारंपरिक पद्धतीने कीटकनाशकाची फवारणी करणे शक्य होत नाही. परिणामी, शेतकऱ्यांना नाईलाजाने महागड्या ड्रोनद्वारे फवारणी करावी लागत आहे. ड्रोनचे भाडे आणि महागडी औषधे यामुळे अगोदरच अडचणीत असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उधार-उसनवार करून या अवाढव्य खर्चाचा भार सोसावा लागत आहे.**

# शेंबाळपिंपरीत उर्जा फाउंडेशनकडून वृक्षसंवर्धन

## तब्बल पाच टन वृक्षांची केली यशस्वी पुनर्लागवड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**शेंबाळपिंपरी, दि. २३ :** येथे रस्त्याच्या कडेला शासनाच्या हद्दीत येणारे दहा वर्षांपूर्वीचे पाच टन वजनाचे वृक्ष सुरक्षित ठेवण्यासाठी उर्जा फाउंडेशनच्या सदस्यांनी जेसीबी व ट्रेलरच्या सहाय्याने ते मुळांसह काढून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या शेंबाळेश्वर संस्थान आणि शेंबाळेश्वर गोसेवा सदन प्रतिष्ठानच्या गेटवर पुनर्लागवड करून अनोखा वृक्षसंवर्धन उपक्रम राबवला.

शासनाच्या हद्दीत आल्यामुळे या मोठ्या वृक्षाचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे झाले होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जपत सदस्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने हे वृक्ष सुरक्षितपणे हलवले. पर्यावरण संरक्षण आणि वृक्षसंवर्धनासाठी राबविलेला हा उपक्रम समाजासाठी खूप प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वांना झाडे लावा आणि झाडे जगवा हा महत्त्वाचा संदेश देण्यात आला. या संपूर्ण कार्यासाठी उर्जा फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी मोठे परिश्रम घेतले आहेत. या कार्यात शिवाजीराव देशमुख, संजय साकला, मंगेश पारटकर, नंदूभाऊ तवर, दीपक जीरोणकर यांचे सहकार्य लाभले. तसेच रमेश पांडे, संतोष डंगाले, विठ्ठल शिंदे, सचिन पाटील, रवी बैस यांनी मदत केली. जय बैस, शैलेश चंदेल, अतुल धुत, तेजस तवर, अभिजीत जोशी यांनी परिश्रम घेतले. भारत पवार, रोहित बडगुजर, लक्ष्मण सूर्यवंशी, महादेव डाखोरे यांनी यात मोलाचे योगदान दिले. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत फाउंडेशनच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

# सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयामार्फत हर घर तिरंगा अभियान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. २३ :** येथील सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सात दिवशीय हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. देशभक्ती वाढीस लावण्यासाठी आणि राष्ट्रध्वजाचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला होता. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवून विविध उपक्रमांच्या माध्यमातून हे अभियान यशस्वी केले.

अभियानादरम्यान महाविद्यालयात दररोज ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला विशेष सन्मान देण्यात आला. रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालय ते वेदधारिणी शाळेपर्यंत भव्य तिरंगा सन्मान रॅली काढली. रॅलीत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते गायली आणि तिरंग्याच्या सन्मानार्थ घोषणा दिल्या. प्राचार्य डॉ. सीमा शेटे यांनी रॅलीला संबोधित करून उपक्रमाचे महत्त्व पटवून दिले. प्रा. डॉ. अरुण शेंडे आणि प्रा. डॉ. कमलदास राठोड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अभियानात सेल्फी विथ तिरंगा आणि एच.आय.व्ही. जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. सीमा शेटे यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सुहानंद ढोक, प्रा. डॉ. कमलदास राठोड आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# गणोरी परिसरात पावसाने दिला नागरिकांना दिलासा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २३ :** बाभूळगाव तालुक्यातील गणोरी आणि परिसरात अनेक दिवसांच्या दडीनंतर अखेर रिमझिम पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्यामुळे खरीप हंगामातील सर्व पिके करपण्याच्या मार्गावर आली होती. अशा कठीण परिस्थितीत अचानक आलेल्या या रिमझिम पावसामुळे चिंतातूर झालेल्या बळिराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

सततच्या तीव्र उन्हामुळे आणि उघडिपीमुळे शेतातील पिकांची बिकट अवस्था झाली होती. शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आभाळ भरून येऊन परिसरात पावसाच्या सरी सुरू झाल्या. हा पाऊस मुसळधार नसला तरी पिकांना जीवनदान देणारा ठरला आहे. या सरींमुळे जमिनीमध्ये योग्य ओलावा टिकून राहण्यास मदत झाली आहे. तसेच वातावरणातील उष्णता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. पावसाच्या आगमनाने हवालदिल झालेल्या सर्व शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. या पावसाने सध्या तरी पिकांचा जीव वाचवला आहे. मात्र पिकांच्या पुढील चांगल्या वाढीसाठी नियमित पावसाची गरज कायम आहे.

# आर्णीत करिअर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

## आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट लुभा राजिक यांच्याकडून महिलांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि. २३ :** शहरात नाजनीन मेकओव्हर, फरहा मेकओव्हर आणि शाजिया मेकओव्हर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मेकअप व करिअर मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट लुभा राजिक यांनी महिलांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. महिलांना सौंदर्य क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, हा या आयोजनाचा मुख्य उद्देश होता. या कार्यशाळेला स्थानिक महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेत अदा अकादमी यवतमाळच्या लुभा राजिक यांनी सहभागी महिलांना विविध कौशल्यांचे धडे दिले. त्यांनी मेकअप क्षेत्रातील नवनवीन तंत्रे प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगितली. या क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय कसा सुरू करावा, याचे मार्गदर्शन त्यांनी केले. यशस्वी करिअर घडवण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या टिप्स त्यांनी सहभागींना दिल्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा सचिव यवतमाळ अल्पसंख्याक मोर्चा भाजपा शबाना सोलंकी उपस्थित होत्या. शबाना सोलंकी या समाजसेविका, व्यावसायिका तसेच नेटवर्किंग क्षेत्रात कार्यरत आहेत. आयोजकांच्या वतीने शबाना सोलंकी यांचा पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात शबाना सोलंकी यांनी महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले. महिलांनी विविध कौशल्ये आत्मसात करून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. उपलब्ध संधींचा पूर्ण लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय उभारावा, असे त्यांनी सांगितले. तसेच नेटवर्किंग आणि व्यवसायवृद्धीच्या माध्यमातून प्रगती करण्याचे मार्गदर्शन त्यांनी उपस्थित महिलांना केले. कार्यशाळेचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. सहभागी झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थी महिलांना सहभागाचे प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. आर्णी शहरात प्रथमच असा विशेष उपक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला होता. सौंदर्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी ही कार्यशाळा अत्यंत मार्गदर्शक ठरली. या उपक्रमामुळे स्थानिक महिलांमध्ये रोजगाराच्या नवीन संधींबद्दल मोठा उत्साह निर्माण झाला आहे. आयोजकांनी भविष्यातही असे उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# मानवी जीवनात वृक्षाचे महत्त्व समजून त्याचे जतन करा

## नगराध्यक्षा सुनीता जयस्वाल : पर्यावरण संवर्धन मंडळ जपतेय हरित नेर शहराचा सामाजिक वसा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नेर (परसोपंत), दि. २३ :** पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वाढत्या तापमानात वृक्षारोपण व संवर्धन गरजेचे असल्याचे मत नगराध्यक्षा सुनीता जयस्वाल यांनी व्यक्त केले. नेर येथील आनंद सागर नगरात पर्यावरण संवर्धन मंडळाच्या माध्यमातून आयोजित औपचारिक वृक्षारोपण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. निसर्गचक्रात वृक्ष व जीवसृष्टीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाढते तापमान व भूजल संकट टाळण्यासाठी मानवी जीवनात वृक्षांचे महत्त्व समजून घेऊन प्रत्येक नागरिकाने त्यांचे जतन व संवर्धन केले पाहिजे.

नेर शहर हिरवे शहर ही संकल्पना घेऊन पर्यावरण संवर्धन मंडळ शहरात काम करीत आहे. हे मंडळ सन २००७ पासून शहरात वृक्षारोपण व संवर्धनाचे काम अविरत करीत आहे. आजपर्यंत शहरात दीड हजारांवर वृक्षांचे रोपण करून मंडळाकडून त्यांचे संवर्धन करण्यात आले आहे. शहरातील पर्यावरणप्रेमी आणि निसर्गपूजक नागरिकांच्या माध्यमातून मंडळ सातत्याने हे सामाजिक कार्य करीत आहे. मंडळाने शहरातील अनेक लेआउटमधील ओपन स्पेस आणि रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण केले आहे. यासोबतच बसस्थानक परिसर आणि न्यायालय परिसर अशा विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. यावर्षी शहरातील आनंद सागर नगर भागात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले आहे. आज आयोजित वृक्षारोपणाच्या छोटेखानी कार्यक्रमात नगराध्यक्षा सुनीता पवन जयस्वाल उपस्थित होत्या. सोबतच गटनेते पवन जयस्वाल आणि नगरसेवक संदीप गायकवाड यांची उपस्थिती होती. तसेच नगरसेविका त्रिवेणी दुधे, रुपेश दुधे आणि डॉ. रवींद्र राऊत उपस्थित होते. पर्यावरण संवर्धन मंडळाचे संयोजक प्रा. मनोहर ठाकरे व गणेश राऊत उपस्थित होते. सुधीर गादिया, अशोक तोंडे, रवींद्र मुंडे आणि निलेश शिरसाठ यांचीही उपस्थिती होती. याशिवाय प्रसाद कांडलकर, हेमंत काळे, अंकलेश तोंडे आणि शाम राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाला अविनाश तोंडे व तिलक राऊत आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. शहरातील सामाजिक जाणिवा जिवंत असणाऱ्या पर्यावरणप्रेमींनी एकत्र येत मोठे काम केले आहे. गेल्या काही वर्षांपासून मंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. या सततच्या प्रयत्नांमुळे नेर शहर आता हिरवे शहर होण्यास प्रारंभ झाला आहे. यात प्रामुख्याने प्रा. मनोहर ठाकरे आणि गणेश राऊत यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे.

# जवळा येथे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचे वाचन

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना अभिवादन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि. २३ :** जवळा येथील बुद्ध विहारात 'बुद्ध आणि त्यांचा ग्रंथ धम्म' ग्रंथवाचन उपक्रम सुरू आहे. या प्रसंगी उपस्थितांनी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भगवान बुद्धांच्या प्रज्ञा, करुणा आणि समतेचा संदेश समाजात रुजवण्यासाठी हा सामाजिक-वैचारिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महात्मा फुले यांनी अंधश्रद्धा आणि जातीय भेदभावाविरोधात संघर्ष करून शिक्षणाची चळवळ उभी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित घटकांना न्याय आणि समतेचा अधिकार मिळवून दिला. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांना भक्कम अधिष्ठान मिळवून दिले. 'बुद्ध व धम्म' ग्रंथाचे वाचन हा मानवता, विवेक आणि नैतिकतेचा विचार पोहोचवणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. अशा वाचनातून तरुण पिढीला समाजहितासाठी कार्य करण्याची नक्कीच प्रेरणा मिळते. या ग्रंथवाचनामुळे जवळा परिसरात सध्या सकारात्मक व वैचारिक वातावरण निर्माण झाले आहे. समाजात ज्ञान आणि बंधुता रुजवण्यासाठी असे उपक्रम सातत्याने आयोजित होणे काळाची गरज आहे. महापुरुषांचे विचार केवळ स्मरणासाठी नसून आचरणात आणण्यासाठी आहेत. त्यामुळे जवळा बुद्ध विहारातील हा ग्रंथवाचन उपक्रम समाजाला योग्य दिशा देणारा ठरेल.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ



सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### दारव्हा येथील दोन दुकाने फोडली

**दारव्हा :** दारव्हा बस स्थानक परिसरातील दोन प्रतिष्ठानांचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी १८ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली. ही घटना २१ ऑगस्टच्या रात्री ते २२ ऑगस्टच्या सकाळच्या दरम्यान घडली. फिर्यादी निलेश विठ्ठलराव बंदुकले (वय ३५, रा. कुंभारकिन्ही पुनर्वसन, दारव्हा) यांचे बस स्थानकासमोर 'गोकुल कॉम्प्युटर अँड झेरॉक्स' व फिनो बँकेचे ग्राहक सेवा केंद्र आहे. अज्ञात चोराने त्यांच्या दुकानाचे कुलूप तोडून आतील ८,५०० रुपये रोख चोरून नेले तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड केली. याशिवाय लगतच्या जय अंबे कॉम्प्लेक्समधील प्रतीक रामकृष्ण गावंडे (वय २४) यांच्या भारतीय स्टेट बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राचेही कुलूप तोडून काउंटरमधील ९,५०० रुपये लंपास केले. दोन्ही ठिकाणांहून एकूण १८ हजार रुपयांची चोरी झाली आहे. याप्रकरणी दारव्हा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम ३०५(a), ३३१(४) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### पैशांच्या वादातून तरुणावर चाकूहल्ला

**दारव्हा :** उधारीचे पैसे मागण्यासाठी घरी का आला, या कारणावरून झालेल्या वादात एका तरुणावर धारदार चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना २२ ऑगस्टच्या रात्री मदीना मस्जिदजवळ घडली. अनिकेश कैलाश काळे (वय २३, रा. मदीना मस्जिदजवळ, रेल्वे स्टेशन, दारव्हा) हे मंडप डेकोरेशनचा व्यवसाय करतात. घटनेच्या रात्री आरोपी विवेक सुरेश मनघटे (वय २३, रा. रेल्वे स्टेशन, दारव्हा) याने फिर्यादीच्या घरात घुसून 'तू माझ्या घरापर्यंत पैसे मागण्यासाठी का आला?' असा जाब विचारत वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपीने अनिकेश यांच्या डाव्या बगलेत, पोटावर व उजव्या बाजूला चाकूने सपासप वार केले. तसेच अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दारव्हा पोलिसांनी आरोपी विवेक मनघटे याच्याविरुद्ध BNS कलम ३३३, ११८(१), २९६, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ७३ हजारांचा ऐवज लंपास

**आर्णी :** कुटुंबीय देवदर्शनासाठी बाहेरगावी गेलेले असताना अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप-कोंडा तोडून रोख रकमेसह ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना वैभव नगर येथे घडली. फिर्यादी सुशांत लवकुश शुक्ला (वय ३२, रा. वैभव नगर, आर्णी) हे १७ ते २२ ऑगस्टदरम्यान सहकुटुंब उज्जैन येथे दर्शनासाठी गेले होते. यादरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. कपाटात ठेवलेली ६१ हजार रुपयांची रोख रक्कम आणि १२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने (मंगळसूत्र, पदक व मणी) असा एकूण ७३ हजारांचा ऐवज चोरून नेला. सुशांत शुक्ला यांच्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध BNS कलम ३०५(a), ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा नोंदवला असून पोलिस तपास करत आहेत.

## निधन

### लक्ष्मीबाई हिंगमिरे



**उमरखेड:** तालुक्यातील विडूळ येथील डॉ. शिवचरण हिंगमिरे यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई नारायणआप्पा हिंगमिरे (८४) यांचे रविवारी वृद्धापकाळाने निधन झाले. दुपारी १ वाजता विडूळ येथील मोक्षधामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# लेखी आश्वासनाशिवाय मागे हटणार नाही!

## झेडपीसमोर आदिवासी विद्यार्थ्यांच्या बेमुदत धरणे आंदोलनाचा पाचवा दिवस, वसतिगृह व शिष्यवृत्तीच्या प्रश्नांवर विद्यार्थी आक्रमक!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित शैक्षणिक मागण्यांसाठी सुरू असलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाला पाच दिवस पूर्ण झाले आहेत. १९ ऑगस्टपासून हे आंदोलन सुरू असून आज दि. २३ ऑगस्ट रोजी या आंदोलनाला पाच दिवस झाले आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या हजारो विद्यार्थ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. दरम्यान, शहर काँग्रेसने या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला असून, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.





यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयासमोर आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित शैक्षणिक मागण्यांकडे प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष रोखण्यासाठी १९ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. आज २३ ऑगस्ट रोजी या आंदोलनाला पाच दिवस पूर्ण झाले आहेत. या आंदोलनामध्ये दुर्गम व ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात आलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे. वसतिगृहातील अपुऱ्या सुविधा, प्रलंबित शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्याचे रखडलेले वाटप आणि प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी यांसारख्या गंभीर प्रश्नांवर प्रशासनाकडे वारंवार दाद मागूनही केवळ आश्वासने मिळाल्यामुळे विद्यार्थी संतप्त झाले आहेत. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी काँग्रेस पक्षाच्या वतीने शिष्टमंडळाने प्रत्यक्ष आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या न्याय्य असल्याचे सांगत जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हा लढा सुरू राहील अशी भूमिका मांडली. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश भीसनकर यांनी प्रशासनाच्या उदासीन धोरणावर ताशेरे ओढले. तसेच शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष बबलू ऊर्फ अनिल देशमुख, उपाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते व उत्कृष्ट इंजिनिअर राजेंद्र गौतम पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला स्थानिक पातळीवर इतर सामाजिक संघटनांचाही पाठिंबा मिळत असून, आंदोलनाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. जोपर्यंत प्रशासनाकडून मागण्या मान्य झाल्याबाबत लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत माघार घेणार नाही, असा ठाम पवित्रा विद्यार्थ्यांनी

### शहर काँग्रेसचा पाठींबा

**१९ ऑगस्टपासून यवतमाळमधील जिल्हा परिषद कार्यालयासमोर आदिवासी विद्यार्थ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू असून, आज २३ ऑगस्ट रोजी या आंदोलनाला पाच दिवस पूर्ण झाले आहेत. वसतिगृहांच्या सुविधेपासून ते प्रलंबित शिष्यवृत्तीपर्यंतच्या विविध मागण्यांसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. प्रशासनाच्या उदासीन कारभाराविरोधात हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या या आंदोलनाला शहर काँग्रेसने जाहीर पाठिंबा दिला आहे. शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष बबलू ऊर्फ अनिल देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश भीसनकर आणि शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते व उत्कृष्ट इंजिनिअर राजेंद्र गौतम पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहण्याचे आश्वासन दिले असून, जोपर्यंत लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत हा लढा कायम राहणार आहे.**

# आर्णी शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

## नऊ उत्तीर्ण आठ विद्यार्थी पात्र, विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २३ :** येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले. परीक्षेला प्रविष्ट १४ पैकी ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. नियमित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे शास्त्रीनगर शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडून हा गौरवशाली टप्पा गाठता आला.

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये निसबा हाफिज सैय्यद, राजवीर विजय चव्हाण, सोनाक्षी विजय गड्डेवार यांचा समावेश आहे. तसेच रोहिणी प्रवीण कोडापे, शिवम प्रल्हाद वैद्य, धीरज बाळू साखरकर हे विद्यार्थी पात्र ठरले. रुद्र अनिल देवकर आणि गौरी गजानन



कार्लेवार यांनीही शिष्यवृत्ती मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवला. अत्यल्प साधनसामग्री असतानाही विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून हे मोठे यश संपादन केले आहे. शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याचे सांगण्यात येत आहे. या यशामुळे शास्त्रीनगर परिसरासह संपूर्ण आर्णी शहरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापिका सुधा भालेराव आणि वर्गशिक्षक किशोर बोरगावकर यांना दिले. सोबतच शिक्षक हिरा व्यवहारे, वर्षा हळदीकर, मनीषा तगडपल्लेवार, अर्चना चांभारे यांचे मार्गदर्शन लाभले. आई-वडिलांचे प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण अभ्यासामुळे हे यश मिळवता आल्याचे विद्यार्थ्यांनी आवर्जून नमूद केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीबद्दल शिक्षक, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करावी, अशा शुभेच्छा नागरिकांनी दिल्या. आर्णी नगरपरिषद शाळेच्या या यशामुळे सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खोट्या आरोपांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणार

## मुस्कान अहमद यांचा पत्रकार परिषदेत इशारा, रेती तस्करी प्रकरणाशी नाव जोडण्याचा आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** येथील पत्रकार परिषदेत बोलताना फरीदा उर्फ मुस्कान गुलाम अहमद यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. आपल्यावर झालेले सर्व आरोप खोटे असून ही केवळ बदनामी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निर्दोष असतानाही रेती तस्करी प्रकरणाशी नाव जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजात सन्मान असताना होणारी ही कायदेशीर फसवणूक अजिबात खपवून घेणार नाही. असा थेट इशारा त्यांनी वृत्तपत्र आणि सोशल मीडियातून अपप्रचार करणाऱ्यांना दिला.



शेजारी राहणारे मोहम्मद असीम अन्सारी, मोहम्मद सगीर अन्सारी, मोहम्मद जाबीर अन्सारी आणि मोहम्मद सलीम अन्सारी हे यवतमाळच्या गुलमोहर पार्क परिसरात राहतात. हे चौघेही अवैध रेतीचा व्यवसाय चालवत असल्याचा आरोप मुस्कान यांनी केला. या लोकांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात खोटी तक्रार नोंदवून अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. आपण राहत असलेले घर स्वतःच्या मालकीचे आहे. परंतु ते अन्सारी परिवाराने बळकावल्याचा खोटा दावा केला जात आहे. घर मालकीचे असल्यास अन्सारी यांनी भाडेकरार किंवा खरेदीखत न्यायालयात सादर करावे. न्यायालयाचा जो काही आदेश येईल, त्याचे आपण पूर्ण पालन करू. अन्सारी यांच्या गाडीला धडक दिलनाचा आरोप देखील पूर्णपणे चुकीचा आहे. याचे पुरावे आपल्याकडे उपलब्ध आहेत. संजीवन मतिमंद शाळेत नोकरी करत असताना नोकरभरतीच्या नावाखाली पैसे उकळल्याचा आरोपही निरर्थक आहे. इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे आपण फक्त नोकरी करत असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर कामांशी आपला काहीही संबंध नाही. विकलांग क्षेत्रातील डी.एड. पदवी आपल्याकडे असून बोगस पदवीचा आरोप खोटा आहे. कर्मचाऱ्यांकडून खंडणी वसूल केल्याची कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. मुस्लिम धर्माच्या रितीरिवाजांनुसार बुरखा घालते, तरीही बुरख्याशिवायचा फोटो वृत्तपत्रात छापून बदनामी करण्यात आली. याप्रकरणी पोलीस अधीक्षकांकडे न्यायाची मागणी केली आहे. जीवाला धोका असल्याने पोलिसांनी याची गंभीर दखल घ्यावी. खासदार संजय देशमुख यांची भेट घेऊन अन्यायाची माहिती दिली असून त्यांनी यात योग्य ती दखल घेण्याचे आश्वासन दिले आहे.

# यवतमाळात शेतकरी प्रशिक्षण शिबिर संपन्न

## सांगलीचे 'विज्ञानसंत' अंकुश पाटील यांनी हजारो शेतकऱ्यांना मौलिक मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** येथील सेंट्रल सेलिब्रेशन हॉलमध्ये शेतकरी प्रशिक्षण शिबिर पार पडले. कमी खर्चात दर्जेदार खते आणि कृषी निविष्ठा तयार करून उत्पादन वाढविण्यासाठी हे आयोजन केले होते. यवतमाळ मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी उद्घाटन केलेल्या या कार्यक्रमात सांगलीचे 'विज्ञानसंत' अंकुश पाटील यांनी हजारो शेतकऱ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळचे माजी आमदार कीर्तीबाबू गांधी होते. प्रास्ताविकातून आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी वाढता उत्पादन खर्च आणि




शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाची गरज स्पष्ट केली. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींसोबत वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष सचिन नाईक यांनीही शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर भाष्य केले. माजी आमदार कीर्तीबाबू गांधी यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्य मार्गदर्शक अंकुश पाटील यांनी कमी खर्चात खते तयार करण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. त्यांनी जमिनीची सुपीकता टिकवून उत्पादन खर्च कमी करण्याबाबत सोप्या भाषेत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाला उपस्थित शेतकऱ्यांकडून अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराला विजयराव देशमुख, रमेश जारंडे, बबनराव कोरके, काँग्रेस नगरपालिका विरोधी पक्षनेत्या वैशाली सवाई उपस्थित होत्या. तसेच जिल्हा परिषद माजी गटनेत्या स्वाती येंडे, महिला शेतकरी सुवर्णा ठाकरे, ध्वनिका मांगुळकर आणि हजारो शेतकरी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रविभाऊ ढोक यांनी परिश्रम घेतले. शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख यांनीही विशेष योगदान दिले. तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश भिसनकर आणि सामाजिक कार्यकर्ते इंजि. राजेंद्र गौतम पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रत्यक्ष शेतीत उपयोगी तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन देणाऱ्या या शिबिरामुळे शेतकऱ्यांना नवी दिशा मिळाली. कमी खर्चाच्या उपायांमुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी वर्गामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. उपस्थितांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

# अपघाताच्या पार्श्वभूमीवर सामाजिक एकता ग्रुपची पोलिसांसोबत बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २३ :** शहर परिसरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी घाटंजी पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. मडावी यांच्या भीषण अपघातातील मृत्यूनंतर सामाजिक एकता ग्रुपच्या पुढाकाराने पोलीस ठाण्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. तहसीलदार विजय साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड आणि मुख्याधिकारी राजू घोडके यावेळी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील रस्ते सुरक्षा, वाहतूक शिस्त आणि अतिक्रमणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अल्पवयीन मुलांनी वाहने चालविल्यास २५ हजार रुपये



दंड आकारण्याचा इशारा प्रशासनाने दिला. या प्रकरणी पालकांना सर्वस्वी जबाबदार धरून कठोर कारवाई केली जाईल. विनापरवाना, विनाहेल्मेट आणि मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर पोलीस विशेष लक्ष ठेवतील. गेल्या तीन दिवसांत पोलिसांनी ५१ वाहनांवर कारवाई करून ५३ हजार रुपयांचा महसूल जमा केला. कारवाईदरम्यान कोणाचाही राजकीय किंवा सामाजिक दबाव खपवून घेतला जाणार नाही, असे पोलिसांनी स्पष्ट केले. नगरपरिषदेमार्फत मोकाट जनावरे आणि रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची व्यवस्था केली जाईल. बैठकीस सामाजिक कार्यकर्त्यांसह पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्णी शहरात लाडक्या बहिणींना साडीचे वाटप

## अन्न व नागरी पुरवठा विभाग महिलांसाठी साडी वाटप उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २३ :** महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत आर्णी शहरातील अमराईपुरा परिसरातील पात्र शिधापत्रिकाधारक महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले. स्वस्त धान्य दुकान संचालक प्रदीप निलावार यांच्या दुकानात हा कार्यक्रम पार पडला. सण-उत्सवाच्या काळात गरजू महिलांना दिलासा देण्यासाठी आणि लोककल्याणकारी योजनेचा लाभ थेट पोहोचवण्यासाठी शासनाकडून ही ओवाळणी देण्यात आली. आर्णी नगरपरिषदेचे शिक्षण सभापती संजय व्यवहारे यांच्या हस्ते या उपक्रमाचे



उद्घाटन पार पडले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना शिक्षण सभापती संजय व्यवहारे यांनी शासनाच्या या लोककल्याणकारी उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. सणासुदीच्या काळात गरजू महिलांना साडीच्या माध्यमातून मोठा आधार मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा योजनांमुळे शासन आणि सामान्य जनता यांच्यातील नाते अधिक मजबूत होते. शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना पात्र घटकांपर्यंत पोहोचणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या साडी वाटप उपक्रमाला अमराईपुरा परिसरातील महिलांनी अतिशय उत्स्फूर्त आणि मोठा प्रतिसाद दिला. सणाच्या काळात थेट शासनाकडून साडीची भेट मिळाल्याने सर्व लाभार्थी महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते. उपस्थित अनेक महिलांनी शासनाच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत करून आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार वीरेंद्र पाईकराव, संतोष हरसुलकर आणि पप्पू खोपे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय परिसरातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. साडी वितरणादरम्यान महिलांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून योग्य व्यवस्था करण्यात आली होती. प्रशासकीय नियमांचे पालन करून अत्यंत शिस्तबद्ध आणि सुरळीतपणे साड्यांचे वितरण करण्यात आले. अन्न व नागरी पुरवठा विभागाचा हा उपक्रम अतिशय उत्साहात पार पडला.

# काँग्रेसची जिल्हा पदाधिकाऱ्यांवर तालुकानिहाय जबाबदारी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीने संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी पदाधिकाऱ्यांकडे तालुकानिहाय प्रभार सोपवला आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांत पक्षाचा विस्तार, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय, आगामी कार्यक्रमांचे नियोजन तसेच उपक्रमांची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी संबंधित पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे, अशी माहिती पक्षाच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

प्रभार मिळालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात नियमित बैठका आयोजित कराव्यात. काँग्रेसचे विचार आणि ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सक्रियपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हा कमिटीने केले आहे. या नव्या रचनेमुळे जिल्ह्यातील पक्ष संघटनेला अधिक गती मिळणार आहे. आगामी काळात काँग्रेसची संघटन ताकद वाढवण्यावर विशेष भर दिला जाईल. स्थानिक स्तरावर पक्षाची पकड मजबूत करण्यासाठी तालुका स्तरावर नियोजनबद्ध काम केले जाईल. सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून पक्षाचे विचार घराघरांत पोहोचवावेत, असा उद्देश या बदलांमागे आहे. या माध्यमातून संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेस पक्ष नवीन ताकदीने आणि नव्या उत्साहाने कार्यरत राहणार आहे.